
# ज्ञानेश्वरीतील सौंदर्य

## व्यवहारातील दृष्टांत दाखले

सुरेश पंदारे



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# ज्ञानेश्वरीतील सौंदर्य

## व्यवहारातील दृष्टांत दाखले

लेखक

सुरेश देवराम पंदारे

# ज्ञानेश्वरीतील सौंदर्य

## व्यवहारातील दृष्टांत दाखले


## लेखक... सुरेश देवराम पंदारे

पत्ता: लक्ष्मीगंगा रेसिडेन्सी, सिंहगड रोड, पुणे ४११०५१
मोबाईल नं. : ९३७२१९९१००



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. in
www. esahity. com
esahity@gmail. com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : १२ मे २०२३**



©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे

## सुरेश देवराम पंदारे



**हुद्दा**:चिफ मॅनेजर, बॅंक ऑफ बडोदा, २०१० ला सेवानिवृत्त

**आवड**:अध्यात्म, वाचन, लेखन, सामाजिक कार्य, ज्ञानेश्वरीवर प्रवचने तसेच एकनाथी भागवत, हरीपाठ आणि नामदेवमहाराजकृत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीवरील अभंगाचे निरूपण. – दत्त मंदिरातील भजनी मंडळात सक्रिय.

– Reiki च्या तीनही डिग्री.

– आर्ट ऑफ लिव्हिंगचे कोर्स पूर्ण.

– सुगम संगीताची पहिली परीक्षा जानेवारी २०२१ मध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.

– संगीतोपचार (Music Therapy) चा ४ महिन्याचा कोर्स पूर्ण केला व Certificate मिळाले.

– SSY चा ७ दिवसांचा कोर्स व नंतर AMC पूर्ण व एक Scope camp पण केला.

– SSY अंतर्गत DYL (Design Your Life) हा १० महिन्याचा कोर्स पूर्ण केला.

## लेखकाचे मनोगत

गेली ३५ वर्षांपासून मी ज्ञानेश्वरी वाचत आहे. गेली २-३ वर्षांपासून त्यातील रोजच्या व्यवहारातील दृष्टांत दाखले व रूपके देऊन विषय समजावून सांगताना ज्या ओव्या संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ज्ञानेश्वरीत म्हणजेच भावार्थ दीपिकेत आहेत त्याचा संकलित थोडक्यात व सोप्या भाषेत अर्थ विशद करण्याचा विचार सतत मनात येई. पुस्तक रूपाने ते प्रकाशित व्हावे अशी ही सुप्त इच्छा आहे. ई साहित्याच्या माध्यमातून हा मानस यशस्वी होतो आहे याचा आनंद आहे. ‘ई साहित्य’ प्रकाशनाने माझ्या लिखाणाला उत्तम प्रतिसाद यापूर्वीही दिला आहे. आजच्या ह्या प्रकाशनाला त्यांनी मोलाची मदत केली, मार्गदर्शन केले त्याबद्दल श्री. सुनीळ सामंत व सहकारी त्यांच्या सहकारी टीमचा ऋणी आहे.


ता. १-५-२०२३ सुरेश पंदारे

माझी ही साहित्यकृती

माझे सद्गुरू श्रीयुत मामासाहेब देशपांडे यांना

तसेच

माझी आई व वडिलांना सहृदय अर्पण...!



# अध्याय १ ला

# (विषाद योग)

१) का सुक्षेत्री बीज घातले | ते आपुल्यायापरी विस्तारले |
तैसे भारती सुखाडले| अर्थजात || ४० ||

भगवदगीतेमध्ये जे प्रतिपाद्य विषय आहेत त्याला भाषेचे सौंदर्य कसे प्राप्त झाले हे माऊलींनी समजावून सांगताना वरील दाखला दिला आहे. शेत जर सुपीक असेल व त्यात बी पेरले तर त्याचा विस्तार चांगल्या पद्धतीने होतो. तसाच ह्या ग्रंथाचा विस्तार होईल; कारण व्यासांच्या प्रतिभेतून भगवदगीता निर्माण झाली.

२) जैसे भ्रमर परागु नेती | परी कमळदले नेणती
तैसी परी आहे सेविती | ग्रंथी इये ||५९||

वाचकांना हा ग्रंथ समजावून घेण्याची- मनन करण्याची हातोटी माऊली समजावून सांगतात. चित्ताची एकाग्रता करून गीतेच्या

ओव्यांचा अनुभव घ्यावा हे सूचित करण्यासाठी भ्रमराचा दाखला दिला. भ्रमर फुलांमध्ये परागकण सेवन करतात. फुलाला ते जाणवत पण नाही. तसा ग्रंथाचा आस्वाद घ्यावा असे माऊलींना सुचवायचे आहे |

३) अपत्यबोले जरी बोबडे वाचा |
तरी अधिकाची तयाचा | संतोष आधी ||६४||
तैसा तुम्ही मी अंगिकारिला |
सज्जनी आपुला म्हणितला | तरी उणे सहजे
उपहासला | प्रार्थ कायी || ६५ ||

माऊलींचे थोरपण या ओळीतून व्यक्त होते. यात त्यांनी वाचकांना वडिलांची उपमा देऊन स्वतः बालकाची भूमिका घेतली आहे. लहान मुले बोबडे बोलते; परंतु त्याचा आनंद आई-वडिलांना होतो. तसेच माझ्या ह्या ग्रंथाचा आस्वाद त्रुटी सहन करून तुम्ही घ्यावा ही विनंती माऊली करतात.

४) जैसे चेष्टे सूत्राधीन | दारूयंत्र ||८१||
तैसा मी अनुग्रहितु | साधुंचा निरुपित |
ते आपुतलियापरी अलंकारितु भलतयापरी ||८२||

आपले सदगुरू श्री निवृत्तीनाथ यांना ग्रंथ लिहिण्यासाठी मला शक्ती द्यावी. कारण तुमचाच अनुग्रहित शिष्य आहे, अगदी कळसूत्री बाहुलीला नाचवले जाते तसा मी फक्त निमित्त आहे |

५) पतिव्रतेचे हृदय | जैसे पतिवाचून न स्पर्शी |
मी सर्वस्व यातैसे | सुभटासी ||१११||

आपले सैन्य किती एकनिष्ठ आहे, याबद्दल दुर्योधन सांगतो. त्यात माऊलींनी पतिव्रतेचे उदाहरण दिले आहे. पतिव्रता स्त्री पतीशिवाय दुसऱ्या पुरुषाचा स्पर्श सहनच करू शकत नाही, तसे दुर्योधनाचे सैन्य एकनिष्ठ आहे.

६) नविये आवडीचेनि भरे | कामुक निज वनिता विसरे |
मग पाडेविण अनुसरे | भ्रमला जैसा |

अर्जुनाची वीरवृत्ती गेली व कारुण्य निर्माण झाले, हे माऊलींना सांगायचे त्यासाठी त्यांनी विषयांध माणसाचा दाखला दिला आहे. दुसरी सुंदर स्त्री मनात भरली, तर तो स्वतःच्या स्त्रीला विसरतो म्हणजे भ्रम झालेल्या स्थितीत स्त्रीच्या नादी लागतो. अर्जुनाचा हा विषाद याप्रमाणे आहे.

७) जैसा भ्रमर भेदी कोडे | भलतेसे काष्ठ कोरडे |
परी कळीकेमाजी सापडे | कोवाळिये ||२०१||

अर्जुनाला आपल्या आप्तस्वकीयाबद्दल झालेला मोह किती कठीण आहे. भ्रमर कठीण लाकडाला भोक पाडतो, तोच भ्रमर कमलदलामध्ये मिटलेल्या अवस्थेत राहतो. मग त्याला मात्र भोक पाडू देत नाही. अर्जुनासारखा योद्धा या भ्रमरासारखा कोमल वृत्तीचा झाला आहे.

८) जैसा नखाग्री व्याळू लागे | तो शिखांत |
व्यापी वेगे | तेवी आब्रम्ह कुळ अवघे |
आप्लविजे ||२५६||

अर्जुन श्रीकृष्णाला या युद्धात आप्तस्वकियांचा वध केल्यामुळे पाप लागेल व ते माझ्या आधीच्या सर्व पूर्वजांना पण व्यापून टाकेल, हे सांगताना माऊली सर्पदंशाचा दाखला देतात. नखाला जरी सापाने दंश केला तरी संपूर्ण शरीरात ते विष कसे पसरवतो, त्याप्रमाणे मला तर पाप होईलच; पण ते पूर्वजांना पण सोडणार नाही. हे यातून माऊलींना सूचित करावयाचे आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - -

# अध्याय २ रा

# (सांख्य योग)

९) जैसी बीजे सर्वथा आहाळली । ती सुक्षेत्रीजऱ्ही पेरिली ।
तरी न विरुढती सिंचिली । आवडे तैसी ॥६६॥

आपला मोह दूर करण्यासाठी अर्जुन श्रीकृष्णाला विनवणी करीत आहे. दुसऱ्याच्या उपदेशाचा माझ्यावर परिणाम होणार नाही. जसे बीज भाजले व ते पेरले तर कितीही पाणी द्या त्याला अंकुर फुटणार नाहीत. अर्जुनाच्या या अवस्थेचे वर्णन माऊलींनी या बी द्वारे केले आहे. मला फक्त देवा तुझ्याच उपदेशाचा फायदा होईल हा त्याचा आशय-

१०) जैसे मातेच्या कोपी थोकुले । स्नेह आथी ॥८८॥
की औषधाचिया कडुवटपणी । जैसी अमृताची
पुरवणी । ते आहाच न दिसे परी गुणी प्रकट होय ॥८९॥

अर्जुनाला जो उपदेश श्रीकृष्ण करणार त्याचे भाष्य करतांना माऊलींनी दोन उदाहरणे दिली आहेत. आई रागावते पण त्यात तिचा

स्नेह असतो, औषध कडू असते पण त्यातील बरे होण्याचा गुण अमृतासमान असतो. तो वरवर दिसत नाही म्हणून देवाचे बोलणे कठोर असेल तरी हितकर असेल हे माऊलींना सुचवायचे आहे.

११) सलिली पय जैसे । एक होऊनी मीनले असे ।
परी निवडूनि राजहंस । वेगळे किजे । ॥१२७॥
की अग्निमुखे किडाळ । तोडोनिया चोखाळ ।
निवडिती केवळ । बुद्धिमंत ॥१२८॥

आपल्या देहामध्ये चैतन्य गुप्त स्वरुपात आहे हे समजावून सांगताना माऊलींनी दुधाचा व अशुद्ध सोन्याचे उदाहरण दिले आहे. दूध व पाणी एकरूप असते, पण राजहंस ते वेगळे करतो. सोनार हिणकस सोने अग्नीत घालून शुद्ध करतो अगदी त्याप्रमाणे ज्ञानी पुरुष प्रपंच दूर सारून ब्रह्मतत्त्वाचा स्वीकार करतो.

१२) का पूर्ण कुंभ उलंडला । तेथे बिंबिकारु दिसे भ्रंशाला ।
परी भानु नाही नासला| तयासवे ॥१४१॥

शरीराचा नाश झाला तरी आत्मतत्त्वाचा नाश होत नाही हे समजावून सांगताना माऊली पाण्याने भरलेल्या घड्याचा । मडक्याचा

दाखला देतात. त्या पाण्यात सूर्याचे प्रतिबिंब होते पण घडा पूर्ण रिकामा केला तर प्रतिबिंब दिसत नाही. मग सूर्यच नाहिसा झाला का? नाही. तसेच आत्म्याचे आहे. किती सहजतेने हे माऊलींनी हे समजावले आहे.

जैसे सरिता ओघ समस्त | समुद्रामाजी मिळत |
परी माघौते नसमात| परतले नाही || १७५ ||
तैसिया योगिश्वरांचिया मती | मिळणीसवे एकवटती |
परी जे विचारूनि पुनरावृत्ति | भजतीचिना || १७६ ||

ज्याप्रमाणे नद्या समुद्रात मिळाल्यावर त्यात मिसळल्या जातात; परंतु त्या परत मात्र येत नाहीत, अगदी याप्रमाणेच थोर योग्यांच्या बुद्धीला आत्मस्वरुपाचा साक्षात्कार होताच ते योगी मद्रूप होतात. त्यानंतर ते पुन्हा देहभानावर सहसा येत नाही.

क्षत्रिये बहुत पुण्य कीजे | तै झुंज ऐसे लाहिजे |
जैसे मार्गे जाता आडळिजे | चिंतामणी || १९४ ||
ना तरी जांभया पसरे मुख | तेथ अवचटे पडे पियुख |
तैसा संग्रामु हा देख | पातला असे || १९५ ||

अर्जुन क्षत्रिय असल्याने लढायची ही संधी त्याने चुकवू नये, हे सांगताना भगवान सांगतात, मोठया पुण्याइने क्षत्रियांना युद्ध करण्यास

मिळते. आपण चालत राहून ठेच लागावी व त्यात या ठेचीमुळे चिंतामणीचा लाभ व्हावा, तसा तू या लढाईचा फायदा घे. एखाद्याने जांभई द्यावी, त्यात अकस्मात अमृत तोंडात पडावे, अगदी याप्रमाणे हे युद्ध आले असे समज.

जैसा सिंहाचिया हांका | युगांतु होय मदमुखा |
तैसा कौरव अशेखा || धाकु तुझा || २१५ ||

अर्जुनाला युद्धाला तयार करण्यास अनेक प्रकारे समजवताना सिंहाच्या गर्जनेची व हत्ती त्याला कसा घाबरतो हे सांगून कौरवाला तुझ्या पराक्रमाचा धाक बसला आहे हे वेगळ्या प्रकारे समजावले आहे.

जया बुद्धियुक्ता | जाहलिया पार्था |
कर्मबंधु सर्वथा | बांधू न पवे || २३१ ||
जैसे वज्रकवच लेईजे | मग शस्त्रांचा वर्षाव साहिजे |
परी जैतेसी उरिजे | अचुंबित || २३२ ||

ज्या बुद्धीला निष्काम कर्म योग साधला, तर त्याला कर्माचे बंधन बांधू शकत नाही यासाठी वज्रासारखे चिलखत घातले तर शास्त्रांच्या

बाणांचा / वर्षाव सहन करता येतो, मग शस्त्राचा स्पर्शही न होता विजयी होता येते.

जैसा प्रगटलिया गभस्ती | अशेषही मार्ग दिसती |
तरी तेतुलेहि काय चालिजती | सांगै माज || २६१ ||
का उदकमय सकळ | जऱ्ही जाहले असे महीतळ |
तरी आपण घेणे केवळ | आर्तीचि जोगे || २६२ ||
तैसे ज्ञानीये जी होती | ते वेदार्थाते विविरिती |
मग अपेक्षित ते स्वीकारिती | शाश्वत जे || २६३ ||

ज्ञानी वेदांची आज्ञा विचारात जरूर घेतात, पण त्यातील अपेक्षित शाश्वत तेच स्वीकारतात. यासाठी सुर्योदय व पाण्याची उपमा देऊन समजावले आहे. सुर्योदय झाल्यावर आपल्याला सगळेच रस्ते दिसतात. मग आपण काय सगळ्याच रस्त्यांनी जात नाही. पृथ्वीवर पाण्याचा किती साठा आहे! पण आपण पाहिजे तेवढेच पाणी घेतो. त्याप्रमाणे इष्ट तेच वेदज्ञान स्वीकारावे हा याचा अर्थ.

१३) अगा गोक्षीर जरी जहाले | तरी पथ्यासि नाही म्हणितले |

ऐसेनिही विषहोय सुदले| नवज्वरी देता ||१८४||

युद्धाच्या प्रसंगी तुझा मोह चुकीचा आहे. भलते काही योग्यवेळी केले तर ते अनुचित असते, हे श्रीकृष्ण अर्जुनाला समजावून सांगत आहेत. वरील दृष्टांत यासाठी माऊलींनी वापरला आहे. गाईचे दूध कितीही चांगले असले तरी जर पथ्य असेल तर ते घेऊ नये. ते विषवत होते. तसाच अर्जुनाचा मोह विनाशास कारणीभूत होईल हे माऊलीला यातून सांगायचे आहे.

१४) जैसी भ्रातारेहीन वनिता | उपहती पावे सर्वथा |

तैशी दशा जिविता स्वधर्मेविण ||१९९||

अर्जुना, तुझा स्वधर्म क्षत्रियाचा आहे. युद्ध करण्यातच क्षत्रियाचा स्वधर्म असतो, हे सांगताना पति नसलेल्या स्त्रीचा लोक अनादर करतात. स्वधर्माशिवाय प्रत्येकाची अशी स्थिती निर्माण होते. म्हणून तू तुझ्या स्वधर्माचे पालन कर.

१५) देखै स्वधर्मु हा आचरता | दोषु नाशे असता

तुज भ्रांति हे कवण चित्ता | पातकाची ||२२२||

सांगै प्लवेचि काय बुडिजे | का मार्गी जाता आडाविजे |
परि विपाये चालो निणिजे | तरी तेही घडे ||२२३||

अर्जुन स्वधर्माच्या आचरणाने दोषांचा नाश होतो. मग तुला युद्धामुळे पातक लागेल हा भ्रम तुझ्या चित्तात कसा निर्माण झाला, हे सांगताना नावेचे उदाहरण दिले आहे. नावेत बसल्यावर बुडण्याची भिती कसली? सरळ रस्ता असेल तर ठेच कशी लागेल? हा तुम्हालाच चालता येत नसेल तर तुम्ही सरळ रस्ता असला तरी नीट चालणार नाही. त्यामुळे तू स्वधर्माचे आचरण कर. नाव ही जणू स्वधर्मच आहे किंवा योग्य रस्ता सुद्धा स्वधर्माचाच असावा हा संकेत भगवान सांगतात.

१६) जैसी दीपकळीका धाकुटी |
परी बहु तेजातेप्रकटी |
तैसी सदबुद्धी हे थेकुटी | म्हणो नये ||२३५||

गीतेमध्ये निश्चयात्मक बुद्धीचे वर्णन केले आहे. त्यावर भाष्य करताना माऊलींनी हा अतिशय सुंदर दृष्टांत दिला आहे. दिव्याची ज्योत लहान असली तरी चांगल्या प्रकारे प्रकाश देते. तशीच सदबुद्धीला कमी लेखू नये. तिच्या उदयाने माणसाच्या उत्कर्षाला सुरुवात होते.

सदबुद्धिचा कमी प्रमाणात जरी उदय झाला तरी तिचे सामर्थ्य प्रचंड आहे. तिला कमी लेखून चालणार नाही.

१७) जैसी रांधवणी रससोय निकी | करूनिया मोले विकी |
तैसा भोगासाठी अविवेकी| धाडिती धर्मु ||२५४||

सुख उपभोगासाठी अविवेकी लोक धर्माला घालून बसतात. थोडक्यात असे वागणे अधर्मच. सुगरण स्त्रीने अतिशय उत्तम स्वयंपाक केला व पक्वान्ने केली. पण ती पैसे मिळतील म्हणून विकून टाकली तर काय उपयोग? अधर्मी लोकांचे वागणे कसे असते याकरिता हा साधा सोपा दाखला माऊलींनी दिला आहे. उत्तम स्वयंपाकाचा स्वतः कधी उपभोग घेणार? तसे तुझे शौर्य काय उपयोगाचे?

१८) जो सर्वत्र सदा सरिसा | परिपूर्णु चंद्र का जैसा |
अधमोत्तम प्रकाशा | माजी न म्हणे ||२९७||

स्थितप्रज्ञ हा समबुद्धीने वागतो ते सांगताना माऊलींनी चंद्राचे उदाहरण दिले आहे. चंद्र प्रकाश देताना उत्तम/अधम असा भेद करीत नाही. सर्वांना सारखाच प्रकाश देणारा चंद्र व स्थितप्रज्ञ एकाच वृत्तीचे, हे माऊली सांगतात.

१९) जैसी वरिवरि पालवी खुडिजे |

आणि मुळी उदक घालिजे |

तरी कैसेनि नाशु निपजे तया वृक्षा ||३०५||

रसेन्द्रियांचे विषय सुद्धा नाहीसे व्हायला हवे. बाकी विषय सुटतात, पण जीभेचे चोचले मात्र सहसा संपत नाही, हे समजावून सांगताना माऊलीने बहारदार दाखला दिला आहे. झाडाची वरची पाने/फांद्या तोडल्या व पाणी दिले तर ते वाढेलच ना; त्याला मुळासकट उखडले तर त्याचा नाश होईल. तशी विषयांची गोडी ही मनापासून नाहीशी व्हायला हवी. किती सोप्या उदाहरणातून विषय निवृत्ती सूचित केली आहे.

२०) म्हणोनि आई के अर्जुना | जैसा विस्फुलिंग लागे इंधना |

मग तो प्रौढ जालिया त्रिभुवना पुरी शके |

तैसे विषयांचे ध्यान | जरी विपाये वाहे मन |

तरी येसणे हे पतन गिवासित पावे ||३३०||

विषयाचे मनात किंचित जरी स्मरण केले तरी आपला नाश होणे क्रमप्राप्त आहे, हे समजावून सांगण्यासाठी लाकडाला ठिणगी लागली तर त्या ठिणगीने भयंकर आग होऊन त्रिभुवन व्यापून टाकू शकते म्हणून

विषयाचे थोडे सुद्धा चिंतन बाधकच आहे. एक साधी ठिणगी काय करते तसेच विषयांचे नुसते स्मरण आत्मनाशाला कारणीभूत ठरू शकते.

२१) जैसा निर्वातीचा दिपु | सर्वथा नेणे कंपु |
तैसा स्थिरबुद्धी स्वस्वरूपी योगयुक्तु ||३४१||

योगयुक्त झालेल्या पुरुषाची स्थिती स्वस्वरूपात मग्न असते. जसा जिथे वारा लागणार नाही तिथे ठेवलेला दिवा व त्याची ज्योत हलत नाही म्हणजे स्थित असते. स्थिरबुद्धी झालेल्या माणसाचे वर्तन असे असते.

२२) देखे कूर्म जियापरी | उवाइला अवेव पसरी |
ना तरी इच्छावशे आवरी आपणपेचि ||३५२||

स्थितप्रज्ञ माणसाची बुद्धी समजावून सांगताना माऊलींनी कासवाचे उदाहरण दिले आहे. कासव आपले अवयव जसे पसरून चालते व मनात आले की, आवरून घेते. इंद्रियांचे नियमन स्थितप्रज्ञ अशाप्रकारे करतो. **आपल्यालाही इंद्रियांचे नियमन कासवाप्रमाणे करता आले पाहिजे**.

- - - - - - - - - - - - - - - - - - -

# अध्याय ३ रा

# कर्मयोग

२३) दैखै रोगाते जिणावे | औषध तरी देयावे |
परी ते अति रुच्य व्हावे | मधुर जैसे ||

तिसऱ्या अध्यायाची सुरुवात अर्जुनाच्या प्रश्नाने होते. देवा तुझा उपदेश मला संभ्रमात टाकतो. मला पटेल रुचेल असे सांग. याबद्दल माऊलींनी औषधाची उपमा दिली आहे. रोग बरा व्हायचा असेल तर औषध द्यावे लागते. परंतु ते औषध रुचकर वा गोड असेल तर सहज घेता येते व मग त्यातून रोग ही बरा होतो. अशाप्रकारे मला सांग, ही विनंती अर्जुन करतो. उपदेश मला रुचेल व फायदाही होईल अशी अपेक्षा माऊली याद्वारे व्यक्त करतात.

२४) जैसे मातेच्या ठायी | अपत्या अनवसरू नाही |
स्तन्यालागुनि पाही जियापरी ॥२९॥

अर्जुनाने श्रीकृष्णाला आईची उपमा देऊन विनवणी केली आहे.

आईला बाळाला स्तनपान करायचे असेल त्यावेळी तिला वेळ/अवेळ असत नाही. मला समजावून सांगताना तुही आईसारखेच वागावे अशी माझी अपेक्षा आहे.

२५) सांगै पैलतीरा जावे। ऐसे व्यसन का जेथे पावे |
तेथ नावेते त्यजावे | घडे केवी ||४७||

निष्कर्म अवस्था साधण्यासाठी माऊलींनी नावेचे उदाहरण दिले. पलीकडच्या किनाऱ्यावर जायचे पण नावेने जायचे नाही असे ठरविले तर कसे चालेल? कर्माचा त्याग करून चालणार नाही. हे माऊलींना सांगावयाचे आहे.

ना तरी तृप्ति इच्छिजे | तरी कैसेनि पाकु न कीजे |
की सिद्धुहि न सेविजे | केवीं सांगै?
जव निरार्तता नाही | तव व्यापारू असे पाही |
मग संतुष्टीच्या ठायी | कुंठे सहजे || ४९ ||

कर्माचा आरंभ न करता सिद्धता कशी प्राप्त होणार? यासाठी माऊलींनी भोजन व तृप्तीचे साधे उदाहरण दिले आहे. भोजन करून तृप्त

व्हायचे तर स्वयंपाकाचा त्याग करून भागेल का? स्वयंपाक तयार असेल तर न खाता जाता येईल का? या न्यायाने चित्त पूर्णपणे निरिच्छ होत नाही तोपर्यंत कर्माचे व्यापार करावेच लागतील. आत्मतृप्ती झाली की, मग कर्म करणे आपोआपच थांबेल.

जे सायासे स्तन्य 'सेवी | ते पक्वाने केवी जेवी |
म्हणौनि बाळका जैवी नेदावी | धनुर्धरा || ७२ ||
तैसी कर्मी जया अयोग्यता |तयांप्रति नैष्कर्म्यता |
न प्रगटावी खेळता| आदिकरनी || ७३ ||

लहान मूल आईचे दूध पिते ते बालक पक्वान्ने कशी खाईल? माऊली म्हणतात, आईचे दूध पिणाऱ्याला पक्वान्ने देऊन उपयोग नाही, त्याप्रमाणे ज्याला स्वतःचे कर्म करण्याचीही योग्यता नाही त्याला नैष्कर्म्य स्थितीचे महत्त्व सांगून काय उपयोग? ते सांगूच नये.

देखै खेळता अग्नि लागला |
मग तो न सांवरे जैसा उधवला |
तैसा इंद्रिया लळा दिधला | भला नोहे | २०४ ||

सहज खेळता आग लागली तर ती लवकर आटोक्यात आणता येत नाही त्याप्रमाणे आपण इंद्रियाचे सहजसुद्धा लाड करू नयेत हे चांगले नाही.

बापा विषाची मधुरता | झणे आवडी उपजेचित्ता

परी तो परिमाणु विचारिता | प्राणु हरी || २१२ ||

विषय आपले घात करतात. यासाठी विषाचे उदाहरण दिले. विष गोड लागते, त्यामुळे आवड निर्माण होते परंतु, त्याचा परिणाम काय होतो? शेवटी विष हे प्राण घेतेच. विषयांचेही असेच आहे.

देखै इंद्रियी कामु असे | तो लावी सुखदुराशे

जैसा जळी मीनु आमिषे | भुलविजे गा || २१३ ||

इंद्रियांच्या ठिकाणी काम आहे, विषय वासना आहेत. त्या आपल्याला खोटया सुखाचे आमिष दाखवून फसवतात. मासे पकडताना गळाला खायचे लावून त्या आमिषाला मासा बळी पडतो व फसतो. दुसरे उदाहरण हरणाचे दिले आहे, ते पाहू या.

जैसा कवळोनिया पारधी | घातेचिया संधी |

आणि मृगाते बुद्धि साधावया || २१६ ||

हरणाला पकडण्यासाठी पारधी चहूबाजूंनी त्याला वेढा घालतो व घात करतो व हरणाला पकडतो. विषयात आपण असेच अडकतो.

हा गा साकर आणि दूध |

हे गौल्य कीर प्रसिद्ध | परी कृमिदोषी विरुद्ध

घेपे केबी || २२६ ||

साखर व दूध हे दोन्ही गोड पदार्थ आहेत. पण जंत झाले तर त्याचे सेवन घातच करेल, हे उदाहरण परधर्माचे आचरण हितकारक नाही यासाठी दिले आहे. यानंतर कामक्रोध कसा नाश करतात, त्यासाठी खालील ओव्या पाहू.

हे जळेवीण बुडविती | आगीवीण जाळिती ||

न बोलता कवळिती | प्राणियाते || २५७ ||

हे शस्त्रेवीण साधिती | दोरेवीण बांधिती |

ज्ञानियासी तरी वधिती | पैज घेऊनि || २५८ ||

आपण पाण्यात बुडतो. काम, क्रोध आपला नाश करतात. त्यांना बुडवायला पाणी लागत नाही. अग्नि नसताना जाळतात व प्राणिमात्राला बरोबर कवळून घेतात. आपल्याला ठार करायला शस्त्राचा वापर करावा लागतो, पण काम-क्रोध शस्त्राशिवाय नाश करू शकतात. दोराने बांधले जातो. पण काम-

क्रोधाला आपल्याला बांधायला दोराचीही गरज नाही. आपल्या सामान्य माणसाचे सोडा पण ज्ञानियांचा सुद्धा हे काम-क्रोध अगदी पैज लावून घात करतात.

हे अंतरीहूनि जरी फिटेल |
तरी निभ्रांत जाण निवटले |
जैसे रश्मीवीण उरले | मृगजळ नाही || २७० ||

कामक्रोध हे अंत:करणातून पूर्णपणे नाहीसे झाले पाहिजेत. मगच ते गेले हे समजावे. त्यासाठी मृगजळाचे उदाहरण दिले आहे. सूर्यकिरण आहेत, म्हणून मृगजळ आहे. पण सूर्यकिरणच नसती तर मृगजळही नाही. कामक्रोध त्याचा नाश झाला की, आत्मस्वरूपासाठी मग काही अडचण नाही.

२६) का उचलिले वायुवशे । चले शुष्क पत्र जैसे |
निचेष्ठ आकाशे परिभ्रमे ॥६१॥

कर्म हे परतंत्र आहे. आपल्या स्वाधीन नाही. शरीर आले मग कर्मेंद्रिय कर्म करणारच. यासाठी वाळलेले पान खाली पडले. वारा आला तर ते आकाशात फिरत राहते. कर्माची गती ही वाळलेल्या पानासारखी आहे. म्हणून कर्म टाळण्याच्या भानगडीत मनुष्याने पडू नये.

आपण या उदाहरणाप्रमाणे कर्माच्या बाबतीत पराधीन आहोत, हे साध्या गोष्टीतून माऊली सुचवितात.

२७) जैसी जाली जले न शिंपे पदमपत्र ||७१||

आसक्त न होता कर्म करणारा योगी महत्वाचा वाटतो. त्यासाठी माऊलींनी कमळाची उपमा दिली आहे. कमळ पाण्यात राहून पाण्याने लिप्त होत नाही. तसे कर्माबाबत इंद्रियांचे नियमन करावे म्हणजे कर्माची आसक्ती असू नये व कर्मही टाळू नये. कमळ पाण्यात राहते. पण त्याने लिप्त होत नीही.

२८) अहेतुक चित्ते अनुष्ठा पा ययाते | पतिव्रता पतीते जीयापारी ||९२||

स्वधर्माचरणरूप यज्ञ करण्यास ब्रह्मदेवाने सांगितले या श्लोकाच्या निरूपणावर माऊलींनी सोप्या भाषेत विशद केले आहे. कोणताही हेतु मनात न ठेवता या स्वधर्माचे आचरण करावे. पतिव्रता स्त्री पतीची सेवा करते. तिचा हेतु काहीही नसतो; पण तिची वृत्ती पतीबाबत दृढ एकनिष्ठता असते.

२९) जैसे जळचरा जळ सांडे | आणि तत्क्षणी मरण मांडे |

हा स्वधर्मु तेणे पाडे | विसंबो नये ||१७||

आपला स्वधर्म सोडू नये, त्यामुळे काय होते, याबद्दल मासे पाणी सोडून राहू शकत नाहीत. जर पाण्यातून त्यांना काढले तर त्यांचे मरण अटळ आहे. तिसरा अध्याय कर्म, विकर्म व निष्कर्म यांवर असल्याने साध्या भाषेत समजावण्याचा माऊलींचा प्रयत्न मनाला खूपच प्रभावित करतो व धर्माचे आचरण केले नाही तर अवस्था माशांप्रमाणे होईल. स्वधर्म हा माशांना लागणाऱ्या पाण्याप्रमाणे आहे.

३०) मार्गी अंधासरिता | पुढा देखणाही चाले जैसा |
अज्ञाना प्रगटावा धर्मु तैसा | आचरोनी ||५६||

ज्ञानी व लोकसंग्रह असणाऱ्या जनक राजांनी कर्म कसे केले यावरचे भाषण माऊलींनी किती सुंदर रीतीने केले आहे. आंधळा रस्त्यावर चालताना डोळस माणसाचा हात धरतो, म्हणजे त्याच्याबरोबर चालता येते. जगातील अशा ज्ञानी लोकांनी अज्ञानाला स्वतःच्या आचरणातून धर्म शिकवावा. जनक राजाचे उदाहरण बोलके आहे. राजाची कर्तव्ये पार पाडताना आध्यात्मिक पातळीचे शिखर गाठणारा जनक राजा खरंच विरळा! जनक राजा लोकसंग्रह असूनसुद्धा त्यापासून क्षणात अलिप्त होऊन आत्ममग्न होत असे. तसे ज्ञानी पुरुषांचे वर्तन असावे. ज्याने अज्ञानी पुरुषांना त्या वागणुकीचा फायदा होईल हेच या उदाहरणावरून भगवान सांगतात.

३१) जैसी बहुरूपियांची रावो राणी |
स्त्री पुरुष भावो नाही मनी |
परी लोकसंपादणी तैशीच करती ||७६||

लोकांच्या कल्याणाकरिता कर्माचरण केले तर त्याचे बंधन लागत नाही. यासाठी बहुरुप्याचे रूपक दिले आहे. बहुरूपी कधी स्त्री पात्र करतो, कधी पुरुषांची विविध पात्रे करतो. परंतु मनापासून ती भावना तो ठेवत नाही. लोकांच्या मनोरंजनासाठी व स्वतःच्या अर्थार्जनासाठी तो हे करत असतो. ज्यांचा समाजात मोठा संपर्क आहे त्यांनी कसे वागावे हे किती सहजपणे माऊली सांगतात. लोकसंग्रहासाठी विविध रूपे घेऊन समाजात वावरावे.

३२) सांगै पतंगु काय साहती प्रकाशाते ||२००||
पतंगा दीपी अलिंगन | तेथ त्यासी अचूक मरण |
तेवी विषयाचरण | आत्मघाता ||२०१||

विषयांच्या आचरणाने आपला आत्मनाश कसा होतो, हे सांगताना दिव्याभोवती फिरणाऱ्या पतंगाचे उदाहरण दिले आहे. दिव्याचा प्रकाश त्याला सहन होत नाही; पण प्रकाशाचा मोहही त्याला आवरता येत नाही. दिव्याची भेट व त्याला आलिंगन म्हणजे त्याचे

मरणच ना! माणसाचे तसेच आहे. विषयाच्या संगाने आत्मवृद्धी होत नाही, आत्मनाश होतो, हे यातून सुचवायचे आहे.

३३) तरी लोकांची धवळारे | देखोनिया मनोहारे |
असती आपुली तणारे | मोडावी केवी ||२२३||
हे असो वनिता आपुली | कुरुप जरी जाहली |
तऱ्ही भोगीत तेचि भली | जियापरी ||२२४||

परधर्म सुखावह वाटला तरीही स्वधर्माचे आचरण करावे याकरिता माउलींनी अनेक उदाहरणे दिली आहेत आपण दुसऱ्यांची सुंदर छान छान घरे पाहतो मग काय त्यासाठी आपली साधी गवताची झोपडी असेल तर ती मोडावी का? इथेच माऊली थांबत नाही, आपल्याला हे समजले नाही की काय असे वाटून असो म्हणतात व आपली पत्नी सुंदर नसली तरी तिच्या बरोबरच सुखाने संसार करावा. माऊलीचे दृष्टांत व दाखले सुद्धा जीवनाचे तत्वज्ञान बनून जाते. यानंतर सुद्धा लागोपाठ अनेक उदाहरणे दिली आहेत.

- - - - - - - - - - - - - - - - - - -

# अध्याय ४ था

# (ज्ञानसंन्यास योग)

३४) चौथ्या अध्यायाची भगवान श्रीकृष्ण सुरुवात करताना सूर्याला योग प्रथम सांगितला. पुढे राजर्षींनी तो वाचला. पण नंतर तो लोप पावला. याबद्दलची माऊलींची खालील ओळ पहा-

३५) पै चंद्रोदया आरौते | जयांचे डोळे फुटती असते |
ते काऊळी केवी चंद्राने | वोळखती ॥२४॥
तैसी वैराग्याची शिव न देखती |
जे विवेकाची भाषा नेणती?
ते मूर्ख केवी पावती | मज ईश्वराने ||२५||

ज्यांना विवेकाची भाषाच कळत नाही ते मला म्हणजे ईश्वराला कसे ओळखतील? त्यासाठी येथे कावळ्याचा दृष्टांत दिला आहे. चंद्रोदय झाला की कावळ्याचा डोळा मिटतो. मग त्याला चंद्र कसा असतो, हे कसे समजेल? म्हणून योग नष्ट होण्याचे कारण लोकांचे अविवेकी वागणे आहे हे माऊलींना यातून सांगावयाचे आहे.

मी मायेने जन्म घेतो; परंतु मी निर्विकार व जन्मरहित आहे हे समजावून सांगताना कशाची उपमा दिली आहे? पहा, ती ओवी.

की एकची दिसे दुसरे | ते दर्पणाचेनि आधारे |
एरव्ही काय वस्तुविचारे | दुजे आहे? || ४७ ||
तैसा अमूर्तचि मी किरीटी |

परी प्रकृति जै अधिष्ठी || तै साकारवणे नटनटी |
कार्यालागी || ४८ ||

आपण आरशात पाहतो व त्यामुळे २ रुपे दिसतात; परंतु मूळ वस्तूला दुसरे रूप असते का नाही, त्याप्रमाणे भगवान सांगतात, "अर्जुना मी निराकारच आहे व मायेचा आश्रय घेऊन सगुण रूप घेऊन अवतार घेतो".

परि ते बीजे जैसी दग्धली | नुगवतीचि पेरिली |
तैशी कर्मेचि परि तया जाहली | मोक्षहेतु || ८३ ||

मुमूक्षांनी नैष्कर्मामुळे मोक्ष हेतु प्राप्त केला, हे सांगताना त्यांनी भाजलेल्या बी चे उदाहरण दिले आहे. कारण भाजलेले बी पेरले तर ते उगवत नाही, त्याप्रमाणे निष्कर्म स्थितीच त्यांना मोक्षास कारणीभूत

झाली, हे यातून सुचविले आहे. विहित कर्मे जर द्वैत भावना नसेल तर ऐक्यातच विलीन होतात त्यासाठी माऊलींनी अवेळी आलेल्या ढगाचे उदाहरण दिले आहे.

अकाळिची अभ्रे जैशी | उर्मीविण आकाशी |
हारपती आपैशी | उदयली साती || ११७ ||
तैशी विधिविधाने विहिते | जरी आचरे तो समरजे |
तरी तिये ऐक्यभावे ऐक्याते | पावतीचि गा || ११८ ||

आकाशात अवेळीचे ढग काहीही जोर म्हणजे उर्मी न दाखवता आपोआप विरून जातात, त्याप्रमाणे वेदांनी सांगितलेली विहित कर्मे करताना द्वैत भावना नसल्याने जी कर्मे ऐक्यातच लीन होतात.

इतर यज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे, हे सांगताना माऊलींनी तारे व सूर्य यांची उपमा दिली. खालची ओवी पहा.

ते द्रव्यादियागु कीर होती |

परी ज्ञानयज्ञाची सरी न पवती |

जैशी तारातेज संपत्ती | दिनकरापाशी || १५२ ||

द्रव्यादि यज्ञ आहेत खरे, पण त्यांना ज्ञानयज्ञांची सर येणार नाही. आकाशात तारे अनंत आहेत. त्यांचे तेज सूर्यापुढे फिकेच, म्हणजे ताऱ्यांमध्ये सूर्याचे तेज श्रेष्ठ.

ज्ञानावाचून जगणे व्यर्थ हे सांगताना ओसाड घर किंवा प्राण नसलेले शरिर होय.

शून्य जैसे का गृह | का चैतन्यावीणे देह |

तैसे जीवित ते संमोह | ज्ञानहीन || १९३ ||

एखादे ओसाड घर हे घर वाटत नाही किंवा प्राण निघून गेलेले शरीर, हे शरीर आहे असे जाणवत नाही, त्याप्रमाणे ज्ञानापासून जगणे म्हणजे सुद्धा शून्यवतच!

शांतीरसाने मी पुढचा अध्याय सांगणार त्याच्या शब्दाची व्याप्ती याचा अनुभव घे, असे सांगताना माऊली सूर्याच्या प्रतिबिंबाचे व सूर्याच्या खऱ्या तेजाचे उदाहरण देतात.

जैसे बिंब तरी बचके एवढे |
परि प्रकाश त्रैलोक्य थोकडे |
शब्दांची व्याप्ति तेणे पाडे |
अनुभवावी || २१४ ||

माऊलींना शांतीरसामुळे होणारा अनुभव शब्दरूपाने मी प्रकट करणार आहे. त्याची व्यापकता/गंभीरता याची कल्पनाच करता येणार नाही. सूर्याचे प्रतिबिंब पाण्यात पडते ते आपल्याला लहान वाटते, आपल्या हातात मावेल असे भासते; परंतु त्याचा प्रकाश तिन्ही लोकांना व्यापूनही उरतो तशी शांतीरसाच्या शब्दांची व्यापकता आहे.

श्रवणसुखाचा लाभ आपोआप मिळत असेल तर तो का घेऊ नये, यासाठी माऊली साखरेचा दृष्टांत देतात.

आधीच साखर आवडे | तेचि जरी ओखदी जोडे |
तरी सेवावी ना का कोडे | नावानावा || २१८ ||

साखर सर्वांनाच आवडते, पण तीच औषध म्हणून मिळाली तर मग आनंदाने का खाऊ नये. श्रवणामध्येच जर मोक्ष मिळतो तर तो का घेऊ नये.

३६) सांगै पितळेची गांधिकाळिक। जै फिरली होय नि:शेष |

तै सुवर्ण काई आणिक | जोडू जाईजे ||६४||

आत्मज्ञानाने जे संतुष्ट होतात ते मद्रूप होतात. त्यासाठी त्यांना पितळ व सोने याचा दाखला दिला आहे. पितळाला गंज व काळीमा लागतो. तो दोष जर दूर झाला तर सोने कशाला हवे? माणसाचे दोष निघून तो आत्मज्ञानी झाला तर माझ्या स्वरूपात विलीन होईल. आपण दोषरहित होण्याचा प्रयत्न करावा.

३७) जैसे क्षेत्री जे पेरिजे। ते वाचून आन न निपजे |

का पाहिजे तेचि देखिये | दर्पणाधारे ॥७४॥

इच्छित देवतांची उपासना केल्यावर ते फळ प्राप्त होते ते सगळे मीच मिळवून देतो हे भगवान सांगतात. पण लोकांना हा भेद वाटतो. आपण जे पेरतो, तेच उगवते दुसरे नाही. आरशात आपण पाहतो. आपण जसे आहोत तसेच दिसते, त्याप्रमाणे इष्टदेवतेच्या उपासनेचे फळ मिळते, हे माऊलींनी साध्या उदाहरणातून सांगितले आहे. उपासनेचे फळ हे आत्मस्वरूपाचे ज्ञान होय.

३८)  चौथ्या अध्यायात नैष्कर्मावर भर दिला आहे. त्यासाठी माऊलींच्या खालील ओळींच्या आधारे आपल्याला नैष्कर्म म्हणजे काय हे समजायला सोपे जाते.

जैसा का जळापाशी उभा ठाके |
तो जरी आपणपे जळामाजी देखे |
तरी तो निभ्रांत वोळखे | म्हणे मी वेगळा आहे ||९६||
अथवा नावे हन जो रिगे |
तो थडियाचे रूख जाता देखे वेगे |
तेचि साचोकारे जो पाहो लागे |
तव रूख म्हणे अचळ ||९७||
तैसे सर्व कर्मी असणे |
ते फुडे मानूनि वायाणे |
मग आपणया जो जाणे नैष्कर्म्यु जैरू ||९८||
जैसे न चालता सूर्याचे चालणे |
तैसे नैष्कर्म्यत्व जाणे कर्मीची असता ||९९||

एखादा माणूस जलाशयाजवळ उभा आहे व पाण्यात पाहतो. त्याला मी हा वेगळा आहे म्हणजे प्रतिबिंब नाही हे कळते. आपण

नावेतून चाललो तर झाडे चालताना दिसतात; पण खरे पाहता ती स्थिर असताना आजकाल आपण एस.टी. व रेल्वेने प्रवास करतो त्यावेळी हे भासतेच ना! तसेच मी या कर्माचा कर्ता नाही सर्व कर्मे एक आभास आहेत ही अवस्था म्हणजेच नैष्कर्म होय. पुढे जाऊन माऊलींनी सूर्याचे उदाहरण दिले आहे. शास्त्रज्ञांना सूर्य स्थिर आहे हे शोधायला किती वर्षे लागली. पण माऊलींनी अगदी सहज सूर्याचे चालणे हे भासणे हा भ्रम आहे. सूर्य तर स्थिर आहे. ज्यांनी नैष्कर्म्य सिद्धी प्राप्त केली त्यांनी कर्मे ही भासमान आहेत हे जाणले आहे. सूर्याचे हे उदाहरण नैष्कर्म या सिद्धांताचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

३९) जैसी अमृताची चवी निवडिजे |
तरी अमृताचिसारिकी म्हणिजे |
तैसे ज्ञान हे उपमित्रे | ज्ञानेसिच |

ज्ञानाला खरे म्हणजे उपमा नाही. हे ज्ञान म्हणजे स्वस्वरूपाचे आत्मज्ञान. त्यासाठी माऊलींनी उपमेय अलंकार याचा वापर केला आहे. अमृताच्या गोडीला दुसऱ्या गोडीची उपमा कशी देता येईल, त्याप्रमाणे योगी जे ज्ञान प्राप्त करतात त्यासारखे दुसरे पवित्र ज्ञान कसे असू शकेल? ते ज्ञान अनुपमेय आहे त्याला दुसरी उपमा नाही.

४०) जया काळज्वरू आंगी बाणे |

तो शीतोष्ण जैशी नेणे |

आगी आणि चांदणे सारसेचि मानी ||९९||

ज्याला विषमज्वर झाला आहे त्याला थंड व उष्ण याचा फरक कळत नाही. तसाच संशयग्रस्ताला विवेक/अविवेक, खरे/खोटे कळत नाही. शंकाविरहित असावे. मग ज्ञानाला प्रतिबंध येत नाही.

४१) जरी मंत्रेचि वैरी मरे | तरी वाया का बांधावी कटारे?

रोग जाय दूधसाखरे | तरी निंब का पियावा?

एथ मोक्ष असे आयता श्रवणचिमाजी ||२२३||

चौथ्या अध्यायाची समाप्ती करताना माऊली म्हणतात, तुम्हाला फक्त श्रवण करायचे आहे. यात कष्ट कसले? त्यातच तुम्हाला मोक्ष आहे. अहो मंत्राने वैरी मरत असेल तर शस्त्रे कशाला बाळगायची? दूध व साखरेने रोग बरा होतो तर कडूलिंबाच्या रसाचे सेवन का करायचे? म्हणजे विनासायास श्रवणभक्तिनेच जर मोक्षप्राप्ती होते, तर मग इतर बाह्य कष्टपद उपचार कशाला करता, हे माऊलींना सांगावयाचे आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - -

# अध्याय ५ वा

# कर्मसंन्यास योग

५ व्या अध्यायाची सुरुवात अर्जुनाच्या प्रश्नाने झाली. कर्माचा त्याग की, कर्म निश्चित काय ते सांगा. भगवान यासाठी पुढील ओवी माऊली देतात.

जैसे निद्रेचे सुख न मोडे |
आणि मार्गु तरी बहुसाल सांडे |
तैसे सोहोकासन सांगडे | सोहपे होय || ८ ||

आपण प्रवासात जाताना वाहन सहज-साधे-सोपे असेल तर प्रवासात झोप न मोडता प्रवास होऊ शकेल त्याप्रमाणे मला सुलभ साधन सांगा, अशी विनंती अर्जुन भगवानांकडे करीत आहे.

अर्जुनची ही इच्छा पुरी होताना श्रीकृष्ण भगवान संतुष्ट झालेत, त्यांची ही अवस्था माऊलींनी व्यक्त करताना खालील दृष्टांत दिले आहेत.

देखा कामधेनु ऐसी माये | सदैवा जया होये |

तो चंद्रुही परी लाहे | खेळावया || १० ||

पाहे पां श्रीशंभूची प्रसन्नता |

तया उपमन्यूचिया आर्ता |

काय क्षीराब्धि दूधभाता |

देईजेचिना || ११ ||

तैसा औदार्याचा कुरुठा | श्रीकृष्णआपु जाहलिया सुभटा |
का सर्व सुखांचा वसौटा | तोचि नोहावा || १२ ||

आई म्हणून कामधेनु मिळाली तर अशक्य काय आहे? चंद्र खेळायला मागितला तर तोही मिळेल! उपमन्युला शंभू शंकर प्रसन्न झाल्यावर दूध भातासाठी क्षीरसमुद्र दिलाच ना! त्याप्रमाणे औदार्याने परिपूर्ण असलेले श्रीकृष्ण परमात्मा अर्जुनाला प्राप्त झाला आहे. मग त्याच्या इच्छेची पूर्तता होणार नाही का? तर ती होईलच. कर्मयोग श्रेष्ठ कसा? त्यासाठी माऊलींनी नाव, लहान मुले व स्त्रिया यांना जाण्यास सोपी उदाहरणे येथे देतात.

तरी नाणा नेणा सकळा | हा कर्मयोगु कीर प्रांजळा |
जैसी नाव स्त्रिया बाळा | तोय तरणी || १६ ||

जाणत्याला व नेणत्याला कर्मयोग संसाररुपी संसार तरून जाण्यास सोपा आहे, कसा? तर जशी नावही स्त्रियांना व लहान मुलांना पाण्यावरून तरून जाण्यास सुलभ त्याप्रमाणे.

हेच मराठे परियेशी | तरी बालकाची चेष्टा जैशी |
योगिये कर्मे करिती तैशी | केवळा तनु || ५२ ||

लहान मुले जी कर्मे करतात ते मन-बुद्धीला सोडून होत असतात. त्याप्रमाणे **योगी** केवळ शरीराने कर्मे करतात.

ज्ञानी प्राणिमात्रात भेद मानीत नाहीत, त्यासाठी माऊली खालील दृष्टांत देतात.

नातरी अंधकाराची वानी | जैसा सूर्यो न देखे स्वप्नी |
अमृत नायके कानी | मृत्युकथा || ९१ ||
हे असो संतापु कैसा | चंद्रु न स्मरे जैसा |
भूती भेदु नेणती तैसा | ज्ञानिये ते || ९२ ||

सूर्याला स्वप्नात सुद्धा अंधार कसा असतो ते कळणार नाही. अमृताला मृत्यूची कथा कधी ऐकावी लागणार नाही. चंद्राला उष्णता कशी असते हे आठवूनही कळणार नाही. ज्ञानीयांचे असेच आहे. त्यांना भूतमात्रात भेद दिसत नाही.

तरी मृगजळाचेनि पूरे |
जैसे न लोटिजे का गिरीवरे |
तैसा शुभाशुभी न विकरे |
पातलिया जो || १०३ ||

काय दृष्टांत आहे, पहा- मृगजळाला पूर आला असे समजा, तर त्या पुरामध्ये डोंगर, पर्वत वाहून जातील काय? तर नाही. त्याप्रमाणे शुभ-अशुभ गोष्ट मिळाली तरी त्यापासून कोणतेही विकार ज्ञानीयांना होत नाहीत.

सांगै वात वर्ष आतपु धरे |ऐसे अभ्रच्छयाचि जरी सरे |
तरी त्रिमालिके धवळारे | करावी का || ११४ ||

विषयात सुख नाही हे सांगण्यासाठी हा दृष्टांत दिला आहे. वारा, पाऊस ऊन यासाठी जगाची सावली उपयोगी पडेल का? नाही. तसे होत असते तर लोकांनी तीन मजली घरे बांधणे सोडून दिले असते.

आता भुक्ता भोग्य व भोग या त्रिपुटीसाठी छान दृष्टांत माऊली देतात.

अंतरी सुख | एक आथि || १३० ||
परी ते वेगळेपण भोगिजे | जैसे पक्षिये फळचुंबिजे |

तैसे नव्हे विसरिजे | भोगतेपणही || १३१ ||

आत्मसुखाचा भोग हे वेगळेच असते. त्याची रीतच वेगळी. पक्षी फळ खातो म्हणतो म्हणजे **खाणारा पक्षी**. खाण्याचा विषय **फळ** आणि **खाण्याची क्रिया** ही त्रिपुटी दिसते, त्याप्रमाणे ब्रह्मसुख घेताना भोक्ता, भोग्य व भोग ही त्रिपुटी असते. पण हे असे न होता भोक्तेपण ही विसरले तरच आत्मसुखाचा अनुभव येईल.

जे परब्रह्मरुपी अनुभव घेतात ते वृत्तीपर जीवनात नंतर येत नाहीत. त्यासाठी पाणी, नदी व समुद्र यांचा दाखला दिला आहे.

तेथ जैसी रथ्योदके सकळे |
घेऊनी गंगा समुद्री मिळे | मग एकेक वेगळे निवडू नये ||
जेथ हे संसारचित्र उमटे | तो मनोरूप पटु फाटे |
जैसे सरोवर आटे | मग प्रतिमा नाही || १५६ ||

रस्त्यावरचे पाणी गंगेला किंवा नदीला मिळते. पुढे ती समुद्राला मिळते. मग नदीचे पाणी, रस्त्याचे पाणी असे वेगळे करता येत नाही. मनाला वस्त्राची उपमा देऊन माऊली म्हणतात त्यावर हे संसाराचे चित्र उमटलेले आहे ते मनोरुपी वस्त्र आत्मसुखामध्ये शिल्लकच राहत नाही. सरोवरात प्रतिबिंब दिसते पण त्यातील पाणी आटले की प्रतिबिंबही दिसत नाही.

४२) जैसी समुद्री लवण न पडे | तव वेगळे |

अल्प आवडे | मग होय सिंधूचि एवढे | मिळे तेव्हा ||३५||

मन संकल्प रहित झाले की त्या जीवाला एक देशी अवस्था प्राप्त होते अशी अवस्था म्हणजे त्रिभुवनाशी एकरूपता. त्यासाठी मीठ व समुद्र याचे साधे उदाहरण दिले आहे.

मीठ समुद्रात घातले नाही तोपर्यंत ते वेगळे पण एकदा समुद्रात विरघळले की त्याचे स्वतंत्र अस्तित्व संपते. ते व समुद्र एकरूप होतात. आत्मस्वरूपाचे असेच आहे.

४३) दीपाचेनि प्रकाशे | गृहीचे व्यापार जैसे |

देही कर्मजात तैसे | योगयुक्ता ॥४९॥

घरात दिवा लावला तर मग सगळे व्यवहार आपण करतो. दिवा त्यापासून अलिप्तच असतो. ज्ञानी माणसाकडून कर्म होतात तो कर्म बंधनात अडकत नाही. ज्ञानी माणूस कर्मापासून दिव्याच्या व प्रकाशाच्या भेदाप्रमाणे अलिप्त असतो.

४४) जैशी पूर्व दिशेच्या राउळी।
उदया येताचि सूर्य दिवाळी |
की येरीही दिशा तियेची काळी |
काळिमा नाही ॥८६॥

एकदा पूर्व दिशेला सूर्योदय झाला की, अंधार आपोआप नाहीसा होतो; त्याप्रमाणे ज्ञानरूपी प्रकाश म्हणजेच आत्मप्रकाश झाला की, सर्व अज्ञान आपोआप नाहीसे होते. हेच ब्रह्मस्वरूप होय.

आत्मज्ञानाच्या उदयासाठी किती समर्पक उदाहरण दिले आहे तेही आपल्या नित्य व्यवहाराचे.

- - - - - - - - - - - - - - - - - - -

# अध्याय ६ वा

# आत्मसंयम ध्यान योग

हा अध्याय पूर्णपणे ध्यान योगाच्या प्रक्रियेवर आहे. त्यामुळे माऊलींनी कुंडलिनी व बंध याचे सविस्तर वर्णन यात केले आहे. त्यात दाखले व दृष्टांत कमी आहेत.

नातरी एकचि उदक सहजे |
परि सिनाना घटी भरिजे | तैसे भिन्नत्व जाणिजे |
योगसंन्यासाचे ॥४२॥

अर्जुनाने योगी व संन्यासी तत्व वेगळे विशद करून सांगण्याची विनंती केली. त्यावरील पहिल्याच श्लोकाचा अर्थ समजावून सांगताना माऊलींनी हे उदाहरण दिले आहे. पाणी एकच असते ते वेगवेगळ्या भांडयात ठेवले तर आपल्याला वेगळे भासते; त्याप्रमाणे योगी व संन्यासी मूलतः एकच!

४६) एरव्ही कोशकिटकाचिया परी ।
तो आपणत्या आपण वैरी |
जो आत्मबुद्धी शरिरी | चारूस्थळी ||७२||

देहबुद्धी असेल तर आत्मबुद्धी घडत नाही. कोशातला किटक स्वतःच्याच बंधनात अडकतो व स्वतःच स्वतःचा वैरी ठरतो. तसेच शरीरातील आत्मबुद्धिला विसरून देहबुद्धिची कास माणूस धरतो व फसतो. म्हणजे आपणच वैरी बनतो.

४७) जैसा किडाळाचा दोषु जाये। तरी पंधरे तेचि होये |
तैसे जीवा ब्रह्मत्व आहे | संकल्पलोपी |

ज्याने स्वतःचे मन जिंकले तोच परमात्मस्वरूप बनतो, हे सांगताना माऊलींनी हिणकस सोन्याचे रूपक दिले आहे. अशुद्ध सोने आटवले की, त्यातील दोष म्हणजे किडाळ दूर होतात व शुद्ध सोने मिळते. तसेच संकल्पाचा लोप झाला की, आत्मशुद्धी जी आधीच आहे ती उदयाला येते. ती मूलतः असतेच. संकल्प व विकल्प बुद्धिचा नाश झाला की, आत्मज्ञानाचा उदय झालाच म्हणून समजा!

जैसी वायसी चंद्र नोळखिजे |
तैसा पाकृती हा ग्रंथु नेणिजे |
आणि तो हिमांशुचि जे वि खाजे | चकोराचे ||

योग व आत्मसुख यांची आवड असणाऱ्यांनाच हा अध्याय समजेल. विषयासक्त लोकांना तो कसा समजेल? कावळ्यांना चंद्राची

ओळख थोडीच असते? विषयासक्त लोकांना हा ग्रंथ थोडक्यात ६ वा अध्याय कसा समजणार? चकोराला मात्र चंद्रच हवा! ज्ञानीयांना या आत्मसुखाची आवड मूलतः आहे, हे माऊलींना सुचवावयाचे आहे.

यानंतरचा दृष्टांत खूपच मजेशीर व समजण्यास सोपा आहे. त्या काळाच्या ओव्या मुद्दाम पुढे दिल्यात. त्याचे मनन केल्यावर माऊलींना काय सुचवावयाचे ते समजेल. पोपट नळीवर बसलेला असतो, त्याचा बहारदार दृष्टांत माऊलींनी दिला आहे.

जैशी ते शुकाचेनि आंगभारे | नळिका भोविन्नली एरी मोहरे |
तेणे उडावे परी न पुरे | मनशंका || ७६ ||
वायाचि मान पिळी | अटुवे हिये आवळी |
टिटांतु नळी | धरुनि ठाके || ७७ ||
म्हणे बांधला मी कुडा | ऐसिया भावनेचिया पडे खोडा ||
की भोकळिया पायांचा चवडा गोवी अधिके || ७८ ||
ऐसा काजेविण आतुडला | तो सांग पा काय
आणिके बांधिला || ७९ ||

पिंजरातील पोपट आठवा. तो नळीवर बसलेला असतो. चुकून पोपटाच्या वजनाने ती नळी उलटी फिरते तर तो खरे तर उडून जायला

पाहिजे; पण त्याला वाटते आपण फिरतो की काय? मग तो नळी घट्ट पकडून ठेवतो. काही कारण नसताना मान हलवेल, छाती व पाण्याची नळी घट्ट पकडून ठेवतो नि चोचीत धरून ओरडतो. मी खरोखर बांधलो गेलो या भ्रमात सापडतो. पायाने घट्ट पकडतो. हा त्याचा व्यर्थ भ्रम आहे. त्याला कोणीही बांधले का? नाही. नळी तोडली तरी नळीबरोबरच तो राहील. त्याप्रमाणे देह आत्मबुद्धिमध्ये संसारी माणूस अडकतो.

हे असा वयसेचिये शेवटी |
जैसे एकचि विये वांझोटी | मग ते मोहाची त्रिपुटी
नाचो लागे | तैसे जाहले श्रीअनंता | ऐसे तरी मी न म्हणता |
जरी तयाचा न देखता | अतिशयो एथ || १२२ ||

माऊलींनी श्रीकृष्ण व अर्जुनाच्या प्रेमात भगवान जणु वेडे झालेत, त्यासाठी एखाद्या वांझ स्त्रीला खूप वय झाल्यावर मूल जर झाले, तर ती मोहापोटी त्याला घेऊन नाचत राहते. भगवान श्रीकृष्णांचे असेच झाले. माऊली म्हणतात, त्यांचे हे प्रेम मला दिसते! नाही तर मी असे कशाला म्हणेल?

माऊली म्हणतात, मी अर्जुनाचे कौतुक करतो. तुम्हाला वाटेल असे का? त्यासाठीच माऊली कारण देतात, पतिव्रता स्त्रीचा दृष्टांत देऊन!

पाहा पा अनुरागे भजे | जे प्रियोत्तमे मानिजे
ते पतीहूनि काय न वानिजे | पतिव्रता || १२९ ||
तैसा अर्जुनाचि विशेषे स्तवावा | ऐसे आवडले मग जीवा |
जे तो त्रिभुवनीचिया दैवा | एकायतुनि जाहला || १३० ||

एखादी पतिव्रता स्त्री पतीस खूप प्रेमाने भजते. नवरा पण त्यामुळे तिचे कौतुकच करतो. मग पतिपेक्षा त्या स्त्रीचे वर्णन जास्त करायला नको का? त्रिभुवनाचे भाग्य एकटया अर्जुनाला लाभले व कृष्णाचे प्रेम मिळाले, तर मग मी अर्जुनाचे स्तवन का करू नये?

अर्जुन आणि पांडव यांचे भाग्य किती थोर, याचे वर्णन करताना माऊली जणू कृष्ण व अर्जुनमय झाले आहेत. खालील ओव्या मुद्दाम देत आहे, तुम्हालाही त्या आवडतील.

कैसे उन्मेखचांदिणे तार | आणि भावार्थु पडे गार |
हेचि श्लोकार्थ कुमुदिनी फार | साविया होती || १३४ ||
चाडचि निवडा करी | ऐसी मनोरथी ये थोरी |
तेणे विवळले अंतरी | तेथे डोलु आला || १३५ ||
ते निवृत्तिदासे जाणितले | मग अवधान द्या म्हणितले
नवल पांडवकुळी पाहले | कृष्णदिवसे || १३६ ||

देवकीचा उदरी वाहिला | यशोदा सायासे पाळीला |
का शेखी उपेगा गेला | पांडवासी || १३७ ||
म्हणौनि बहुदिवस वोळगावा| का अवसरु पाहोनि विनवावा|
हाही सोसु तया सदैवा | पडेचिना || १३८ ||

माऊली म्हणतात, पहा, पहा ज्ञानरूपी चांदणे कसे लख्ख पडले? त्यातील गारवा म्हणजे त्या ज्ञानाचा अर्थ आहे व श्लोकांचा अर्थ म्हणजे चंद्रप्रकाश. यामध्ये कमळे विकसित पावलीत. या माझ्या बोलण्याची थोरवी इतकी मोठी की, ज्याला आवड नाही त्यांनाही माझ्या ओव्या ऐकाव्या वाटतील! जणू हे मनोगत माऊलींना समजले. मग म्हणतात, श्रोते हो, अजून ऐका!

पांडवांच्या कुळात आज तो दिवस उजाडला ना! तो कृष्णरुपी दिवस आहे. त्यांचे भाग्यच याने उजळले. देवकी मातेने ज्याला पोटात वाढवले, यशोदेने त्याचे लालन पालन केले. पण शेवटी तो कोणाच्या उपयोगी आला तर पांडवांच्या. अहो देवकीने, यशोदेने पूर्वी त्यासाठी देवाची विनवणी तरी केली, तप केले. पण यातील काहीच अर्जुनाला करावे लागले नाही.

योगाभ्यास करण्यास स्थान कोणते असावे, याबद्दल माऊली म्हणतात,

ऐसेनि न राहतयाते राहवी |
भ्रमतयाते बैसवी | थापटूनिचेववि विरक्तिते || १६९ ||
हे राज्य वर सांडिजे | मग निवांता ऐथिची असिजे |
ऐसे शृंगारियाहि उपजे | देखत खेवो || १७० ||
जे येणेमाने बरवंट | आणि तैसेचि अतिचोखट
जेथ अधिष्ठान प्रगट | डोळा दिसे || १७१ ||

ती योग अभ्यास करण्याची जागा अशी असावी की, ज्याला तिथे राहू नये, असे वाटते तोही आपोआप राहायला तयार होईल, जो भटकणार आहे, त्याला एका जागेवर स्थिर बसावेसे वाटेल, ध्यान करणाऱ्या योग्याला विरक्तीने थोपटून जागी करेल, म्हणजे विरक्ती उत्पन्न होईल. ती जागा पाहून विलासी, चैनी माणसालाही वाटावे, आपण राज्याचा त्याग करून येथेच शांतपणे बसावे.

ते स्थान इतके पवित्र असावे, की तिथे ध्यान केल्याने डोळ्यापुढे ब्रह्म दिसू लागेल.

योग्याची कुंडलिनी शक्ती काय करते? शरीराला जे रूप प्राप्त होते, त्याला माऊलींनी केळीच्या सोपटाची किंवा आकाशातील अवयवाची उपमा दिली आहे.

नातरी कर्दळीचा गाभा | बुंथी सांडोनी उभा |

का अवयवचि नभा | उदयाला तो || २९५ ||

सूक्ष्म शरीराचे रूप धारण केल्यानंतर शरिर हे केळीचे सोपट काढून त्याचा आतील भाग उभा केला तर काहीच उरत नाही. जणू आकाशाला अवयव फुटावेत, अशीच कल्पना करा म्हणजे थोडक्यात अवयव असून नसल्यासारखे असतात.

शिव व शक्तीचे ऐक्य कुंडलिनी जागृतीनंतर होते. त्याला छान उपमा दिली ती समुद्राचे पाणी/ ढग/ व पाऊस व त्याचा वर्षाव पुन्हा समुद्रात.

तव महाभूतांची जवनिका फिटे |

मग दोहीसि होय झटे |

तेथ गगनासकट आटे | समरसी तिये || ३०६ ||

पै मेघाचेनि मुखी निवडिला |

समुद्र का वोघी पडिला | तो मागुता जैसा आला | आपणया || ३०७ ||

पंचमहाभूतांचा पडदा पूर्णपणे नाहीसा होतो, तिथे शिव व शक्तीचे ऐक्य होते. त्यावेळी ही शक्ती आकाशासह ब्रह्मानंदात मिळून

जाते. ह्या दोघांचे मिलन कसे आहे? पहा, समुद्राचे पाणी सूर्याच्या उष्णतेने ढग होतात. त्यांचा पावसामुळे वर्षाव होतो तो जमिनीवर. शेवटी ते पाणी नदीद्वारे समुद्रातच मिळते. असे हे दोन शक्तींचे मिलन आहे.

बाह्यइंद्रियांना योगीपुरुष नियमितपणे वळण लावतो व त्याला मग आपोआपच योग प्राप्त होतो. कसा? तर त्यासाठी खालची ओवी पाहू.

बाहेर युक्तीची मुद्रा पडे | तव आंत आंत सुख वाढे |
तेथे सहजेचि योगु घडे | नाभ्यासिता
जैसे भाग्याचिया भडसे | उद्यमाचेनि मिसे |
मग समृद्धिजात आपैसे | घर रिघे || ३५४ ||

इंद्रियांना वळण लावले की, आत्मसुख वाढून अभ्यास न करता सुख वाढते व योग घडतो. एखाद्याचा भाग्योदय झाला, की निमित्त उद्योगाचे होते व मग ऐश्वर्य समृद्धी स्वतःहून घरी येते.

आकाशी दिसे दुसरे | ते अभ्र जै विरे |
तै गगनचि कां भरे | विश्व जैसे || ३८५ ||
तैसे चित्त लया जाये | आणि चैतन्यचि आघवे होये |
ऐसी प्राप्ति सुखोपाये | आहे येणे || ३८६ ||

आकाशातील ढग नाहीसे झाले, की संपूर्ण विश्व आकाशानेच व्यापलेले दिसते त्याप्रमाणे चित्त आत्मस्वरूपात लय झाले की, आपल्याला सर्वच चैतन्यमय भासू लागते. अशा प्रकारच्या सुखाच्या सिद्धीची ही प्राप्ती योगाच्या अभ्यासाने होते.

म्हणौनि ऐसे कैसे घडेल | जे मर्कट समाधी येईल |
का राहा म्हणतलिया राहेल | महावातु || ४१३ ||

अर्जुनाची शंका मनाबद्दल आहे ते चंचल आहे. हे मन स्थिरावेल तरी कसे? अहो, माकड कधी शांत बसेल का? सोसाटयाचा वारा सुटलाय त्याला आपण थांब म्हटलो, तर तो थांबेल का? याचा शेवट करताना माऊलींनी सदगुरुंना केलेल्या कृपेची अतिशय छान आठवण करून देतात. ही शेतकऱ्याच्या पेरणीची उपमा तुम्हाला खचितच आवडेल!

वरी अवधानाचा वाफसा | लाधला सोनयाऐसा |
म्हणौनि पेरावया धिवसा | श्री निवृत्तीसी || ४९१ ||
ज्ञानदेव म्हणे मी चाडे | सदगुरुंनी केले कोडे |
माथा हात ठेविला ते फुडे | बीजचि वाइले || ४९२ ||

पुढच्या अध्यायात ज्ञानबीज कसे पेरले जाईल? तर तुम्ही सगळे श्रोते अवधान देतात याचा जणू वाफसा म्हणजे जमीन जशी ओलावा

धारण करते व पेरणीलायक होते तसे मन तयार झाले हे माझे सदगुरुंनी ओळखले व मग त्यांना पेरण्याची जणू इच्छा झाली. माऊली म्हणतात, मग सदगुरुंनी काय केले मलाच चाडे केले म्हणजे पेरणी करताना ज्याच्यातून बी टाकले जाते ते चाडे म्हणजे मला निमित्त केले. माझ्या मस्तकावर हात ठेवला. जणू उघड-उघड ज्ञानाचे बीजच घातले. त्या बीजातून अंकुर फुटतील व ज्ञान प्रकट होईल, असे माऊलींना सुचवावयाचे आहे.

४८) जैसी आभाळाची बुंथी । करूनि राहे गभस्ती |
मग फिटलिया दिप्ती धरू नये ||५१||
की येरीही दिशा तियेची काळी |
काळिमा नाही ॥८६॥

कुंडलिनी शक्ती जागृत झाल्यावर शरीरात प्राणशक्तिचा संचार कसा होतो, यासाठी आभाळ व सूर्य याचे रूपक योजले आहे. आभाळ असले की, सूर्याचे तेज दिसत नाही. परंतु ते दूर झाले रे झाले की, सूर्याच्या तेजाला कोण अडवू शकतो? तसेच जागृत झालेल्या प्राणशक्तिचे अस्तित्व जाणवते. एकदा का ही कुंडलिनी शक्ती या योगाने प्रकट झाली की, मग तिला प्रतिबंध करण्याची ताकद कोणातही नाही.

४९) पाहे पां आयुष्याते अढळ करी ।
जे सरते जीवित वारी | तया औषधाते वैरी |
काय जिव्हा न म्हणे? ॥६२॥

चित्ताचे नियमन करण्यास ध्यान योगाचा अभ्यास उपयोगी ठरतो; परंतु ते जमत नाही असे म्हणायचे तर त्यासाठी हे उदाहरण माऊलींनी दिले आहे. औषध आपल्याला बरे करते, मृत्यू टाळते, जीव प्रदान करते; पण औषधाला जीभ म्हणते नको-नको. तसेच योगाचा अभ्यास देहबुद्धिच्या शरीराला नको वाटतो. पण त्यापासून होणारा फायदा पण विचारात घेत नाही.

५०) नातरी वृक्षांची पाने जितुली । तेतुली रोपे नाही लाविली |
ऐसी अद्वैतदिवसे पाहली | रात्रीजया ॥४००॥

द्वैत व अद्वैत अवस्थेचे तत्त्व सोप्या पद्धतीने झाड व पाने याचे उदाहरण देऊन समजावले. झाड एकच, पण पाने असंख्य. मग प्रत्येक पानासाठी वेगळे रोप आहे का? तर नाही. रात्र म्हणजे अज्ञान. ते संपले की प्रकाश; म्हणजे अद्वैताचे ज्ञान किती सोपा दाखला दिलाय माऊलींनी! दिसणारे द्वैत हा आभास आहे. त्याचे मूळ एकाच अद्वैतात आहे.

५१) का जे यया मनाचे एक निके ।
जे देखिले गोडीचिया ठाया सोके |
म्हणोनि अनुभवसुखचि कवतिके |
दावित जाईजे ॥४२०॥

मला ही ओवी खूप आवडते. मनाचा एक चांगला स्वभाव आहे. त्याला जे आवडते ते मन पु:न्हा पु:न्हा करू पाहते, चटक लागते त्याला! मग तू याच मनाला आत्मानुभावाची सवय का लावत नाहीस? मनाच्या या स्वभावाचा आपण फायदा करून घ्यावा, म्हणजे मनाला ईश्वर उपासनेची चटक लावली पाहिजे.

५२) तेथ सदैवा आणि पायाळा ।
वरि दिव्यांजन होय डोळा |
मग देखे जैसी अवलीला | पाताळधने ||४५८||

मागच्या जन्माची सदबुद्धि या जन्माला कशी उपयोगी पडते, हे ४४ व्या श्लोकात भगवान अर्जुनाला सांगतात. त्याचे महत्त्व माऊलींनी डोळ्यात अंजन घातल्यावर भाग्यवान माणसाला जसे गुप्तधन दिसते,

तसे पूर्वाभ्यासाने व ह्या जन्माच्या योग अभ्यासाने त्याला विनासायास आत्मबुद्धिची प्रचिती येते. मागचा अभ्यास व या जन्मीची योगसाधना यातून अतिशय लवकर आत्मबुद्धि निर्माण होते, हे माऊलींना यातून सांगावयाचे आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - -

# अध्याय ७ वा

# विज्ञान योग

अध्यायाची सुरुवात अर्जुनाच्या प्रश्नाला उत्तर देताना झाली आहे.

मग ज्ञानाचिये वेळे | झांकती जाणिवेचे डोळे |
जैसी तीरी नाव न ढळे | टेकलीसांती || ४ ||

ज्ञानीया झाल्यावर जाणीवेचे डोळे झाकले जातात म्हणजे आत्मस्वरूपाच्या ज्ञानाने बुद्धि कुंठित होते. कशी तर किनाऱ्याला लागलेली नाव हालत नाही तशी बुद्धि आता निर्विकार झालेली असते.

जैसी रसाचीच सुघट | बीजकणिका घनवट |
परी तियेस्तव होय काष्ठ | अंकुरद्वारे || ५५ ||
मग तया काष्ठांच्या ठायी | सांगपा बीजपण असे काई |
तैसा मी विकारी नाही | जरी विकाराला दिसे || ५६ ||

बी रसाने भरलेले असते. त्यातून अंकुर होऊन वृक्ष व नंतर लाकूड होते. त्या लाकडात बी असते का? नाही. त्याप्रमाणे अर्जुना मी

विकारलेला दिसतो खरा; पण त्यात विकारात मी नाही. अजून एक उपमा दिली आहे. पहा, ही ओवी.

पै गगनी उपजे आभाळ | परी तेथ गगन नाही केवळ |
अथवा आभाळी होय सलिल | तेथ अभ्र नाही || ५७ ||

मी मायेने कसा झाकलो त्यासाठी खालील ओव्या पाहू.

परी उदकी जाली बाबुळी | ते उदकाते जैसी झांकोळी |
का वायांची आभाळी | आभाळ लोपे || ६० ||
हां गा स्वप्न लटिके म्हणो ये | परि निद्रावशे बाणले होये |
तव आठवू काय देत आहे | आपणपेया? || ६१ ||
तैसी हे माझीच बिंबली | त्रिगुणात्मक साऊली |
की मजचि आड वोडवली | जवनिका जैसी || ६३ ||

शेवाळ पाण्याला झाकून टाकते. ढगांनी आकाश निष्कारणच झाकलेले भासते. आपण खूप झोपेत असलो की, खोटे स्वप्न पण त्यावेळी खरे वाटते. त्याप्रमाणे माझी ही त्रिगुणात्मक माया म्हणजे जणू मायेची सावलीच पडली आणि त्याने मीच झांकलो गेलो आहे.

५३)  सुवर्णाचे मणी केले |
ते सोनियाचे सुती वोविले |
तैसे म्या जग धरिले |
सबाह्याभ्यंतरी ॥३२॥

सर्व जग माझ्यातच गुंफलेले आहे हे भगवान अध्यायाच्या सुरुवातीलाच सांगतात. सोन्याचे मणी करून सोन्याच्याच तारेत ओवले जावेत. तसेच जगाच्या आत बाहेर मीच व्यापलो आहे. जसे सोने व मणी एकच. त्याप्रमाणे जग व मी एकच! म्हणजे सोन्याचे व अलंकाराचे तत्त्व एकच. जगाचे व माझ्यातील तत्त्वाचे तसेच आहे.

५४)  जैसा वारा का गगनी विरे ।
मग वारेपण वेगळे नुरे |
तेवी भक्त हे पैज न सरे |
जरी ऐक्य झाला ||११४||

वारा आकाशात विरून गेला की, वेगळा राहत नाही. भक्त व मी एकरूप झाल्यावर भक्त वेगळा राहत नाही. भक्तांचे माझ्या स्वरूपात ऐक्य होते.

- - - - - - - - - - - - - - - - - - -

# अध्याय ८ वा

# ब्रह्माक्षर निर्देश योग

५५) जे अपत्य थानीहूनि निगे |
तयाची भूक ते मातेसीचि लागे |
एरव्ही ते शब्द काय सांगे |
मग स्तन्य दे येरी ॥१३॥

सदगुरु निवृत्तीनाथांना माझी ग्रंथरूपी भूक समजते, हे सांगताना आईच्या स्तनपानाची बहारदार उपमा दिली आहे. बाळ कधी कधी प्यायचे थांबते, पण तिचा पान्हा पाझरतो, त्यामुळे भूक संपली की नाही हे बाळापेक्षा आईलाच कळते. बाळ शब्दाने कधी स्तन दे असे म्हणते का? नाही. आईला पान्हा फुटला की, ती बाळाला पाजतेच! अर्जुनाला जे अपेक्षित आहे, याचे पूर्ण ज्ञान व भान भगवान यांच्याकडे आहे, हेच या उदाहरणावरून सूचित करावयाचे आहे.

५६) जैसा कवणु एक काकुळती । पळता पवनगती |
दुपाईली अवचिती | कुहामाजी पडियेला ||७०||

मृत्युसमयीच्या अवस्थेला चुकवता येत नाही, म्हणून सतत माझा अभ्यास केला तर अंत:काळ सुखी होतो, म्हणून माणूस खूप घाबरला तर तो वाऱ्याच्या वेगाने पळतो. पडू नये म्हणून कितीही चुकवले तरी अडखळून आडात म्हणजे विहिरीतही पडतो. म्हणून अंत:काळी ईश्वराचे स्मरण केले तर देहबुद्धि नाहीशी होते, हे माऊलींना सांगावयाचे आहे व मग आत्मनाश होत नाही. मज स्वरूपापर्यंत येणे सोपे जाते. थोडक्यात शेवट गोड व्हावा असे वाटत असेल, खूप आधीपासूनच माझ्या स्वरूपाच्या भक्तिच्या अभ्यासाला सुरुवात करावी, म्हणजे अंत:काळी हे खूप सोपे जाईल.

५७) जेवि दूधचि जाहलिया दही ।
नामरूप जाय ||१७०||
तेवी भक्त हे पैज न सरे |
जरी ऐक्य झाला ||१२४||

अव्यक्त परमात्मा सर्व जीवसृष्टी नाश पावली तरी नाश पावत नाही. जसे दुधाचे दही झाले की, दुधाचे रूप शिल्लक राहत नाही.

व्यक्तातून अव्यक्तता कशी येते, यासाठी हे साधे रूपक योजले आहे. आत्मस्वरूपाचे ज्ञान झाल्यावर पूर्वीच्या देहबुद्धिचे विस्मरण स्वाभाविक घडते.

५८) नातरी साखरेचा माघौता।
बुद्धिमंतपणेही करिता |
परि ऊस नव्हे पंडुसुता |
जियापरी ||२००||

परमात्मस्वरूप प्राप्त झाले की, मग पुनर्जन्म नाही. उसाची साखर झाल्यावर कितीही बुद्धिवान असला तरी त्याला साखरेचा पुन्हा ऊस करता येणार नाही. या साध्या सोप्या उदाहरणातून माऊली परमात्मस्वरूप झालेला अव्यक्त रूपात जाऊन जन्म-मरणाच्या चक्रात अडकत नाही हे सांगतात. माऊलींच्या प्रगल्भतेची कल्पना साध्या उदाहरणातून सुद्धा कशी प्रकट होते, याचे ही ओवी उत्तम उदाहरण आहे, असे मला वाटते.

५९) पाहे पा नाव देखता बरवी।
कोणी आड घाली काय अथावी |
का सुपंथ जाणोनिया अडवी |
रिगवत असे ||२४०||

आपले हित कोणत्या मार्गांनी जाण्यात आहे? प्रकाशाच्या की अंधाराच्या वाटेने, हे सांगताना समोर नाव असताना कोणी पाण्यात उडी घालून पलिकडे जाईल का? सुपंथ सोडून खडतर मार्ग कशाला निवडायचा? थोडक्यात माझ्या भक्तिचा सोपा मार्ग निवडावा हेच माऊलींना सुचवावयाचे आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - -

# अध्याय ९ वा

# राजविद्याराज गुह्य योग

६०) पाहे पा दूध पवित्र आणि गोड |
पासी त्वचेचिया पदराआड |
परि ते अव्हेरूनि गोचड | अशुद्ध काय न सेविती ||

माझ्यावर ज्यांचा विश्वास नाही ते काय करतात, यासाठी त्यांनी गोचिडाचे उदाहरण दिले. स्तनाजवळ दूध आहे ते गोड आहे, पण गोचिड मात्र दूध सोडून त्वचेच्या आत असलेले रक्त पितात. तसेच मी हृदयात असून मला जाणायचे सोडून मूर्ख लोक विषयाची इच्छा करतात. किती साधे उदाहरण विषयासाठी व आत्मरत बुद्धिसाठी माऊलींनी दिले आहे.

६१) जैसी राये अधिष्ठिली प्रजा ।
व्यापारे आपुलिया कामे |
तैसा प्रकृतिसंगु हा माझा |
येर कारणे ते इयेचे ||११४||

प्रकृति व ईश्वराचा संबंध मायारूप आहे. तो भासमान आहे. राजा प्रजेचा सांभाळ करतो, परंतु त्यात राज्यातील लोक आपआपले व्यवहार स्वतःच करतात. तसेच ईश्वराचे आहे. प्रकृतिचे अधिष्ठान मी असलो तरी प्रकृतिचे व्यापार करण्यास ती स्वतंत्र आहे.

६२) एरव्ही दिठी वेधली कवळे | तै चांदणीयाते म्हणे पिवळे |
तेवि माझ्या स्वरूपि निर्मळे | देखती दोष ||१४१||

मला ओळखू शकत नाही. मी देहधारी कृष्ण आहे, असे मानतात. पण माझ्या ईश्वररूपाला ओळखत नाही. कावीळ झालेला माणूस चांदणे पिवळे आहे म्हणतो, तसा मी निर्मळ आहे. पण तरीही त्यांना दोषयुक्त दिसतो. थोडक्यात आत्मस्वरूपाला देहबुद्धिने ओळखता येत नाही.

६३) जैसे उंची उदक पडिले ।
ते तळवटवरी ये उगले |
तैसे नमिजे भूतजात देखिले |
ऐसा स्वभावोचि तयाचा ||२२४||

संतांचा स्वभाव प्रत्येकाला नमस्कार करण्याचा असतो. उंचावरून पाणी पडते ते खाली तळावरच येते. कारण तो पाण्याचा स्वभावच आहे. तसाच संत नेहमी जीवाप्रति नमून आदराने वागतात.

६४) जैसा वेश्याभोगी कवडा वेचे ।
मग दारही चेपू नये तियेचे |
तैसे लाजीरवाणे दिक्षितांचे |
काय सांगो ॥३२९॥

स्वर्गसुखाची अभिलाषा करणाऱ्याला सुद्धा परत या मृत्युलोकी यावे लागते. त्यासाठी त्यांनी वेश्येचे उदाहरण दिले आहे. पैसा संपला की दारही उघडत नाही. परत फिरावे लागते. स्वर्गसुखाचे तसेच आहे. दिक्षित म्हणजे ज्ञानाने अभिमानी जग हे माऊलींना सुचवावयाचे आहे. अभिमानामुळे त्यांचे जीवन अतिशय लाजीरवाणे होते. त्यासाठी वेश्येचे उदाहरण दिले. पैसा असेल तर ती किंमत देते. म्हणून खोटा अभिमान ज्ञानी पुरुषाने बाळगू नये.

६५) कणेविणे सोपटे | कणसे लागली |
घनदाटे | काय करावे गोमटे | वोस नगर ॥३३३॥

भक्तीशिवाय या देहाला काहीही किंमत नाही. कणसे दाट आहेत, पण त्यात कणच नाही, दाणाच नाही. शहर खूप सुंदर आहे पण माणसाची वस्तीच नाही, तसे मनुष्यामधून भक्ति वजा केली तर किंमत शून्य. दोनच साधी उदाहरणे.

भक्तिसाठी दिली. पण ती तुमच्या आमच्या ओळखीची. कणसे भरपूर पण दाणा नसली तर उपयुक्तता शून्य. शहर बाहेरून खूप सुंदर आहे पण त्या नगरीत माणसेच नसतील तर त्या गोमटया शहराला काय किंमत? अहो, तुम्ही खूप धनवान, सामर्थ्यवान असाल पण तुमच्यात भक्तिचा अंशच नसेल तर तुमचा उपयोग काय?

- - - - - - - - - - - - - - - - - - -

# अध्याय १० वा

# विभूति योग

का सूर्याचिया आंगा उटणे | लागत असे? ||१०||

चंदनात कायसोनी चर्चावे | अमृताते केऊते रांधावे |

गगनावरी उभवावे घडे केवी ||१२||

आपले सदगुरु यांच्याबद्दल स्तुती करताना माऊलींनी हे दाखले दिले आहेत. सूर्य इतका तेजस्वी आहे की, त्याला तेज प्राप्त व्हावे म्हणून का कोणी उटणे लावेल? चंदनाचा सुगंध हा उपजतच आहे, मग त्याला आणखी कशाने उटी लावायची? अमृताला स्वतःची चव असतांना त्याला आणखी चव आणण्यास काही त्यात टाकावे लागते का? आकाश अनंत आहे, त्याला कशाचा आधार द्यायचा व त्यावर मांडव तरी कसा घालायचा? थोडक्यात माझे सदगुरु श्रीनिवृत्ती महाराज यांची स्तुती मी काय करणार?

घटी थोडेसे उदक घालिजे | तेणे न गळे तरी वरिता भारिजे ।
ऐसा परिसौनि पाहिलासी तव परीसाविजे | ऐसेचि होतसे ||५१||

श्रीकृष्ण अर्जुनाचे लक्ष आहे हे पाहिल्यावर पुढचे निवेदन करतात, हे समजावून सांगताना माऊली मडक्यातील पाण्याचा साधा दाखला देतात. आपण थोडे पाणी घालतो. मडक्यातून ते गळत नाही ना? हे पाहतो व मग पुन्हा पाणी भरतो. अर्जुनाला आत्तापर्यंत सांगितलेले समजले. मग आता आणखी सांगता येईल, यासाठी माऊलींचा हा सोपा दाखला आहे

जैसे बाळका लेवविजे लेणे । तया शृंगारा बाळ काई जाणे?
परि ते सुखाचे सोहळे भोगणे | माऊलिये दिठे ||५८||

लहान मुलाला आपण अलंकार घालतो. या शृंगाराचे महत्त्व मुलाला कळते का? पण त्याला जे अलंकार घालतो, त्यामुळे आईला मात्र खूप आनंद होतो. तसे अर्जुनाला त्याच्या कल्याणाकरता जो उपदेश श्रीकृष्ण करतात त्यामुळे अर्जुनापेक्षा जास्त आनंद देवालाच होतो.

लळेयाचिया बाळका किरीटी | गवसणी करूनि स्नेहाचिया दिठी|
जैसा खेळता पाठोपाठी | माऊली धावे ||३४||

ते जो जो खेळ दावी | तो तो पुढे सोनयाचा करूनि ठेवी |

तैसी उपास्तीची पदवी | पोषित मी जाये ||३५||

आपल्या भक्ताने उपासना केल्यावर मी त्याचे रक्षण कशाप्रकारे करतो, हे सांगताना माऊलींनी आई व बाळाची उपमा दिली आहे. बाळ खेळत असताना आईची प्रेमदृष्टी त्यावर असते. तो जो वेळ मागतो, त्यासाठी त्याला आधीच तो तयार ठेवते अगदी सोन्यासारखा. तसेच मी भक्तांचे रक्षण करतो.

आंगीचिया रोमा किती | जयाचिया तयासि न गणवती |

तैसिया माझिया विभूती | असंख्य मज ||२१०||

माझ्या विभूति अनंत आहेत. मला तरी त्या किती आहेत याबद्दल कोठे मोजता येतात. आपल्या शरिरावर केस किती आहेत हे आपल्याला तरी सांगता येतील का? तसेच माझ्या विभुतिचे आहे.

का पृथ्वीये परमाणूंचा उगाणा घ्यावा |

तारि भूगोलाची काखे सुवावा |

तैसा विस्तारू माझा पहावा | तरि जाणावे माते ||२६०||

माझ्या विभुतिचा विस्तार पाहण्यास मला ओळखले पाहिजे. अहो, पृथ्वीवर किती परमाणु आहेत, याचा हिशोब कोणाला करता

येईल का? त्यासाठी अख्खी पृथ्वी म्हणजेच भूगोल काखेत घेतला पाहिजे. अगदी त्याप्रमाणे मला जाणल्याशिवाय माझ्या विभूति कळणे शक्य नाही.

एरव्ही तूप कायसा घुसळावे? अमृत कां रांधूनि अर्धे करावे |
हा गा वायूसि काय पा डावे | उजवे अंग आहे ||३१४||

तू माझ्या विभूतिचा किती विस्तार ऐकशील? तुझा हा खटाटोप आता पुरे, असे श्रीकृष्ण अर्जुनाला सुचवित आहे. यासाठी माऊलींनी हा तूपाचा, अमृताचा व वाऱ्याचा दाखला दिला आहे. तूप घुसळणे व अमृताला रांधणे किंवा वायुस डावे/उजवे अंग पहाणे म्हणजे व्यर्थ कष्ट आहेत?

अगदी त्याप्रमाणे माझे स्वरूप आहे. त्याला आणखी जाणून घेण्याचा वृथा खटाटोप कशाला हवा?

- - - - - - - - - - - - - - - - - -

# अध्याय ११ वा

# विश्वरूपदर्शन योग

अहो वधुवरांच्या मिळणी | जैसी वराडियाही लुगडी लेणी|
जैसे देशियेच्या सुखासनी | मिरवले रस |३||

माऊली अकरावा अध्यायाची सुरुवात करताना यात शांती रस व अदभुत रस यांचे सुंदर मिश्रण आहे हे सांगतात. त्यासाठी त्यांनी आपल्याला सगळ्यांना परिचित लग्न व वऱ्हाडी मंडळी यांचे साधे उदाहरण दिले आहे. लग्नात वधुवरांच्या घरचे अलंकार घालून व वस्त्रे घालून मिरवतात. त्याप्रमाणे इतर वऱ्हाडी मंडळी पण त्यांच्याबरोबर वस्त्रे व अलंकार घालून मिरवतातच. तसेच दोन्ही रस या अध्यायात एकत्र पाहायला मिळतील.

अहो पुंसा आपणचि पढविजे |
मग पढे तरी माथा तुकिजे |
का करविलेनि चोजे नन रिझे |
बाळा माय |१७||

आपले सदगुरुंनी आपल्यास जे दिले त्याप्रमाणेच मी यातून व्यक्त करितो. मग त्यामुळे सदगुरुंना आनंद व्यक्त होतोच ना असा भाव व्यक्त करण्यासाठी माऊलींनी हा दाखला दिला आहे. पुंसा म्हणजे पोपट. त्याला आपण जे बोलायला शिकवतो तेच तो बोलतो. पण आनंद शिकवणाऱ्याला होतोच ना, मुलांकडून आई शिकवून काही करून घेते व ते केल्यावर आईलाच जास्त आनंद होतो. त्याप्रमाणे माऊली सदगुरुंना विनंती करतात, तुमचेच शिकवलेले तुम्हीच आता ऐकावे व संतोष मानावा.

अहो वासरू देखिलियाची साठी | धेनु खडबडोनि मोहे उठी |
मग स्तनामुखाचिये भेटी | काय पान्हा धरे ||४०||
पाहा पा तया पांडवाचेनि नावे |
जो कृष्ण रानीही प्रतिपाळू धावे |
तयाते अर्जुनाते जाव पुसावे | तव साहिल काई ||४१||

गाय आपल्या वासराला पाहते व प्रेमाने उभी राहते. वासरू पिते व मग ती काय पान्हा चोरेल काय? नाही. मुक्तपणे वासराला स्तनपान करून देईल. त्याप्रमाणे जो श्रीकृष्ण पांडवांसाठी रानावनात हिंडला तो अर्जुनाने विनंती केल्यावर त्याला विश्वरूप दर्शन देणार नाही काय? हे तर प्रेमाचे नाते आहे, हे माऊलींना सुचवायचे आहे.

तैसा केरू फिटालीया आभाळी |

दिठी रिगे सूर्यमंडळी |

का हाते सारूनि बाबुळी | जळ देखिजे ||७४||

तैसी प्रकृति हे आड होती |

ते देवोचि सारोनि परौती |

मग परतत्त्व माझिये मती | शेजार केले ||७६||

श्रीकृष्णाने मला परब्रह्म कसे दाखवले. माझे मायाजाळ/ अज्ञान/ प्रकृतीरूपी मायापटल दूर करून त्यासाठी साधा दाखला दिला आहे. आकाशात ढग असतात. ते ढग गेले की **सूर्य** दिसतो. तो आधी असतोच, पण ढगांमुळे आपल्या डोळयांना दिसत नाही; एवढेच.

हे आपले आपण मी नेणे |

ते का नेणसी जरी देव म्हणे |

तरी सरोगु काय जाणे |

निदान रोगाचे ||९०||

मी विश्वरूप दर्शनाची इच्छा व्यक्त केली. पण मी या योग्यतेचा आहे का नाही हे मला कसे कळणार? यासाठी माऊलींनी आजारी माणसाला आपल्या रोगाचे निदान कसे कळणार हा दाखला दिला आहे.

हां हो उटोनिया आरिसा |

आंधळिया दाऊ बैसा | बहिरीयापुढे हृषीकेशा |

गाणिव करा ||५७||

मकरंदकणाचा चारा | जाणता घालूनि दर्दुरा ||

वाया धाडा शारंगधारा | कोपा कवणा ||५८||

जे अतींद्रिय म्हणौनी व्यवास्थिले | केवळ ज्ञानदृष्टीचिया भागा फिटले |

ते तुम्ही चर्मचक्षूंपुढे सुदले |

मी कैसोनी देखे ||५९||

विश्वरूपाचा विषय अतिंद्रियाचा आहे. मग तो बाह्यरूपी डोळयांनी कसा दिसेल? ही अर्जुनाची शंका आहे. त्यासाठी माऊलींनी दोन साधी उदाहरणे दिली आहेत. आरसा स्वच्छ करून तो आंधळयापुढे ठेवला तर त्याला दिसेल काय? ज्याला ऐकू येत नाही, त्याला म्हटले गाणे ऐक, तर त्याचा काय उपयोग? फुलामध्ये परागकण आहेत. तुम्ही त्याला बेडकाला देता तर मग ते पण वाया जाणार ना देवा! म्हणून मला विश्वरूप पाहण्यासाठी योग्य ते सामर्थ्य द्या, अशी अप्रत्यक्ष विनंती देवांकडे केली आहे.

काय जाहले न वाहता भुई पेरिजे |
तरी तो वेलु विलया जाईजे |
तरी आता माझे निजरूप देखिजे |
ते दृष्टी देवो तुज ||६२||

विश्वरूप दाखविण्यास सुरुवात तर केली, पण अर्जुन हे पाहू शकतो की नाही अशी अशंका भगवंताला आली व त्यामुळे त्याला त्यासाठी दिव्यदृष्टी देणे योग्य ठरेल हे माऊलींनी साध्या शेतीच्या उदाहरणाने सांगितले आहे. जमिनीची मशागत केली नाही आणि पेरणी केली तर वेळ वायाच जाणार ना? म्हणून मी माझे विश्वरूप पाहण्यासाठी तुला पाहण्याची दिव्य दृष्टी देतो.

ते ही एक एक आघवे | चित्रीचे सिंहाडे मानावे |
जैसे बोलेनी हाते घ्यावे | पुसोनिया ||४७४||

युद्धामध्ये द्रोण, भिष्म, कर्ण या वीरांना कसे जिंकावे असा प्रश्न पडला का? तर ते सगळे भिंतीवर सिंह काढलेल्या चित्राप्रमाणे आहेत असे समज! भिंतीवरची चित्रे आपण कशी पुसतो? एक कापडाचे पोतेरे घेऊन पाण्यात भिजवून पुसून टाकतो. अगदी त्याप्रमाणे या सगळ्या योद्धयांवर तू युद्धात मात करू शकतोस, हे यातून माऊलींना सुचवावयाचे आहे.

चिंतामणीची खाणी लागली| तेणे करे वोढोळे वोल्हांडली |
तैसी तुझी जवळिक धाडिली | सांगातीपणे ||५४०||

अर्जुनाला श्रीकृष्णाचे विश्वरूप दर्शनातून खरे माहात्म्य कळल्यावर त्याच्या मनाची अवस्था कशी झाली? याकरिता अनेक दाखले माऊलींनी दिले आहेत. त्यातील एक हा आहे. चिंतामणीची खाण सापडली तर त्यातील एकेक खडे घेऊन आम्ही जर गुरे हाकत बसलो तर चिंतामणी व्यर्थच गेला ना! तसे तुझी आतापर्यंतची सोबत आम्ही वाया घालवली.

जी हेचि विनबावया लागी | कैची योग्यता माझिया आंगी|
परी अपत्य जैसे सलगी | बापेसी बोले ||५७२||

माझे जे अनंत अपराध घडले त्याबद्दल मला क्षमा कर, ही विनंती तरी मी कशी करू? परंतु मूल जसे वडिलांशी लडिवाळपणे बोलून चुकले तर क्षमा मागते, त्याप्रमाणेच माझेही लडिवाळपणाचे बोलणे आहे.

कां उखिते आगे जीवे | आपणपे दिधले जिया मनोभावे |
तिया कांतु मिनलिया न राहवे | हृदय जेवी ||५७७||

मी माझ्या मनातील अपराधाची भावना व्यक्त करतो. देवा, मला माफ कर यासाठी माऊलींनी पतिव्रता स्त्रीचे उदाहरण दिले आहे. शरीर

व मन ज्यावर अर्पण केले आहे त्या पतिव्रता स्त्रीला पती भेटला तर ती तिच्या मनातले त्याला सांगणार नाही का? मला इथे गोपींची आठवण झाली. गोपींचे श्रीकृष्णाबद्दलचे प्रेमही अतूट होते. त्याला विषयाचा मागमूसही नव्हता.

हा गा समुद्रु अमृताचा भरला | आणि अवसान वरपडा जाहला |
मग कोणीही आधि वोसंडिला | बुडीजैल म्हणौनी? ||६२४||

समुद्र अमृताने भरलेला आहे. दैवयोगाने आपण त्याच्या जवळ गेलो तर नको बाबा त्यात आपण बुडून जाऊ या भितीने कोणी तरी त्याचा अस्वीकार करेल का? अर्जुनाला विश्वरूप दर्शनाचा लाभ करून घे, हे सांगताना माऊलींनी अनेक उदाहरणे दिली आहेत. त्यातील नमुनादाखल हे घेतले आहे.

नाना गाय चरे डोंगरी | परि चित्त बांधिले वत्से घरी |
तैसे प्रेम एथिचे करी | स्थानपती ||६३५||

श्रीकृष्ण अर्जुनाला विश्वरूप दर्शनाला भिऊ नकोस या वर मनापासून प्रेम कर. त्यासाठी गाय चारायला बाहेर जाते, पण तिचे मन घरी बांधलेल्या वासराकडेच असते. तसे तू या विश्वरूपाकडेच चित्त ठेव.

मोडोनी भांगाराचा रवा | लेणे घडिले आपलिया सवा |
मग नावडे जरी जीवा | तरी आटिजे पुढती ||६४४||

माऊलींचा साहित्य प्रतिभेचा हा कळस आहे. आधी श्रीकृष्णाचे रूप त्यानंतर त्याचेच विश्वरूपदर्शन व पुन्हा अर्जुनाने विनवणी करून पुन्हा मूळ रूप दाखव म्हंटले. त्यासाठी त्यांनी सोन्याच्या अलंकाराचा दृष्टांत दिला आहे. सोन्याची लगड मोडतो. तिचा दागिना घडवतो. पण तो दागिना आवडला नाही मग काय? पुन्हा तो आखतो व अहंकाराचे पुन्हा सोने करतो. तसा हा विश्वरूप सोहळयाचा प्रवास माऊलींनी प्रकट करून सांगितला आहे.

परि तेचि भक्ति ऐसी | पर्जन्याची सुटिका जैसी |
धरा वांचूनि अनारिसी | गतीचि नेणे ||५९६||

माझे विश्वरूपदर्शन अनन्यभक्ति करणाऱ्यालाच शक्य आहे, या गीतेच्या श्लोकाचे निरूपण करताना माऊलींनी या ओवीने सुरुवात केली आहे. पाऊसाच्या धारा आकाशातून निघाल्या तर पृथ्वीवर पडण्याशिवाय दुसरा मार्ग आहे का? त्यांना पृथ्वीवरच यावे लागते. माझी अनन्यभक्ति केल्यावर माझे दर्शन होणारच हा आशावाद माऊली भक्तांना देतात.

- - - - - - - - - - - - - - - - - - -

# अध्याय १२ वा

# भक्तियोग

का वर्षाकाठी सरिता | जैसी चढो लागे पंडुसुता |
तैसी नीच नवी भजता | श्रद्धा दिसे |३६||

पावसाळ्यात नदीचे पाणी जसे चढते तशी भक्तिला नित्य नवी भरती येते. श्रद्धेने केलेली भक्ति हा भक्तियोग नेहमीच चढत्या क्रमाचा आहे.

पाहे पा लोहाचे चणे | जै बोचरिया पडती खाणे |
तै पोट भरणे की प्राणे | शुद्धी होय ||७०||

माणसाने लोहाचे चणे खाल्ले तर पोट भरेल की प्राण जाईल. तसे निर्गुण ब्रह्मांची उपासना किती अवघड आहे हे यातून सुचविले आहे.

किंबहुना धनुर्धरा | जो मातेचिया ये उदरा | तो मातेचा सोयरा ||
केतुला पा? ||८३||

माझा भक्त माझा किती प्रिय आहे त्याचा सांभाळ मी अगदी मनापासून करतो. हे सूचित करण्यासाठी हे उदाहरण माऊलींनी दिले

आहे. आईच्या उदरातून मुलाचा जन्म होतो, अशा मुलावर तिचे किती प्रेम असेल? हे काय सांगावे लागते का? माझे व भक्तांचे नाते असेच आहे.

माळिये जेऊते नेले | तेउते निवांतचि गेले |

तया पाणिया ऐसे केले | हो आवे गा ||१२०||

तुझी कर्मे मला अर्पण कर. मग आपोआप तु सायुज्य मुक्तिचा आधिकारी होशील. त्यासाठी दिलेला हा दृष्टांत मला खूपच आवडतो. माळी शेतात पाणी देतो. पाणी, माळी जसे नेतो तसे जाते. तक्रार न करता. अशा पाण्याच्या वृत्तीप्रमाणे तु वाग. म्हणजे मी माळी व तू पाणी. **नैष्कर्म्य** सिद्धी अगदी सोप्या भाषेत सांगितली आहे.

वृक्ष का वेली | लोटती फळे आली | तैसी सांडी निपजली |

कर्मे सिद्धे ||१२०||

वृक्ष व वल्ली यांना फळे आल्यावर ते फळांचा त्याग करतात ना? तसे कर्म पूर्ण झाल्यावर आपण त्याच्या फळाची आशा धरू नये. कर्मात अकर्म पाहण्याचा हा साधा सोपा मार्ग वृक्ष व वेलीतून शिकावा.

खडकी जैसे वर्षले | का आगीमाजी पेरिले |

कर्म मानी देखिले | स्वप्न जैसे ||१३१||

कर्माबद्दल कशी भावना ठेवावी? सर्व कर्मफलाचा त्याग करावा. यासाठी खडकावर पाऊस पडला तर तो व्यर्थच जातो. बी आगीत पेरले तर ते उगवण्याऐवजी वायाच जाते. त्याप्रमाणे कर्माकडे पहावे. स्वप्न खरे असते का? तशी कर्मे पण स्वप्नासारखीच आहेत असे समज.

उज्माते धरिजे | अधमाते अव्हेरिजे | हे काहिच नेणिजे |
वसुधा जेवी ||१४५||

भक्तांचे लक्षण सांगताना ज्या १३ व्या श्लोकात भगवंतांनी “अद्वेष्टा सर्व भूतांना” सांगितले त्यासाठी माऊलींनी अनेक उदाहरणे दिली आहेत. पृथ्वी म्हणजे ज्या जमिनीवर आपण चालतो ती असे कधी म्हणते का की, जे उत्तम पुरुष आहेत त्यांनीच यावर चालावे? जे अधम आहेत त्यांना ती म्हणते का माझ्या या जमिनीवर चालू नको. भक्त कोणाचाही द्वेष करित नाहीत.

गाईची तृषा हरु | का व्याघ्रा विष होऊनी मारू |
ऐसे नेणोचि गा करू | तोय जैसे ||१४७||

माऊलींनी अद्वेष्ट या लक्षणासाठी अजून हा दाखला दिला आहे. पाणी, गाय व वाघ यांच्याबाबतीत भेदभाव करते का? तहान लागल्यावर फक्त गाईला पाणी पाजते व पाण्याचे विष वाघासाठी करते,

असे काही पाणी करित नाही. पाणी जसा द्वेष भान ठेवत नाही त्याप्रमाणे भक्त पण कोणाबाबत भेदभाव करीत नाही.

अर्जुना तो भक्तु | तोचि योगी तोचि मुक्तु |
तो वल्लभ मी कांतु | ऐसा पढिये ||१५६||

अर्जुना, माझा भक्त मला किती प्रिय आहे सांगू? तोच योगी आहे व तो मुक्तपण आहे. माझा व त्याचा संबंध कसा आहे? तो पत्नी समाज व मी पत्नि समज. प्रेमभाव असा आहे.

मोक्ष देऊनी उदार | काशी होय कीर | परी वेचे लागे शरिर |
तिये गावी ||१७३||

काशीला गेल्यावर मोक्ष मिळतो असे म्हणतात. परंतु त्यासाठी तिथपर्यंत जावे लागते. माझ्या भक्तांचा सहवास असा त्रासदायक नसतो.

वोखटे का गोमटे | हे काहिच तया नुमटे |
रात्रिदिवस न घटे | सूर्यासि जेवी |

भक्तांचे अजून एक लक्षण १७ व्या श्लोकात सांगितले. इष्ट वस्तूचा लाभ झाला तरी आनंद होत नाही किंवा लाभ झाला नाही तरी दु:ख होत नाही. वाईट काय चांगले काय असा भेद भक्त करत नाहीत. सूर्याला रात्र असो किंवा दिवस असो सूर्याला त्याचा भेद वाटत नाही.

का घरिचिया उजियेडू करावा | पारखिया आंधारु पाडावा ||
हे नेणोचि गा पांडवा | दिपु जैसा ||९८||

भक्तांचे दुसरे लक्षण म्हणजे शत्रू | मित्र सारखेच! त्यासाठी माऊलींनी दिव्याची उपमा/दाखला भक्तांसाठी वापरला आहे. घरातला दिवा फक्त त्यांनाच म्हणजे घरच्यांनाच उजेड देतो व घरात परके आले तर अंधार करतो का? नाही. त्यांनाही उजेडच देतो ना! संतपण आपला परका असा भेदभाव करित नाही.

नातरी इक्षुदंडु | पाळतिया गोडु | गाळितया कडु |
नोहेचि जेवी ||२००||

विषमभाव संतांजवळ नसतो. त्यासाठी एक साधे उदाहरण माऊलींनी दिले. ऊस ज्यांनी वाढविला त्यांना फक्त गोड व जो चरकात घालणाऱ्या म्हणजे गाळणाऱ्याला कडू लागतो का? नाही. त्यालाही गोडच लागतो. संतपण भेदभाव करित नाही.

जो निंदेने नेघे | स्तुती न श्लाघे | लेपु जैसा ||
आकाश न लगे ||२०७||

संतांवर स्तुति किंवा प्रतिकूल परिणाम होत नाही. आकाश जसे नेहमी अलिप्त असते, त्याप्रमाणे संत स्तुति व निंदा यांपासून अलिप्त असतात.

आघवाचि आकाशस्थिती | जेवी वायूसि नित्यवसंती |
तेवी जगाचि विश्रांती | स्थान जया ||२१२||
हे विश्वचि माझे घर | ऐसी मती जयाचि स्थिर |
किंबहुना चराचर | आपण जाहलो ||२१३||

माझ्या भक्ताची अवस्था कशी होते? संपूर्ण जग आपले विश्रांति स्थान आहे, अशी बुद्धि त्याला होत असते, जसे वायुला पूर्ण आकाश आपले विश्रांति स्थान वाटत असते. एवढेच नाही तर संताला वाटते की, हे सगळे जग माझे आहे. एवढेच नाही तर त्याच्या ज्ञानदृष्टीमुळे त्याला सर्व सृष्टी म्हणजे मीच आहे ही वृत्ती दृढ होत असते.

तिही ऋतू समान | जैसे का गगन | तैसा एकचि मान |
शीतोष्णी जया ||२०२||

आकाशाला तीनही ऋतू सारखेच असतात. त्याप्रमाणे शीत व उष्ण यांच्यामध्ये भेदभाव करित नाही. सगळ्यांप्रति समानभाव हे माझ्या भक्तांचे प्रमुख लक्षण आहे.

\- - - - - - - - - - - - - - - - - -

# अध्याय १३ वा

# प्रकृतिपुरुष विवेकयोग

रोमा कवण पेरी | सिंधू कवण भरी |
पर्जन्याचिया करी | धारा कवण ||३६||
तैसे क्षेत्र हे स्वभावे |

आपल्या शरिरात केसांची पेरणी कोणी केली? नाही. ते स्वभावत:च आले. समुद्रात पाणी कोणी भरले आहे का? पाऊसाच्या धारा कोणी तयार केल्या? हे सगळे स्वभावत:च होते. त्याप्रमाणे क्षेत्र हे सुद्धा स्वभावत:च आहे म्हणजे त्याला कोणी निर्माण केले नाही.

किंबहुना काष्ठी | वन्ही जेवी किरीटी | तेवी प्रकृतीच्या पोटी
गोप्यु जो असे ||७९||
तैसी पांचांही गाठी पडे | जै देहाकारू उघडे |
तै नाचवी चहूकडे | तो अहंकारूगा ||

क्षेत्राचे वर्णन करताना अहंकाराचा त्यात समावेश आहे हे ५ व्या श्लोकात आले आहे. पाचही महाभूते पृथ्वी, जल, तेज, वायू व आकाश

ही शरीरात एकत्र येऊन आपण देह धारण करतो. परंतु ह्या देहात अहंकार कसा राहतो, तर मुक्तपणे. तो दिसत नाही, त्यासाठी लाकडांमध्ये अग्नी गुप्त असतो. पाहिजे तेव्हा व्यक्त होतो.

का बीजमुद्रे आतु | थोके तरू समस्तु | का वस्त्रपणे तंतु |
दशे राहे ||९५||

जैसे सांडूनिया स्थूळधर्म | महाभूते भूतग्राम |
लया जाती सूक्ष्म | होऊन जेथे ||९६||

अर्जुना, तया नावे | अव्यक्त हे जाणावे ||९७||

प्रकृती ही अव्यक्त रूपात कशी आहे, यासाठी हे उदाहरण दिले आहे यामध्ये झाड आहे ते झाडाचे अव्यक्त रूप बीजामध्ये जसे आहे किंवा तंतूंमध्ये वस्त्राचे रूप अव्यक्त स्वरूपात आहे त्याप्रमाणे स्वतःचा स्थूल धर्म सोडून पंचमहाभूते सूक्ष्म रूपाने वास करतात. ते प्रकृतीचे अव्यक्त रूप आहे.

निळिया अंबरी | का मृगतृष्णालहरी |
तैसे वायाचि फरारी | वावो जाहले ||१०५||

मन हे व्यर्थ भरारी मारत असते. क्षणाक्षणांत बदलण्याचा त्याचा स्वभाव असतो. त्याचे हे भटकणे व्यर्थ असते. मनाच्या व्यर्थपणासाठी आकाशाचा निळा रंग भासयान आहे, म्हणून व्यर्थ आहे. मृगजळाच्या

लाटा आहेत असे भासते; पण तो आभास व्यर्थच आहे. अगदी मनाचे वाऱ्याप्रमाणे हेलकावे व्यर्थ आहेत.

इही पांचै द्वारी | ज्ञानासि धांव बाहेरी |
जैसा का हिरवे चारी | भांबावे पशु ||११८||

पाच ज्ञानेंद्रियांचे पाच विषय आहेत. पाचही ज्ञानेंद्रियांची धाव त्यांच्या त्यांच्या विषयाकडे असते. ती कशी तर त्यासाठी जनावरांची धाव हिरवा चारा पाहून तिकडे धाव घेण्याची जी वृत्ती आहे, ही साधी उपमा माऊलींनी योजली आहे.

पै रावो परीवारू नेणे | आज्ञाचि परचक्र जिणे |
कां चंद्राचेनि पूर्णपणे | सिंधू भरती ||१३८||
पार्थां तियापरी | आत्मसंगती इये शरिरी |
सजीवत्वाचा करी उपेगू | जडा ||१४१||
मग तियेते चेतना | म्हणिपे पै अर्जुना ||३६||

चैतन्य व देहाचा/शरीराचा संबंध कसा आहे, यासाठी माऊलींनी दोन दाखले दिले आहेत. सैन्यातील सैनिकांची व राजाची ओळख नसते; परंतु राज्यांवर परचक्राचे आक्रमण झाल्यावर सैनिक मात्र राज्याच्या आज्ञेप्रमाणे त्या आक्रमणाला तोंड देतात. पूर्ण चंद्रोदयाने

समुद्राला आपोआप भरती येते, तसा हा जड देह चैतन्यशक्तिमुळे सजीवत्वाचे व्यवहार करतो. देहाला या सजीवत्वाचा ज्या तत्वाने उपयोग होतो ते म्हणजे चेतनाशक्ति होय.

रथांगाचा मेळावा | जेवी रघु म्हणिजे पांडवा |
का अधार्ध्व अवेवा | नाव देहो ||१५१||

सर्व अवयवांचा पायापासून डोक्यापर्यंतच्या भागांनी हा देह बनला आहे. त्यासाठी रथाची उपमा दिली आहे. जसे रथाचे वेगवेगळे भाग एकत्र करून रथ तयार होतो.

द्वैताचा दुकाळू पाहे | साम्याचे सुयाणे होय |
जया ज्ञानाची सोये | ऐसे करी ||१७०||

ज्ञानाची प्राप्ती झाली असता, काय अवस्था प्राप्त होते तर साम्य म्हणजेच अद्वैतपणा! हे दुष्काळाप्रमाणे आहे. तो नष्ट झाला तर सुयाणे म्हणजे साम्य भावाची सुफलता प्राप्त होते. द्वैताचा समूळ नाश म्हणजेच अद्वैताचा आपोआप उदय.

मग तेचि इये शरिरी | जै आपुला प्रभावो करी |
तै इंद्रियांचिया व्यापारी | डोंळांही दिसे ||१७८||
पै वसंताचे रिगवणे | झाडांचेनि साजेपणे |
जेविजे तेवी करणे | सांगती ज्ञान ||१७९||

ज्ञान प्राप्त झाले की इंद्रियांद्वारे डोळ्यांना दिसणारे असे त्याचे व्यक्त रूप त्या ज्ञानाच्या प्रभावाने शरिरात दिसू लागते शरीराचे व्यापार/कार्य सुद्धा पाहून आपण त्याला ज्ञान प्राप्त झाले, हे समजू शकतो. यासाठी माऊलींनी वसंत ऋतु व झाडाचा टवटवीतपणा याचा दाखला दिला आहे. पाने टवटवीत दिसली की, मग वसंत ऋतूचे आगमन झाले असे समजायचे. ज्ञानी माणसांचे बाह्य व्यवहार पाहून त्याच्या ज्ञानीपणाची कल्पना करता येते हे पालवीच्या रूपकाने सांगितले आहे.

का भूमीचे मार्दव | सांगे कोंभाची लवलव |
नाना आचार गौरव | सुकुलीनांचे ||१०१||

माऊलींनी ज्ञान प्रकट झाल्यावर त्याची लक्षणे ज्ञानी माणसांमध्ये आपोआप दिसतात, यासाठी २ चांगली उदाहरणे दिली आहेत. जमिनीत ओल आहे हे कोंभाच्या टवटवीतपणावरून आपोआप कळते. मनुष्याच्या आचरणावरून तो सुकुलीन आहे, हे ही आपोआप कळते.

नातरी केळी कापूर जाहला | जेवी परिमळे जाणो आला |
का भिंगारी दिपु ठेविला | बाहेरि फाके ||१८३||

केळीच्या पिकातील उत्पन्न होणारा कापूर वासावरून समजला जातो. आपण जो कंदील वापरतो त्याला **“भिंगारी”** शब्द वापरला

आहे. आतला दिवा/वात लावली तर त्याचा प्रकाश बाहेर पडलेला दिसतो, म्हणजे वात/तेल आहे हे समजावे. ही उपमा ज्ञानी माणसांच्या लक्षणासाठी वापरली आहे. एखादा माणूस ज्ञानी झाला तर त्यासाठी वेगळे निकष जरुरी नाहीत. त्याच्या बाह्य आचरणातून ते प्रकट होत असते.

नाना कृषिवळू आपुले | पांघुरवी पेरिले |
तैसे झाकी निपजले | दानपुण्य ||२०७||

माऊलींनी नंतर ज्ञानी माणसांची लक्षणे सांगितली. अदंभित्व म्हणजे दांभिकपणाचा अभाव. तो त्याचा टेंभा मिरवत नाही. किती साधे उदाहरण आहे. पहा, माऊलींनी शेतकरी पेरणी करतो व ते बी नंतर झाकून घेतो. तसेच दानाचे पूर्ण करूनसुद्धा ते गुप्त ठेवतो. दानाची वाच्यता करीत नाही.

केळीचे दळवाडे | हळू पोकळ आवडे |
परी फळोनिया गाढे | रसाळ जैसे ||२१३||

असा अदांभिकपणाअसलेला ज्ञानी पुरुष बाहेर कसा दिसतो, तर पूर्ण समाधानी असतो. याकरता माऊलींनी पुन्हा केळीच्या सोपटाचेच उदाहरण घेतले आहे. माऊलींची प्रतिभा यातून प्रकट होते. केळीचे सोपटे आधी हलके व पोकळ असते. परंतु त्यांना फळे आल्यावर रसाळ

व भरपूर केळी येतात. माऊलींनी ज्ञानी पुरुष समाधानाच्या बाबतीत अगदी असाच असतो.

एकी धर्मांचिया वाहणी | गाळू आदरिले पाणी |
तव गाळितया आहाळणी | जीव मेले ||२३५||
एक न पचविताची कण | इये हिंसेचे भेण |
तेय कदर्थलेप्राण | तेचि हिसा ||२३६||
एवं हिंसाची अहिंसा | कर्मकांडी हा ऐसा |
सिद्धांन्तु सुमनसा |वोळखे तु ||२३७||

माऊलींनी अहिंसेबद्दल स्वतःचे मत मांडले आहे. त्यांनी आयुर्वेदात हिंसाचार होत आहे, असे मत मांडले आहे. त्याबद्दल अनेक दाखले दिले आहेत. त्यातील वरील २-२ दाखले पाहू या. आपण धर्माच्या नावाखाली पाणी गाळून घेतो. पण गाळताना त्यातील जीव मरतात. काही लोक हिंसा होईल या भितीने अन्न शिजवत नाही. मग स्वतः उपाशी राहतात. ही अहिंसेच्या नावाखाली हिंसाच नाही का? या सगळया कर्मकांडात हिंसेलाच अहिंसेचा सिद्धांत मांडला आहे, असे माऊलींना सुचवावयाचे आहे.

तरी तरंगू नोलांडितु | लहरी पाये न फोडितु |
सांचलु न मोडतु | पाणियाचा ||२४६||
वेगे आणि लेसा | दिठी घालून आविसा |
जळी बकु जैसा |पाऊल सुये ||२४७||
का कमळावरी भ्रमर | पाय ठेविती हळुवार |
कुचंबैल केसर | इया शंका ||२४८||
तैसे परमाणु पां गुतले | जाणूनी जीव सानुले |
कारूण्यामाजी पाऊले | लपवूनि चाले ||२४९||

ज्याच्या अंगी अहिंसा खरोखर भिनली आहे ते त्याच्या आचरणातून कशा रीतीने प्रकट होते, याकरिता ही तीन उदाहरणे माऊलींनी दिली आहेत ती पाहू या. बगळा मासा कसा पकडतो? तर लाटांचे तरंग आहेत ते आपल्या पायाने मोडता कामा नये, याची दखल घेत पाण्यातून चालतो. कमळावरील भुंगा आतील केसर दुखावणार नाही, म्हणून अलगद कमळावर बसतो, त्याप्रमाणे अहिंसेला सांभाळणारा ज्ञानी पुरुष चालतांना जमिनीतील कणाकणांत जे सूक्ष्मजीव आहेत ते दुखावले जाणार तर नाहीत ना! इतकी करुणामय दृष्टी या आयुष्याची काळजी घेणाऱ्या माणसाची असते.

तरी दुवाळी कोणा नोहावी | भुंबई कवणाची नुचलावी |
ऐसा भावो जीवी | म्हणौनी उगा ||२६७||

यानंतर अशा अहिंसेने वागणाऱ्या पुरुषाचे वर्णन करताना माऊली म्हणतात, आपल्याकडून कोणाची निंदा, टवाळी होऊ नये यामुळे आपणाकडे कोणी भुवया चढवून रागावून बोलू नये असा भाव त्याच्या मनात असल्याने तो शांत बसतो.

जे बीज भुई खोविले | तेचि वरी रूख जाहले |
तैसे इंद्रीयद्वारी फाकले | अंतरचि की ||२९७||
पै मानसीचि जरी | अहिंसेची अवसरी |
तरी कैची बाहेरी | वोसंडेल ||२९८||

माऊलींनी मन व शरिराचे व्यापार या संबंधांद्वारे अहिंसेचे उत्तम उदाहरण दिले आहे व त्याकरीता त्यांनी आपण जे बी लावतो त्याचेच पुढे झाड होते, त्याप्रमाणे मनामध्ये अहिंसा असेल तर बाह्यशरीर क्रियेतून ते बाहेर पडतात. पण जर मनात अहिंसेचा विचारच नसेल तर बाहेरच्या क्रिया त्यातून कशा येतील? त्या अहिंसक येतील.

आणि घांसाआंतिल हरळु | फेडिता लागे वेळु
ते दुषण नव्हे खडळू | सांडावा की ||३३६||

कां संवचोरा चुकविता। दिवस लागलिया माता।
कोपावे की जिविता। जिताणे कीजे ॥३३७॥

माऊलींना आपण अहिंसेबद्दल केलेले विस्तृत निरूपण लांबले आहे, याची जाणीव आहे म्हणून त्यांनी हे उदाहरण दिले आहे. किती साधे उदाहरण दिले आहे. आपण जेवतांना घासात खडा लागला तर वेळ लागेलच ना, मग त्यात वेळ लागला म्हणून दोष देता येईल का? तर नाही. खडा काढूनच पुढे जायचे ना, किंवा वाटेत चोर दिसतोय व त्याला चुकवावयाचे तर आडमार्गाने जावे लागेल. जीव वाचवायचा तर वेळ लागेलच ना, त्याप्रमाणे मी अहिंसेची चर्चा करताना बरेच हिंसेचे दाखले दिले तर मला दोष देऊ नका, हे माऊलींना नम्रपणे सुचवावयाचे आहे.

का सुकतया अंकुरावरी पडलिया पीयूषधारा।
नाना अल्पोदकीचा सागरा। आला मासा ॥३८१॥
पै गुरुकुळी ऐसी। आवडी जया देखसी।
जाण ज्ञान तयापासी। पाईक करी ॥३८४॥

गुरुभक्तिला ज्या ज्ञानीयांनी सर्वस्व अर्पण केले आहे, त्याच्या अवस्थेचे वर्णन करतांना माऊलींनी दोन सुंदर दाखले दिले आहेत. अंकुर फुटला पण तो सुकू लागल्यावर त्याच्यावर अमृताचा वर्षाव

व्हावा. मासा छोटया पाण्यातून सागरात गेल्यावर त्याची जी अवस्था होईल त्याप्रमाणे गुरुभक्तिबद्दल तो इतका जागृत असतो की, गुरुकुळाचे नाव कानी पडले तरी त्याला अत्यानंद होईल तो त्याचे दास्यही करेल.

म्हणे शुचित्व गा ऐसे | जयापाशी दिसे |
अंग मन जैसे | कापुराचे ||४६२||

ज्ञानी माणसाच्या शुचित्वाला माऊलींनी कापुराची उपमा दिली आहे. ज्ञानीयांचे अंतर्बाह्य कापरासारखे शुद्ध अंतकरण असते, हेच यातून सांगायचे आहे.

पाणिये हिरा न भिजे | आधणी हरळु न शिजे |
तैसी विकल्पजाते न लिंपीजे | मनोवृत्ती ||४८३||
तया नाव शुचिपण | पार्था गा संपूर्ण |
हे देखसी तेथे जाण | ज्ञान असे ||४८४||

पाण्यामध्ये हिरा भिजत नाही. गरम पाण्यात वाळू टाकली तर ती शिकते का? नाही ना, त्याप्रमाणे कोणताही विकल्प त्याला (ज्ञानीयाला) बाधा निर्माण करू शकत नाही. त्याची मनोवृत्ती पूर्णपणे शुचित्वाची प्रत्यय देते.

आणि इसाळू जैसा घरा | का द्वंदी हातियेरा |
न विसंबे भांडारा | बद्धकु जैसा ||५०२||
अर्जुना जो यापरी | अंत:करण जतन करी |
नेदी उभे ठाको द्वारी | इंद्रियाच्या ||५०४||

ज्ञानी पुरुषाचा स्वभाव धैर्यशील असतो. तो त्याच्या अंत:करणात विषयाला अजिबात थारा देत नाही. याबाबत तो किती जागृत असतो, त्यासाठी ३ उदाहरणे दिली आहेत. साप आपले घर म्हणजे बीळ कधीच विसरत नाही. योद्धा स्वतःची शस्त्रे कुठे ठेवलीत, हे कसे विसरेल? कंजूष माणूस आपले पैसे जिथे सुरक्षित ठेवलेत ते ठिकाण विसरणे शक्य नाही. तसाच ज्ञानी सदैव जागरूक असतो. इंद्रियाच्या घरावर विषयवृत्तीला तो दूर लावतो.

बाहेरी धीट जैसी | दाटुगा पति कळासी |
करी टेहणी तैसी | प्रवृत्तीसी ||५०६||

ज्ञानी मनुष्य प्रवृत्तिला दूर कशा पद्धतीने ठेवतो, त्यासाठी हे मजेशीर संसारी नवरा बायकोचे उदाहरण दिले आहे. एखादी धीट पत्नी असेल, तर पति तिला बाहेर जाऊच देत नाही. गेली तरी ती कुठे गेली यावर पाळत ठेवीन. त्याप्रमाणे प्रवृत्तीला तो आत शिरकाव करूनच देत नाही आणि जर प्रवृत्तीचा उदय झाला तर कटाक्षेने लक्ष ठेवतो.

परि हे मियां केले | की हे माझेनि सिद्धी गेले |
ऐसे नाही ठेविले | वासनेमाजी ||५२७||
जैसे अवचितपणे | वायुसि सर्वत्र विचरणे |
की निरभिमान उदैजणे | सूर्याचे जैसे ||५२८||

ज्ञानी आपण केलेल्या कृत्याची कधीही वाच्यता करीत नाही. मी हे केले, माझ्यामुळे कार्य सिद्धीस गेले. ही भावना त्याच्याजवळ असत नाही. त्यासाठी माऊलींनी वायु व सुर्य ह्याचा सहज दाखला दिला. अचानकपणे वायु कोठेही संचार करतो. सूर्याला आपण कुठे प्रकाश केला याबद्दल यत्किंचितही अभिमान असत नाही.

संबंधेवीण जैसी | अभ्रे असती आकाशी |
देही कर्मे तैसी | जयासि गा ||५३२||

आकाशात ढग जमतात, पण त्याची जाणीव आकाशाला असते का? जणू त्याचा ह्याच्याशी संबंधच नसतो. तशी कर्मे त्याला लिप्त होत नाही. ज्ञानी कर्मात अकर्म पाहतो, म्हणतात ना तेच खरे आहे.

आजी अथाव म्हणता | थडियेचि पंडुसता |
पोहणार आईता | कासे जेवी ||५४६||

ज्ञानी किती सावध असतो, यासाठी माऊलींनी व्यवहारातला समजेल असा दृष्टांत दिला आहे. पोहणारा किती सावध असतो? जिथे खोल पाणी असते, हे त्याला जर माहित असेल तर तो तीरावरच पोहण्यास तयार असतो.

कुळवाडी रिणे दाटली | का वाकडिया ढोरे बैसली |
तैसी नुठी काही केली | जीभचि हे ||५६६||

पहा, यात माऊलींनी कर्जबाजारी शेतकऱ्याची व्यथा मांडून दाखला दिला आहे. खूप कर्ज असली तर शेतकरी यातून सावरत नाही. खूप सारखा पाऊस असेल, तर घरातील जनावरे बाहेर कशी जाणार? आपल्या जिभेचे म्हातारपणी काय हाल होतील? जिभेची साधी हालचाल होणार नाही, याची जाणीव ज्ञानीयाला तरुणपणीच होत असते व या बाबतीत सदैव सावध असतो. कर्जबाजारी शेतकऱ्यांची अवस्था माऊलींना पण ठाऊक असावी याचे मला खूपच कौतुक वाटते.

महासिंधू जैसे | ग्रीष्मवर्षी सरिसे |
इष्टानिष्टी तैसे | जयाच्या ठायी ||६०१||
का तिन्ही काळ होता | त्रिधा नव्हे सविता |
तैसा सुखदु:खी चित्ता | भेदु नाही ||६०२||

ज्ञानी पुरुष आसक्तीमध्ये गुंतत नाही ह्याचे स्पष्टीकरण देताना माऊलींनी अनेक दाखले दिले आहेत. पैकी हे दोन आहेत. समुद्र उन्हाळा असो की, पावसाळा असो; कमी-अधिक होत नाही. त्याप्रमाणे इष्ट व अनिष्ट स्थितीत ज्ञानी समचित्त असतो. सकाळ, दुपार किंवा सायंकाळ हे दिवसाचे दिनमान वेगळे. पण तसे ३ प्रकार सूर्याच्या ठिकाणी असत नाही. सुख व दुःख यामुळे चित्तात भेद ज्ञानी पुरुष करीत नाही.

रिगता वल्लभापुढे | नाही आंगी जीवी सांकडे |
तिये कांतचिने पाडे | एकसरला जो ||६०७||
मिळोनी मिळतचि असे | समुद्री गंगाजळ जैसे |
मी होऊन मज तैसे | सर्वस्वे भजती ||६०८||

ज्ञानी अनन्यभक्तिने माझ्या ठिकाणी लीन होतो. तो कसा? तर प्रतिव्रता स्त्री पतीकडे जाताना स्वतःच्या शरिराचा, जिवाचा विचार करते का? नाही. ती एकरूप होते शरीराने व मनाने. गंगा किंवा नदी समुद्राला मिळते, मग तिला तिथे मूळ स्वरूप पुन्हा येते का? नाही. ती समुद्राशी एकरूप होऊन जाते. तसा हा माझा अनन्यभक्त एकरूप होऊन माझेच भजन करीत असतो.

जरि ज्ञानाचेनि प्रकाशे | परततत्वी दिठी न पैसे |
ते स्फूर्तीचि असे | अंध होऊनी |

किती सुंदर दृष्टांत आहे. पहा, ज्ञानरूपी प्रकाश तुमच्या अंत:करणात, मनात, चित्तात पडलाय, असे असूनही जर तुम्हाला परतत्त्वाचा निश्चय होत नसेल, जाणीव होत नसेल तर मग तुमची ही ज्ञानदृष्टी जिला माऊलींनी स्फुर्ति म्हंटली आहे, ती आंधळीच नाही का? ज्ञानरूपी प्रकाशात आपल्याला परतत्त्वाचे ज्ञान होणे अपेक्षित आहे.

तैसे ज्ञानाचे बोलणे | आणि येणे रसाळपणे |
आता पुरे कोण म्हणे? आकर्णिता ||६४३||
आणि सभाग्यु पाहुणा ये | सुभगाची वाढती होये |
तै सरो नेणे रससोय | ऐसे आथी ||६४४||

माऊलींचे ज्ञानी पुरुषांचे वर्णन ऐकून व दाखले ऐकून त्यांचे सदगुरु श्रीनिवृत्तीनाथ अत्यंत आनंदी झालेत. हे माऊलींना सुचवावयाचे आहे. त्यासाठी त्यांनी आणि पुरुषांचे वर्णन व त्यात रसाळ-मधुर वाणी मग नाही कोण म्हणणार, आम्ही ऐकतच राहू ना? सदभाग्याने घरी पाहुणा आला व उदारवृत्तीची स्वयंपाक करणारी स्त्री जर असेल, तर स्वयपाकातील पदार्थ, पक्वान्ने नको कोण म्हणेल? वाढण्याचा आग्रह पाहुणाही करेल व ती स्त्री ही वाढेलच ना!

करतळावरी वाटोळा | डोलतु देखिजे आंवळा |
तैसे ज्ञान आम्ही डोळा | दाविले तुज ||६५२||

ज्ञानाची १८ ही लक्षणे अगदी स्पष्टपणे समजेल, अशी सांगितली तर ती कशी? यासाठी तळहातावर आवळा ठेवला, तर तो आपल्याला कसा स्पष्ट दिसतो, तसे तुझ्या डोळ्याला ज्ञान दिसेल तसे दाखविले आहे.

आणि वन्ही वनी विचरे | तेथ जळती जैसी जंगमे स्थावरे |
तैसे तयाचेनि आचारे | जगा दु:ख ||६६२||

आता अज्ञानी माणसाचे वागणे कसे असते? त्यासाठी रानात लागलेल्या आगीचे किंवा वणव्याचे उदाहरण दिले आहे. वणवा भडकला की, जंगलातील पक्षी, प्राणी, झाडे हेही त्यातून सुटत नाहीत. त्याप्रमाणे अज्ञानी माणसाच्या वर्तणुकीने इतर जगाला पण दुःख सोसावे लागते.

गार शेवाळे गुंडाळली | का निंबोळी जैसी पिकली |
तैसी जयाची भली | बाह्य क्रिया ||६७१||

पहा, अज्ञानी माणसाच्या बाह्यक्रियेने तुम्ही कदाचित भाळून जाल. तो बाहेरून चांगला वाटेल, पण अंतरिक कृति वाईट असते. एखादी गारगोटी शेवाळेने आच्छादली तर सुंदर दिसू शकते. आपण फसू शकतो. पिकलेली निंबोळी बाहेरून चांगली दिसते. मग ती कडू असतेच ना? अज्ञानी माणसांचे बाह्यवर्तन असे असते.

जैसा रोविल्याविणे | रांजणु थारो नेणे |

तैसा पडे तै राहणे | एरव्ही हिंडे |

अज्ञानी माणूस किती अस्थिर असतो, तो एक ठिकाणी स्थिर राहू शकत नाही, त्यासाठी त्यांनी रांजणाचा दाखला दिला आहे. मला हा दाखला पहिल्या प्रथम वाचला तेव्हाच आवडला. लहानपणी घरी रांजणात मी पाणी भरत असे. पण रांजणात भोवतालची माती थोडी जरी ढिली झाली तर रांजण हालत असे, म्हणून रांजणाला भक्कम आधार देऊन मातीत पुरावे लागायचे. तसे अज्ञानी माणसाला जर अडवून ठेवले नाही तर तो सारखा हिंडत राहतो. पहा, किती साधी उदाहरणे माऊलींनी दिली आहेत. त्यावेळच्या परिस्थितीत ती किती मिळतीजुळती होती.

विषो शिणोनि जाये | परि न शिणे सावधु नोहे |

कुहिला हाती खाये | कोंढी जैसा ||७०५||

अज्ञानी पुरुषाला विषयाचा कधी कंटाळा येत नाही. ज्याचा उपभोग घेतो ते संपून जाते. पण याला मात्र शिण होत नाही. कोड आलेला माणूस कोड आलेल्या हाताने खातो. पण त्याचे त्याला काही वाटत नाही.

बेडूक सापाचिया तोंडी | जातसे सबुडबुडी |

तो मक्षिकांच्या कोडी स्मरेना काही ||७३१||

अज्ञानी माणसाचे वर्णन करताना माऊलींनी साप व बेडूक यांची उपमा कशी दिली? पहा, बेडूक सापाच्या तोंडात आहे. तो गिळला जातो, तरी माशा खाण्याचे सोडत नाही. इंद्रिय विषय भोग भोगून आता थकले, तरीही याचे भान त्याला नसते. यासाठी माऊलींनी हा दाखला दिला आहे.

साकरेचिया राशी | बैसली नुठे माशी |
तैसोनी स्त्रीचित्त आवेशी | जयाचे मन ||७८३||

माऊलींनी किती प्रकारे अज्ञानी माणसाचे वर्णन केले आहे. पहा, स्त्रीविषयी त्याच्या मनात जी आसक्ति आहे, तिचे वर्णन करताना साखरेचा ढिग पाहिला, तर माशी तिथून आल्याचे नावच घेत नाही. त्याप्रमाणे स्त्रीवर त्याचे चित्त इतके जडते की मनाने आवर घेताच येत नाही.

मोरा अंगी अशेषे | पिसे असती डोळसे |
परी एकली दृष्टी नसे | तैसे ते गा |
तैसे शास्त्रजात जाण | अवघेचि अप्रमाण |
पार्था अध्यात्मज्ञानेविण एकलेनी ||

अध्यात्म शास्त्राशिवाय इतर सर्व शास्त्रे अप्रमाण आहेत, माऊलींना हे सुचवावयाचे आहे. त्यासाठी त्यांनी मोराच्या पिसांचा उल्लेख अतिशय सुंदर रितीने केला आहे. पिसाऱ्यावर **डोळे** किती

दिसतात, पण त्यात दृष्टी असते का? मग ते जसे व्यर्थ! तसेच इतर शास्त्र परमात्म्याकडे मिळत नसतील तर व्यर्थच नाही का?

पै शून्य जै दावावे जाहले | तै बिंदुले एक केले |
तैसे अद्वैत सांगावे बोले | तै द्वैत किजे ||८८८||

अद्वैत सांगायचे झाले तर द्वैताचा आधार घ्यावाच लागतो. भेद सांगून व अभेद सांगावा लागतो. दोन सांगून एकरूपाने एक सांगावे लागते. त्यासाठी शून्य म्हणजे काही नाही. पण मग दाखवावयाचे कसे? त्यासाठी बिंदूचा आधार घेऊन वर्तुळाकार गोल काढावा लागतो. अद्वैत अवस्थेचे वर्णन करताच येत नाही. पण लोकांना समजण्यासाठी द्वैताचे परिमाण वापरावे लागते.

पै गुळाची गोडी | नोहे बांधया सांगडी |
तैसी गुण इंद्रिये फुडी | नाही तेथ ||९०१||

ब्रह्म हे बाह्य गुणांपासून वेगळे असते. इंद्रियांना ते विकार पावत नाही. गुळाच्या **ढेपेवरून** म्हणजे आकारावरून **गोडी** कळेल का? नाही. सर्व वस्तुत ब्रम्हतत्त्व आहे पण वस्तुमध्ये असूनही ब्रह्म वेगळे आहे, हे माऊलींनी खूप प्रकारे समजावले आहे.

नाना लवणकणाचिये राशी | क्षारता एकचि जैसी |
का कोंडी एकी ऊसी | एकचि गोडी ||९१९||

सर्व विश्व एकाच तत्त्वाने व्यापले आहे. त्यासाठी मिठांच्या राशी अनेक. पण क्षारपणा एकच. उसाची कांडी अनेक. पण गोडी एकसारखी. तसे बाह्यस्वरूप वेगळे असले तरी त्यात दडलेले ब्रह्मतत्त्व एकच आहे. त्यासाठी किती साधी उदाहरणे माऊलींनी योजली आहेत.

जैसे सरलिया लेख | आंख होती एक |
तैसे साध्यसाधनादिक | ऐक्यासि ये ||९३८||

एकदा ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान या त्रिपुटीचा विलय झाला की, एक निर्गुण ब्रह्मतत्त्वाची जाणीव होते. साध्य व साधनाचे ऐक्य होऊनच ते प्राप्त होते. पहा, त्याकरिता गणिताचे उदाहरण सहज दिले आहे. आपण पाटीवर पूर्वी एखादे गणित सोडवत असू. मग त्याचे उत्तर आले की, मग उत्तराच्या अंकलाच फक्त महत्त्व. बाकीच्या अंकाची मोडतोड केलेली आता संपली ना. साधने कुठपर्यंत, जोपर्यंत त्यांच्याकरवी अंतिम ध्येय जे ब्रह्मऐक्य आहे, साध्य होत नाही तोपर्यंतच. माऊलींनी हरिपाठात म्हंटले आहे ना, हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा. नामजप करा सतत. जोपर्यंत तुम्हाला सायुज्याकडे जाता येत नाही तोपर्यंत. एकदा का तुम्ही त्या स्वरुपाशी एकरूप झाला की, मग **नामजपाचे** महत्त्व आपोआप संपेल.

पै बाळ जै जेवविजे | तै घांसु विसा ठायी किजे |
तैसे एकचि हे चतुर्व्याजे | कथिले आम्ही ||९५१||
एक क्षेत्र एक ज्ञान | एक ज्ञेय एक अज्ञान |
हे भाग केले अवधान । जाणौनी तुझे ||९५२||

पहा, एकच ब्रह्म. पण त्याचे चार प्रकार करून, तुला समजावे म्हणून केले, असे भगवान अर्जुनाला सांगत आहेत. क्षेत्र, ज्ञान, ज्ञेय, अज्ञान या ंद्वारे ब्रह्म काय, ते समजावले आहे. त्यासाठी आपण लहान मुलांना घास भरवताना एक मोठा घेतो का? नाही. छोटे छोटे घास करून भरवतो. का तर त्याला ते सहज खाता यावेत. पहा, माऊली अगदी आईच्या मायेने जणू आपल्याशी संवाद साधतात, असेच वाटते.

विदळ बहु चोखा | मिनलिया वाला एका |
कसु होय पाचका | जयापरी ||१००८||
का सांधूते गोंधळी | संचरोनि सुये मैळी ||
नाना सुदिनांचा आभाळी | दुर्दिनु किजे ||१०१०||
की पय पशुच्या पोटी | का वन्ही जैसा काष्ठी |
गुंडूनि घेतला पटी | रत्नदीपु ||१०११||
राजा पराधीनु जाहला | कीं सिंहु रोगे रुंधला |
तैसा पुरुष प्रकृति आला | स्वतेजा मुके ||१०१२||

पुरुष म्हणजे जीव व प्रकृतीने तो वश झाला की, मग त्याचे स्व स्वरूप विसरतो व तिला वश होतो, हे सांगण्यासाठी माऊलींनी निरनिराळ्या प्रकारे समजावून सांगितले आहे. पहिला म्हणजे सोन्याला जर दुसऱ्याचा डाग दिला तर त्याचा कसा उतरतो. दुसरा दाखला साधूचा दिला. त्याला संगत चांगली मिळाली नाही तर त्याच्या साधुत्वाचा गोंधळ उडतो. आल्हाददायी दिवस असावा, वातावरण प्रसन्न असावे, त्याच वेळी आकाशात ढग जमावेत, आभाळाने अच्छादले जावे, तर तोच दिवस वाईट ठरू शकतो. गाईच्या पोटात दूध किंवा लाकडात अग्नि असून काय उपयोग? रत्न आहे; पण कापडाने झाकलेय काय उपयोग? राजावर आक्रमण होऊन तो पराधीन झाला तर राजेपणा राहत नाही. सिंह रोगाने ग्रासला तर तो काय करू शकेल? या सगळ्या उदाहरणांचा एकच उद्देश आहे. पुरुष म्हणजे जीव, प्रकृतीचा अंकित झाला, तर स्वतेजाला मुकतो.

दर्पणाचिया जवळिका | दुजेपण जैसे ये मुखा |
का कुंकमे स्फटिका | लोहितत्त्व ये ||१०१८||

प्रकृती पुरुष हे दोन भासतात. कारण प्रकृतिचा संग त्याला कारणीभूत आहे. पण पुरुष तर अभिन्न आहे, अजन्म आहे. त्यासाठी दोन छोटी उदाहरणे दिली आहेत. आरशाजवळ गेल्यावर आपण आपलेच प्रतिबिंब पाहतो. मग मुख दोन झाले का? नाही. कुंकूच्या

रंगासारख्या पदार्थावर स्फटिक ठेवला तर तो स्फटिकच लाल आहे, असे वाटते. पण तसे नाही.

हा प्रकृतिमाजी उभा | परी जुई जैसा वोथंबा |
इया प्रकृति पृथ्वीनभा | तेतला पाडु ||१०२२||

पुरुष प्रकृतिमध्ये जणू उभा आहे. जीव या प्रकृतिचा भाग आहे, असे वाटते. त्यासाठी किती साधे उदाहरण दिले. पहा, जाईचा वेल आहे, त्याला आपण आधारासाठी लहान काठी ठेवतो. याचा जसा संबंध आहे, किंबहुना आकाश व जमीन (पृथ्वी नभा) याचे अंतर किती आहे? तितका भेद या दोघांमध्ये आहे म्हणजे पुरुष व प्रकृति मध्ये.

पै नाना प्रयोजनशीळे | दीर्घे वक्रे वर्तुळे |
होती एकीचीचा फळे | तुबिणीयिची||१०६१||
तैसी भूते अवघडे | परी वस्तु उजू ||१०६२||

तुबिणी म्हणजे भोपळा. त्याच्या वेलीला कशी फळे येतात? मोठी, छोटी, वाकडे, सरळ. पण फळ म्हणून ते एकाच प्रकारचे. त्याप्रकारे वेगवेगळी भूते म्हणजे प्राणी आहेत. परंतु त्यामध्ये जे परतत्त्व आहे, जीव आहे, तो एकच आहे. त्या जीवाचे स्वरूप मूलतः एकच आहे. हा विचार माऊलींनी सांगायचा हरप्रकारे प्रयत्न केला आहे.

घरीची रहाटती घरी | घर काही न करी |
अभ्र धावे अंबरी | अंबर ते डगे ||१०८१||

तैसी प्रकृति आत्मप्रभा | खेळे गुणी विविधारंभा |
येथ आत्मा तो वोथंबा | नेणे कोण ||१००२||

किती साधे उदाहरण. पहा, आत्मा हा अकर्ता आहे, हे सांगण्यासाठी घराचे उदाहरण दिले. घरात आपण सगळे राहतो व अनेक कार्य करतो. पण मग घर काही करते का? नाही. अनेक ढग आकाशात धावताना दिसतात. पण मग आकाश तर शांतच असते ना! अगदी त्याप्रमाणे प्रकृतिच्या तिच्या आत्मप्रकाशाच्या आधारावर खूप गुण साकारून कार्य करते. पण मग आत्मा आकाशासारखा निश्चल असतो.

संसर्गे चेष्टीजे लोहे | परि लोहे भ्रामकु नोहे |
क्षेत्र क्षेत्रज्ञा आहे | तेतुला पाडु ||११२३||

भ्रामकु म्हणजे लोहचुंबक. लोहचुंबकाच्या संसर्गाने लोखंडाच्या क्रिया होताना दिसतात. पण लोखंड व लोहचुंबक हे वेगवेगळे असतात. अगदी त्याचप्रमाणे क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचा संबंध आहे. प्रकृती व पुरुषांचा संबंध दाखविण्यासाठी माऊलींनी लोखंड व चुंबकाचे उदाहरण दिले आहे.

हे आघवेचि असो एकू | गगनौनि जैसा अर्कु |
प्रगटवी लोकु | नावे नावे ||११२७||

माऊलींनी पुरुष व प्रकृति किंवा आत्मा व शरीर यांसाठी अनेक उदाहरणे देऊन झाल्यावर माऊली म्हणतात, हे सगळे दृष्टांत राहू द्या.

आकाशात सूर्य एकच, पण त्याचा प्रकाश पृथ्वीवर पडतो. तो किती भिन्न भिन्न प्रकारच्या जीवांना प्रकाशित करतो. तसेच हे आहे. आत्मा हा अलिप्त असूनही सगळ्या जीवांचा प्रकाशकच आहे.

जे शुकनाळिकान्याये | न लगती लागली आहे |
हे जैसे तैसे होये | ठाउवे जया ||११३७||

माऊलींनी पोपट शुककळीकेवर पिंजऱ्यातील दांडयावर कसा राहतो याचे उदाहरण २-३ वेळा ज्ञानेश्वरीत दिले आहे. वास्तविक तो नळीत अडकला नाही. पण त्याला तसा भ्रम पडतो व तो अडकलाय असे त्याला वाटते. आत्मा जीवाला बद्ध करीत नाही. पण जीवाला मात्र तसे उगीचच वाटते.

जैसा वाग्विलास विस्तारू | गीतार्थेसी विश्व भरू |
आनंदाचे आवारू | मांडू जगा ||११६०||

१३ व्या अध्यायाची समाप्ती करताना माऊलींनी किती छान उपमा दिली आहे. गीतेचा अर्थ सांगताना भाषेचा/शब्दाचा/वाणीचा असा काही विस्तार मी करेन की, हे संपूर्ण विश्व आनंदाच्या आवरणाने भरून टाकू. सगळ्यांना माझ्या या शब्दरूपी अर्थाने आनंदच आनंद होईल.

\- - - - - - - - - - - - - - - - - - -

# अध्याय १४ वा

# गुणातीत योग

माऊलींनी अध्यायाची सुरुवात आपले सदगुरु श्रीनिवृत्तीनाथ महाराज यांच्या स्तुतिसुमनाने व त्यांचा आशीर्वाद कृपादृष्टी मिळावी याने अतिशय सुंदर रीतीने केला आहे.

आता कृपा भांडवल सोडी | भरी मति माझी पोपडी |
करी ज्ञानपद्म जोडी | थोरा माते ||१७||
मग मी संसरेन तेणे | करीन संतासी कर्णभूषणे |
लेववीन सुलक्षणे | विवेकाची ||१८||
जी गीतार्थनिधान | काढू माझे मन |
सुयी स्नेहांजन । आपले तू ||१९||

सदगुरुंकडे कृपेचे भांडवल आहे. त्यातून माझ्या बुद्धिला थोडा पुरवठा करावा, कृपा करावी. मला त्या कृपेने ज्ञानपद्य जोडता येईल, म्हणजे मी पुढील निरूपण व्यवस्थित करू शकेल. यामुळे मी वाचकांना म्हणजे त्यांनाच माऊलींनी संत म्हटले. चांगले ऐकविल. तिच कर्णभूषणे

होतील. विवेकाची सुलक्षणे श्रोत्यांना घालून त्यांना आपल्या कृपेचे अंजन माझ्या बुद्धिरूपी नेत्रात घाला. मग पहा, मी गीतेचा अर्थ म्हणजे निधान गुप्त ठेवा बाहेर काढावा तसा काढेल. माऊलींनी सदगुरुंना घातलेले साकडे ऐकले की, मन आनंदित होऊन जाते.

की विरुढलिया जोंधळा | कणिसाचा निर्वाळा |
वेचला की आगळा | दिसतसा ||१२६||
म्हणौनि जग परौते | सारुनि पाहिजे माते |
तैसा नोहे उखिते | आघवे मिचि ||१२७||

माऊलींनी चैतन्यस्वरूप ब्रम्ह व जग याबद्दल दाखला देतांना किती साधे उदाहरण दिले. पहा, ज्वारीच्या दाण्यापासून पेरल्यानंतर जोंधळा वाढतो व कणीस येते. मग मूळ ज्वारीचा पेरलेला दाणा कुठे गेला? तो नाहीसा झाला का? की वाढला? याचे जे उत्तर तेच जगाचे व माझे आहे. संपूर्ण जग एका बाजूला सारून जे राहील ते मी. पण मी तर दिसणार नाही. कारण सगळे जगच मद्रूप आहे.

जैसी मीनाच्या तोंडी | पडेना जव उंडी |
तव गळ आसुडी | जळपारधी ||१४७||
तेवी सत्वे लुब्धके | सुखज्ञानाची पाशके |
वोढिजती मग खुडके | मृगु जैसा ||१४८||

गुणांच्या संगतीने जीव कसा बद्ध होत जातो, याचे एक उदाहरण म्हणजे माशाच्या तोंडाला अमिष दाखवून त्याला मच्छिमार कसा पकडतो, हरणाला पारधी पाशात कसा गुंतवतो, तसा सत्त्वगुण जीवाला सुखाची-ज्ञानाची अमिषे दाखवून आत्मसुखाला तो जीव वंचित होतो.

रावो जैसा स्वप्ने | रंकपणे रिघे धानी |
तो दो दाणा मानी | इंद्रु ना मी ||१९४||
तैसे गा देहातीता | जालेया देहवंता |
हो लागे पंडूसुता | बाह्यज्ञाने-

मूळ देहातीत असलेला जीव, देह म्हणजेच मी आहे; असे कधी समजतो. तर त्याला बाह्यज्ञान झाल्यावर त्याला त्या ज्ञानाचा अभिमान वाटू लागतो. त्यासाठी माऊलींनी स्वप्नाचा एक साधा दृष्टांत दिला आहे. पहा, एखाद्या राजाला स्वप्न पडले की, तो भिकारी आहे व भीक मागतोय, तर त्याला भीक म्हणून कोणी २ आणे जरी दिले तर त्याला वाटते, मी श्रीमंत झालो, त्याला माऊलींना इंद्रपद मिळाले, असे वाटते असे म्हंटले आहे.

काय चंचळु मासा? कामिनी कटाक्ष जैसा |
लवलाहो तैसा | विजूही नाही ||१७०||
हे रजोगुणाचे दारुण | देही देहियासी बंधन ||१७३||

रजोगुण स्वस्थ बसू देत नाही. तो माणसाला किती चंचल बनवतो, त्यासाठी माऊलींनी ३ उदाहरणे दिली आहेत. मासा किती चपळ आहे? स्त्रीचा नेत्रकटाक्ष अर्थात कामी स्त्री किती चपळ आहे? विज चमकताना तिचे चमकणे किती चंचल आहे? त्यापेक्षाही जास्त हा रजोगुणी माणूस चंचल असतो. रजाचे बंधत्व त्याला आत्मतत्त्वापासून दूर नेऊन बंधनात अडकवते.

पडलिये धोंडी | नेणे कानी मुरडी |
तयाचि परी मुरकुंडी | उकलू नेणे ||१८२||

तमोगुणी माणूस किती आळशी असतो? पहा, एकदम मोठा दगड म्हणजे धोंडा. तो सहसा हलत नाही, तसा हा असा काही झोपतो की, कुशीसुद्धा बदलत नाही.

पै हरूनि कफवात | जै देही ओटोपे चित्त |
तै करी संतप्त | देह जेवी |
तैसी रजतमे हारवी | जै सत्त्व माज मिरवी ||
तै जीवाकरवी म्हणवी | सुखिया ना मी? ||१९९||

रज व तम या दोन गुणांना मागे टाकून सत्त्वगुणाची वाढ होत असते व तो जीव म्हणतो मीच सुखी. त्यासाठी कफ व वात दोघे दोष

संपले की, पित्ताचा प्रकोप होतो, म्हणजे शरिराला त्याचा खूप त्रास होतो. जीव संतप्त होतो.

अगा पुनवेच्या दिवशी | चंद्रप्रभा धावे आकाशी |
ज्ञानी वृत्ती तैसी | फाके सैंध ||२१२||

ज्ञानी माणसाच्या वृत्तीत बाह्यबदल आपोआप दिसतात. इंद्रियाद्वारे चिन्हे दिसू लागतात. त्यासाठी एक उदाहरण पौर्णिमेचा चंद्र. त्यावेळी चंद्राची प्रभा पूर्ण आकाशाला व्यापून टाकते त्याप्रमाणे त्याचे ज्ञान व वृत्ती सर्वत्र व्यापून राहते.

पांजरली वाहटुळी | करी वेगळ वेंटाळी |
तैसी विषयी सरळी | इंद्रिया होय ।|२२८||

रजतत्त्वाचा परिणाम काय व कसा होतो? मन कसे चंचल-स्वैर होते, त्यासाठी वावटळीचे साधे उदाहरण दिले आहे. त्यात हलक्या वस्तू कशा गोल गोल फिरतात, त्याप्रमाणे इंद्रिये स्वैर धाव घेतात.

तरी होय ऐसे मन | जैसे रविचंद्रहीन |
रात्रीचे का गगन | अवंसोचीये ||२४५||

माऊली आता तमोगुणाचे प्राबल्य झाले तर काय होते, ते सांगतात. त्या माणसाचे मन पूर्ण अंध:काराने म्हणजे अज्ञानाने व्यापते.

ते कसे? तर अमावस्येला आकाशात पूर्ण अंधार असतो, त्यावेळी सूर्य व चंद्र दिसत नाही.

मदिरा न घेता डुले | सन्नीपातेवीण बरळे |
निष्प्रेमेचि भुले | पिसे जैसे ||२५२||

तमोगुणी इतका वाईट वागतो की, त्यासाठी त्याला कशाचीच गरज पडत नाही. त्यासाठी माऊलींनी म्हटले, तो दारू न घेता ही डोलायला लागतो. माणूस सन्निपातात बरळतो म्हणतात. पण याला सन्निपात नसला तरी त्याप्रमाणे बडबड करतो. प्रेमासारखा प्रसंग आला की, आपण वेडेपिसे होतो. पण याला त्यासाठी प्रेमच पाहिजे असे नाही.

कां निंबोळियेचे पिक | वरि गोड आत विख |
तैसे ते राजस देख | क्रिया फळ ||२६३||

राजस क्रिया सुरुवातीला गोड वाटते, पण शेवटी त्यातून दुःखच पदरी पडते. त्यासाठी अगदी साधे उदाहरण दिले. निंबोळीचे. वरून किती छान दिसते, पण खायला गेले तर विषाप्रमाणे कडू लागते.

इंधनाचेनि आकारे | अग्नि जैसा अवतरे |
कां आंगवे तरुवरे | भूमिरसु ||२८१||
नाना दहियांचेनि मिसे | परिणामे दूधचि जैसे |
का मूर्त होय उंसे | गोडी जेवी |

तैसे है स्वांत:करण | देहचि होती त्रिगुण |
म्हणौनि बंधासि कारण | घडे कीर ||२८३||

सत्त्व, रज, तम हे तीनही गुण सुक्ष्म देहाशी इतके एकरूप होतात की, त्याच्या बंधनाला कारणीभूत होतात. पहा, लाकूड जळतो त्यावेळी अग्नि कसा दिसतो? त्या लाकडाप्रमाणे किंवा पृथ्वी व जल यांच्या अंशानेच झाड स्थिर दिसते. दह्याच्या आकाराने जसे दूधच परिणाम पावलेले असते. ऊसाच्या रूपाने गोडीच आकाराला येते, त्याप्रमाणे गुण जीवनाशी तादात्म्य पावतात व त्याप्रमाणे क्रिया घडतात.

ययामाजी मी ऐसा | वनी कां वसंतु जैसा |
वनलक्ष्मीविलासा | असा हेतुभूत ||२९५||

वसंत ऋतू वनाचे वैभव त्याचे सौंदर्यविलास याला कारणीभूत आहे. पण त्या वसंतऋतूला या वनवैभवाचे काय वाटते? तो त्यापासून अलिप्तच. तसा मी गुणाचे जे विकार दिसतात त्यापासून अलिप्तच असतो.

किंबहुना पंडुसुता | ऐसी जी माझी सत्ता |
पावे जैसी सरिता | सिंधुत्व गा ||३०१||

देहातीत/गुणातीत मनुष्य मोक्ष पावतो, म्हणजे कसा तर नदी समुद्रात मिळाल्यावर सागराशी एकरूप होते, त्याप्रमाणे गुणातीत माणूस ब्रह्म जाणतो.

यया देवाचिया बोला । पार्थु अति सुखावला ।
मेघे संबोखिला । मोरू जैसा ।।३१९।।

गुणातीत व देहातीतचे वर्णन ऐकल्यावर अर्जुनाला अतिशय आनंद झाला. तो किती व कसा झाला, तर मेघांच्या पर्जन्यवर्षावाने मोराला जसा आनंद होतो तसा.

सायंप्रातर्मध्यान्हा । या तिन्ही काळांची गणना ।
नाही जेवी तपना । तैसा असे ।।३३२।।

अर्जुनाने प्रश्न विचारला की, गुणातीतांची लक्षणे काय? तर त्यासाठी माऊलींनी एक साधे उदाहरण दिले. दिवसातून सकाळ, दुपार व सायंकाळ होते. पण हा भेद आपल्याला वाटतो तो सूर्याला जाणवतो का? तर नाही.

ना प्रवर्तलेनि कर्मे । कर्मठत्व तयां का गमे ।
सांगे हिमवंतु हिमे । कापे कायी ।।३३४।।

गुणातीत व देहातीत मनुष्याला कर्म करीत असता मी कर्ता आहे हे वाटेल का? नाही. अहो, हिमालयाला बर्फाच्या भितीने कापरे भरेल काय?

का शरीराआंतील प्राणु | घरी आतिथ्याचा ब्राह्मणु |

नाना चोहटांचा स्थाणु उदासु जैसा ||३३९||

असा गुणातीत किती उदासीन असतो. बाहेरच्या प्रवृत्तीविषयी तर शरिरात प्राण आहे. तो शरिराच्या क्रियेबद्दल असतो. तसा आपल्या घरी आतिथी म्हणून ब्राह्मण आला तर त्याला आपल्या घराबद्दल आसक्ती असते का? नाही. घराच्या बाहेर चोहटा म्हणजे आताची गॅलरी म्हणा. तिला खांब असतो तो आपल्या घराबद्दल काही काळजी करतो का? नाही. तो उदासीनच असतो.

कां वाराची वाजे विझे | गगने निश्चल असिजे |

तैसा गुणाचिये गजबजे | डोलेना जो ||२४८||

वारा वाहतो. नंतर शांतही होतो. पण त्यामुळे आकाशात काही बदल होतो का? नाही. आकाश तर निश्चल असते, त्याप्रमाणे वेगवेगळ्या गुणांच्या क्रियेने या गुणातीतात माणसात काहीच बदल होत नाही.

म्हणौनि तयाच्या ठायी | शेणा सोनया विशेष नाही |

रत्ना गुंडेया काही | नेणिजे भेदु ||३५७||

पहा, किती साधे आहे? त्यांच्यासमोर शेण व सोने यांबद्दल फरक करत नाही. रत्न काय किंवा दगड यांत तो भेद करीत नाही.

ईश्वरू म्हणौनि पूजिला | का चोरू म्हणौनि गांजिला |

वृषगजी वोढिला | केला रावो ||३६२||

पहा, त्याला ईश्वर म्हणून वंदन केले काय किंवा चोर म्हणून त्रास दिला काय? त्याला हे दोन्ही सारखेच! त्याला तुम्ही हत्ती/घोडे दान दिले तरी त्या ऐश्वर्याला तो किंमत देत नाही. त्याला राजेपणाचा मान दिला तर त्याची त्याला काहीच किंमत वाटत नाही. मला यामध्ये संत तुकाराम महाराजांना छत्रपती शिवाजी महाराजांनी नजराणा पाठवला पण त्यांनी त्याचा स्वीकार केला नाही, हे उदाहरण आठवले.

का द्रवपणचि नीर | अवकाशचि अंबर |

गोडी तेचि साखर | आन नाही ।|३७४||

द्रव म्हणजे पाणी, अवकाश म्हणजेच अंबर, गोडी म्हणजेच साखर. या तीनही उदाहरणात भेदत्व नाही. तसे मी व जग यांत भेद नाही.

जैसा सैंधवाचा रवा | सिंधूमाजी पांडवा |

विरालेया विरवावा | हेही ठाके ||३९३||

मिठाचा खडा पाण्यात पडला, तर त्याला निराळे काही करून विरवावे लागत नाही. त्याप्रमाणे गुणातीत, देहातीत माणसांची वृत्ती असते. तो परमतत्त्वाशी पूर्णपणे समरस झालेला असतो.

पै मंडळ आणि चंद्रमा | दोनी नव्हती सुवर्मा |
तैसा मग आणि ब्रह्मा | भेदू नाही ||४०५||

अर्जुनाला भगवान सांगतात, मी व ब्रह्म यांत भेद नाही. त्यासाठी त्यांनी चंद्र चंद्रमंडळाची उपमा दिली आहे. ते दोन्ही वेगळे नाहीत एकच.

- - - - - - - - - - - - - - - - - - -

# अध्याय १५ वा

# पुरुषोत्तम योग

पंधराव्या अध्यायाची सुरुवात माऊलींनी गुरुस्तवनाने केली आहे. गुरुंचे स्तवन करताना माऊली नुसतेच भावनेने व्याकुळ झाले असे नाहीत तर साहित्य लेणी दैवत आहेत यासाठी काही उदाहरणे पाहा.

तेथे अहं का धूप जाळू | नाहं तेजे वोवाळू |
सामरस्ये पोटाळू | निरंतर ||७||

श्री गुरूचे स्तवन करताना वंदन करताना काय करूया तर अहंचा धूप जाळू या. त्यांच्यापुढे आपला अहंकार काय कामाचा आहे? एकदा अहं गेला तर तो भाव येतो तो नाहं म्हणजे मी स्वतः सोहं आहे. त्या बोधाने, त्या तेजाने त्यांना ओवाळू. ते व मी हा ऐक्यभाव निर्माण होऊन तेच “सामरस्य”. त्या भावाने म्हणजे अद्वैताने त्यांना पोटाळू म्हणजे आलिंगन देऊ ते पण सतत.

ब्रह्मा ब्रह्मचि विसवणेवरी | उन्मेख लाहे उजरी |
जे वाचेते इये करी | सुधासिंधू ||१०||

जो गुरुकृपेने ब्रह्मपदाला जाऊन विसावतो त्याच्या बुद्धीला ज्ञान प्रकाश पडतो. मग त्याच्या वाचेला माऊलींनी सुधा-सिंधूची म्हणजे अमृतरुपी सागराची उपमा दिली आहे.

तरी बहु बोलु काई | आजि ते आनी ढाई |
मानेवाचूनी नाही | ज्ञानदेवो म्हणे ||१८||
जे तान्हेने मिया अपत्ये | आणि माझे गुरु एकलौते |
म्हणौनि कृपेसी एकहाते | जाले तिये ||१९||

माऊली सदगुरुंच्या कृपाप्रसादाने न्हाऊन निघतात व अतिशय नम्रतेने म्हणतात, अजून काय सांगु, माझ्याइतकी कृपा इतरत्र आढळेल की नाही माहित नाही. नंतर तर खात्रीने म्हणतात, माझ्याशिवाय अन्यत्रही नाही. कारण माझ्या सदगुरु श्रीनिवृत्तीनाथांचे मी लाडके एकुलते एक अपत्य आहे. मग त्यांची एक हाती कृपा माझ्यावरच होणार ना! मी सर्व दाखले देतांना स्वतःच भाववश झालो, हे दिल्यावाचून पुढे जाऊच नये असे वाटते.

म्हणौनि रिकामे तोंड करू गेले गडबड |
की गीता ऐसे गोड | आतुडले ||२१||
होय अदृष्ट आपैते | ते वाळूची रत्ने परते |
उजू आयुष्य तै मारिते | लोभु करी ||२२||

आधणी घातलिया हरळ | होती अमृताचे तांदूळ |

जरी भुकेची राखे वेळ | क्षीर जगन्नाथु ||२३||

माझ्या सदगुरु कृपेने काय काय झाले? तर रिकामे तोंड म्हणजे शास्त्राचा आधार नसतानाही गीतेसारखे ब्रह्मज्ञान प्रकट झाले. दैव असे अनुकूल असले तर वाळूंची ही रत्ने होतात. एवढेच काय, अनुकूल कृपा असेल तर आयुष्य घ्यायला आलेला माणूस ही आपल्याला लोभ करतो, प्रेम लावतो. एवढेच काय, हरळ म्हणजे वाळू जरी आधणात टाकली तर अमृतासारखे तांदूळ तयार होतील इतके कृपेचे सामर्थ्य माऊली सांगतात.

ना कापतया पद्मदळ | वरीलिया बैसका नाही जळ |

का चित्त जैसे व्याकुळ | माणुसाचे ||११||

तैसेचि ययाची स्थिती | नासत जाय क्षणक्षणाप्रती |

म्हणौनि ययाते म्हणती | अश्वत्थु हा ||११४||

या संसाररूपी वृक्षाला अश्वत्थ का म्हणतात? यासाठी माऊलींनी काही उदाहरणे दिली. कमळाच्या पानावर पाणी थांबत नाही. जर ती पाणी हलत असतील तर व्याकुळ माणसाचे चित्त चंचल असते. तशीच या संसारवृक्षाची स्थिती आहे. प्रत्येक क्षणी संसाराची स्थिती बदलत असते. म्हणून याला अश्वत्थ म्हणतात.

रिगे मन्वंतर मनुपुढे | वंशावरी वंशांचे मांडे |
जैसी इक्षुवृद्धी कांडेन कांडे | जिके जेवी |

विश्वाची रहाटी कधीच संपत नाही. चार ही युगाचे एक मन्वंतर अशी एकामागून एक मन्वंतरे होतात. एका वंशापुढे दुसरा वंश हे चालूच राहते. पाऊस जसा पेरा, पेराने वाढतो, कांडे कांडे वाढत जाते, असा हा संसारवृक्ष सारखा वाढतच राहतो.

कायसा एके बुबुळे दोन्हीकडे | डोळाचाळिता अपाडे |
दोन्ही आथी ऐसा पडे | भ्रमु जेवी जगा ||१३५||
पै भिंगोरी निधिये पडली | ते गमे भूमीसी जैसी जडली |
ऐसा वेगतिशयो भुली | हेतु होय ||१३६||
हा संसारवृक्षु तैसा | मोडतु मांडतु सहसा ||१३६||
न देखोनी लोकु दिसा | अव्ययोमानी ||१३८||

माऊलींनी संसाराला आपल्याला भ्रम वाटतो. त्यासाठी कावळ्याचे उदाहरण दिले. कावळ्याला एकच डोळा, पण दोन्ही डोळ्यांच्या आकारात तो बुबुळ सारखे भिरवतो. मग आपल्याला त्याला दोन डोळे आहेत असे वाटते. नंतर मुलांच्या खेळातील भोवऱ्याचे उदाहरण दिले आहे. भोवरा खूप वेगाने फिरतो. तो एकाच

ठिकाणी उभा वाटतो. अगदी याचप्रमाणे हा संसारवृक्ष इतक्या वेगाने नाश पावतो व उत्पन्न होतो हे आपल्याला कळत नाही आपण त्याला अव्यय म्हणजे नित्य म्हणतो.

मृग जळीची गा तळी | तिथे दिठी दुरुनी न्याहाळी |
वाचूनी तेणे पाणिये साळी केळी | लाधीसी काई?
मूळ अज्ञानाचे तव लटिके | तयाचे कार्य हे केतुके |
म्हणौनि संसाररुखे सुतके | वायोचि गा ||२२३||

संसार वृक्ष हा ज्या मिथ्या अज्ञानावर उभा आहे तो खोटाच आहे. अहो, मृगजळ भासमान आहे. मग त्या भ्रमात आपण मृगजळाचे तलाव पाहिले तर त्यात काय साळी, केळी पिके घेता येतील का? तर नाही.

स्वप्नीही मानिले लटिके | तरी निर्वाहो का एकसारिखा |
तेवी आभासु हा क्षणिके | रिताची गा ||१३५||

हा संसाररुपी वृक्ष एक आभास आहे. तो नष्ट होणारा आहे. त्यासाठी स्वप्नातील जे पदार्थ पाहतो ते जसे खोटेच, त्यांना टिकाऊ पण येईल का? ते क्षणात नाहीसे होतात माऊलींनी खूप प्रकारे हा संसार भ्रमवंत आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

मग देहाहंतेचे दळे | सांडूनि ऐकेची वेळे |
प्रत्येक बुद्धी करतळे | हातवसनने ||२५८||

या अज्ञान वृक्षाचा छेद कसा करायचा? तर त्यासाठी देहात्मबुद्धि त्यागावी लागते व जी बुद्धि अंतर्मुख झालेली आहे तिला हातात / मुठीत घ्यावी. त्यानंतरची एक उपमा लगेच दिली ती आपण खाली पाहू.

निसळे विवेकसाहणे | जे ब्रह्माह्मकिबोधे सणाणे |
मग पुरतेनि उटणे | एकलेची ||२५९||

विवेकरुपी सहाण घ्यावी. तीवर जे शस्त्र पाजळायचे त्याला **मी ब्रह्म आहे** अशी धार लावायची व त्यावर अद्वैतबोधाचे पाणी सोडायचे, म्हणजे अज्ञानातून ज्ञानात प्रवेश आहे हा बोध झाला की, अज्ञान वृक्षाचा छेद होणारच.

हे पाहणे ऐसे असे तीरा | जैसा न बोडलिया विहिरा |
मग आपुलिया उगमी झरा | भरुनी ठाके ||२६९||

आपण आपले आत्मस्वरुप कसे पाहावे? यासाठी पहा माऊलींनी दाखल्याची काय कमाल केली आहे, अर्जुनाला उद्देशून म्हणतात की, विहिरीच्या खाली पाण्याचा उगम आहे. तिथे पाणी आहे ते न खोदता दिसले पाहिजे. त्यासाठी तो पाण्याचा झरा आहेच, ही जाणीव तरी असायला हवी.

निकवडया निष्ठुरा | उबगिजे जेवी सोयरा |
तैसे नागवती विकारा | वेटाळू जे ||२८६||

माऊली मोह / वासना संपलेल्या ज्ञानी पुरुषाचे वर्णन करतात. निकवडया म्हणजे ज्याच्याकडे पैसा नाही, निर्धन, निष्ठूर म्हणजे ज्याला दुसऱ्याबद्दल अजिबात दया नाही, अशा दोन्ही प्रकारच्या माणसाकडे सोयरा म्हणून पाहुणा म्हणून कोणी गेला, तर तो कंटाळून तिथून निघून जाईल. त्याचप्रमाणे विकार ज्ञानी माणसाकडे क्षणभरही टिकणार नाहीत. किती सहज प्रकारे माऊली सांगतात. पहा, पुढचा असाच एक दृष्टांत पहा.

आगी लागलिया रुखी | देखोनि सैरा पळती पक्षी |

तैसे सांडिले अशेखी | विकल्पी जे ||२५९||

विकल्प ज्ञानी माणसाला कसे सैरावैरा सोडून जातात? पहा, रूखी म्हणजे झाड. त्याला आग लागली व त्यावर पक्षी बसलेत तर ते कसे उडून जातील? तसेच मनात त्याच्या विकारच तयार होत नाहीत. अगदी असाच दाखला पुढच्या ओवीत पहा.

जैसा अग्नीचा डोंगरु | नेणे कोणी बीज अंकरू |

तैसा मनी जया विकारू | उदैजेना ||३०१||

आग लागलेली आहे तिथे बी टाकले तर त्याला अंकुर फुटणे शक्य नाही. तसेच ज्ञानी माणसाच्या मनात विकार उत्पन्न होणार नाहीत.

पुढती जे तेथे गेले | ते न घेतीच माघौती पाऊले |
महोदधी का मिनले | स्त्रोत जैसे ||३१७||

एकदा या पदाला म्हणजे मजस्वरूप ब्रह्मस्वरूपाला आल्यावर माघारी परतणे नाही. जसे ओढे, नाले, नद्या अशी अनेक स्त्रोते, प्रवाह एकदा समुद्रात मिळाले की, ते एकरूप होतात. त्यांना पूर्वीच्या स्वरूपात माघारी फिरता येईल का?

का मिनलेनि किडावे | वानिभेदासि ये डोळे |
तैसा स्वमाये वेटाळे | शुद्ध जै मी ||३४१||

पहा, जीव स्वस्वरूप ब्रह्मच आहे. त्यावर मायेचे आवरण आले की, त्याला शुद्धतेची ही जाणीव हरपते. सोन्याचं कसं १६ आणे १०० नंबरी असतो. पण त्या सोन्यात इतर अशुद्ध हिणकस धातूंचे मिश्रण झाले तर त्याचा कस कमी होतोच ना?

पै काश्मीराचा रवा | कुंकुमावरी पांडवा |
आणिका गमे लोहिता | तो तरी नव्हे ||३४९||

माणसाला माझे अस्तित्व खरे वाटत नाही. मी अकर्ता आहे. भोक्तापण नाही. खाली कुंकू ठेवलेय व त्यावर स्फटिकमणी ठेवला तर तो स्फटिक कसा दिसतो? तांबडा. लोहिता म्हणजे रक्ताचा रंग. पण

स्फटिकाचा रंग तांबडा असतो की नाही तो एक भास आहे. देहबुद्धि हा आत्मतत्त्वाला भास आहे.

पै रुखु डोलतु देखावा | तरी वारा वाजतु मानावा |
रुख नसे तेथे पांडवा | नाही तो गा ||३७६||

रुख म्हणजे झाड. ते ज्यावेळी हलते त्याचवेळी वारा वाहतो समजायचे का? जिथे झाडच नसेल तिथे वाराच नाही का? तसे आत्मा व देह वेगवेगळे आहे. आत्मा असंगत्वाने स्थित आहे. त्यासाठी माऊली लगेच अजून एक सुंदर दाखला देतात.

का आरसा समोर ठेविजे | आणि आपणपे तेथ देखिजे |
तरी तेधवांचि जाले मानिजे | काय आधी नाही? ||३७७||

किती साधे उदाहरण आहे. आरशासमोर आपण आपल्याला पाहतो, म्हणजे आपले रूप त्यावेळीच प्रकट झाले का? आधी आपण नव्हतो का? लोक या भ्रमामध्ये देहालाच आत्म्याचा धर्म लावतात. आपल्याला समजले की, नाही म्हणून माऊली अजून एक सुंदर दाखला देतात. पहा.

जैसे तारांगणी भरले | गगन समुद्री बिंबले | परी ते तुटोनि
नाही पडले | ऐसे निवडे ||३८४||

गगन गगनिचि आहे | ते अभासे ते वाये |

तैसा आत्मा देखती देहे | गंवसिलाही ||३८५||

आकाशात अनेक तारे असताना त्याचे प्रतिबिंब समुद्रात पडलेले दिसते. तारे काय वरून पडलेत काय? तर नाही. आकाश जिथे आहे, तिथेच आहे. प्रतिबिंब हा आभास आहे, अगदी त्याप्रमाणे देहस्थ आत्मा देहात सापडला तरी तो स्वरूपस्थित, वेगळाच आहे. आपल्याला कळेल असा एक दाखला अजून माऊली पुढे येतात.

का नाडरचि भरे शोणे | सूर्य तो जैसा तैसाचि असे |

देह होता जात तैसे | देखती माते ||३८७||

नाडर म्हणजे डबके. डबक्यात सूर्याचे प्रतिबिंब पडले तर नंतर डबके शोषून जाते. पाणीच नसल्यावर सूर्याचे प्रतिबिंब दिसत नाही, पण सूर्य जिथे आहे तिथे आहेच ना जे ज्ञानी आहेत त्यांना मी देहापासून वेगळा आहे, हे समजते.

जैसे एकचि आकाश ध्वनी | वाद्यविशेषी आनंदि

वाजावे पडें भिन्नी | नादांतरी ||४१६||

मी सर्वत्र व्याप्त आहे, पण ते तत्त्व एकच आहे. पहा, आकाशाचा ध्वनी एकच, पण वेगवेगळे वाद्य वाजवले तर वेगवेगळे ध्वनी ऐकायला येतात. मग काय आकाशाच्या ध्वनीत भिन्नता आहे का?

आता माझ्या स्वरूपाबद्दल ज्ञानी लोक सुख मानतात, तर अज्ञानी दुःखी पहा, यासाठी पुढचा दृष्टांत.

हे असो स्वातीचे उदक | शुक्ती मोती व्याळी विख |
तैसा सज्ञानासी मी सुख | दुःख तो अज्ञानासी ||४२०||

नक्षत्र आहे स्वाती. त्यावेळी पाऊस पडला तर काय होते? पहा, शिंपल्यात पडला तर मोती बनतात, पण हेच पाणी सापाच्या तोंडात पडले तर विष. पाणी तर एकच ना! त्याच न्यायाने मी ज्ञानी लोकांना सुखाला कारण होतो व अज्ञानी लोकांना दुःखाला कारण होतो.

मग आगी लागलिया कापुरा | ना काजळी ना वैश्वानरा |
उरणे नाही विरा | जयापरी ||४३९||
तेवी समूळ अविद्या खाये | ते ज्ञानही जै बुडोनि जाये |
तऱ्ही नाही वीर नोहे | आणि न साहे असणेही ||४४७||

अर्जुना, कापूर जळल्यावर काजळी पण राहत नाही व अग्नी पण उरत नाही, अगदी त्याप्रमाणे अविद्या म्हणजे अज्ञान नाहिसे झाल्यावर ज्ञानही उरत नाही. ते आहे, उरले आहे हे म्हणणे ही त्या ज्ञानाला सहन होत नाही. या अवस्थेचे वर्णन माऊलींनी कसे केले? मी आहे ही अवस्थाच रहात नाही ते शुद्ध ज्ञान.

तरी ताकाचे अंश फेडणे | याची नांव लोणी काढणे |
चोखाचिये शुद्धी तोडणे | कीडचि जेवी ||४६४||

पहा, अर्जुन देवाला आपले उपाधिरहित रूप कसे आहे, हे विचारतो आहे. त्यासाठी माऊलींनी ज्ञान विज्ञान व विज्ञान याचे स्पष्टीकरण केले. त्यासाठी हे दोन दाखले. पहा, दह्यातील ताक वेगळे करणे म्हणजेच लोणी. यात दोन क्रिया नाहीत. अशुद्ध सोने सिद्ध करायचे म्हणजे त्यातील हिणकस धातू जाळून दूर करायचा. अगदी त्याप्रमाणे अज्ञानाच्या उपाधीने ज्या चैतन्याचा, स्वरुपाचा बोध होतो ते मूळ स्वरूप म्हणजेच मी. आत्मतत्त्व, ब्रह्मतत्व!

यानंतरचा मला खूप आवडतो तो दृष्टांत मी सविस्तर लिहित आहे, पुढे देतो.

जैसे न सांगणेवरी | बाळा पतीसी रूप करी |
बोल निमालेपणे विवरी | अचर्याते ||४६८||
पै सांगणेया जोगे नव्हे | तेथिचे सांगणे ऐसे आहे |
म्हणौनि उपाधि लक्ष्मीनाहे बोलिजे आदी ||४६९||

एखादी गोष्ट सांगता येत नाही. आत्मतत्त्वाचे अस्तित्व कसे पटवून द्यायचे? अज्ञानाच्या उपाधीने ते पटवून देण्याचा भगवान प्रयत्न करीत आहेत. माऊलींनी तर एक बहारदार दृष्टांत दिलाय. पहा, एखाद्या मुलीचे लग्न ठरलेले असते तिला तुझा नवरा कोणता ग? अनेक नावे

घेऊन ती मान नकारार्थी डोलावते. पण योग्य नाव आले तर खाली मान घालून हळूच गालात हसते. मग “हेच ते” म्हणून आपण ओळखावे. अगदी असेच जे सांगण्याजेणेच येत नाही त्याचे इतर बाजूंचे वर्णन करून उपाधीची मदत घ्यावी लागते.

सर्वा कळी सांडिले जैसे | चंद्रपण उरे अंवसे |
रूप जाणावे तैसे | अक्षराचे ||५०९||
पै सर्वोपाधि विनाशे | हे जीवदया जेथ जैसे |
फळपाकात जैसे | झाड बीजी ||५१०||

क्षर व अक्षर याबद्दल वर्णन करताना अक्षर स्वरूप म्हणजे काय, यासाठी या दोन्ही उपाधीचे वर्णन केले आहे. चंद्राला वेगवेगळ्या कला आपण पाहतो. आकार बदलत जातो पण कलारहित असे चंद्राचे कलाशून्य मूळ स्वरूप जसे अमावस्येस असते, तसे अक्षर स्वरूप आहे. पिकलेल्या फळात एकच बी असते, म्हणजे वृक्षाचे ते सूक्ष्म रूपच होय. अगदी त्याप्रमाणे संसारवृक्षाच्या जागृतादि उपाधीचा नाश झाल्यावर जीवदशा ज्यात लीन होते, ती अवस्था अव्यक्त अक्षर पुरुषाची अवस्था आहे. अवघड विषय सोपा करून सांगितला आहे.

हे अज्ञान ज्ञानी बुडालिया | ज्ञाने किर्ति मुखत्व केलिया |
जैसा वन्हि काष्ठ जाळूनिया स्वये जाळे ||५२०||

अज्ञानाचा नाश झालाय. पण ते उरलेले ज्ञानही त्याला आता काय कार्यच उरले नाही म्हणून शांत झाले कसे? तर अग्नी लाकडाला जाळतो. लाकूड तर जळतेच पण अग्नी तर कुठे उरतो? अज्ञान व ज्ञानाची अवस्था नंतरही जे तत्त्व उरते ते परतत्त्व, त्यालाच उत्तम पुरुष म्हणतात तोच परमात्मा.

कां नाना अलंकारदशे | सोने न लपत लपाले असे |
विश्व नहोनिया तैसे | विश्व जो धरी ||५५२||

हा जो परमपुरुष आहे तो कसा आहे? पहा, सोन्याच्या अलंकाराकडे आपण पाहिले तर वेगवेगळे अलंकार दिसतात. पण सोने काय लपले का? नाही. ते त्या अलंकारात आहेच. अगदी त्याप्रमाणेच परमात्मा विश्व न होता पूर्ण विश्वाला आधारभूत आहे.

का हाती घेतलिया माळा | फिटे सर्पाभासाचा कांटाळा |
तैसा माझेनि बोधे टवाळा | नागवे तो ||५६१||

भगवान म्हणतात, माझ्या स्वरूपाचे ज्ञान झाल्यावर कोणी नंतर फसत नाही. त्याचा भ्रम दूर होतो. कसा? पहा, खाली दोर पडलाय. जो आपल्याला साप आहे असा भ्रम झाला, पण तो हातात घेतला तर सर्प असल्याचा भ्रम आपोआप नाहिसा झाला. देहात्मता संपली की, अज्ञान दूर होते व परमात्म तत्त्वाची जाणीव होते.

साडेपंधरा मिसळावे | तै साडे पंधरेचि होआवे |

तेवी मी जालिया संभवे | भक्ती माझी ||५६७||

शुद्ध सोने आहे. त्यात काय मिसळावे, तर सगळे शुद्ध सोनेच राहील? तर शुद्ध सोनेच. मग दोन्ही एकमेकात समरस होतील, एकरूप होतील. त्याप्रमाणे जो माझ्याशी तद्रूप झाला त्यालाच माझी भक्ती करणे शक्य आहे.

चोखटिवा आपुलिया | पुढिला उगाणा घेयावया |

जया दर्पणाचीचि परी धनंजया | केली आम्ही ||५८०||

अर्जुना, तू आता इतका निर्मळ, स्वच्छ झालास की, जणू आमचेच प्रतिबिंब झालास. स्वच्छ आरसा झाला तर प्रतिबिंब पण स्वच्छ दिसते, त्याप्रमाणे आपली अवस्था झाली आहे.

जेव्हा द्राक्षी दूध घातले | तेव्हा वाया गेले गमले |

परी फळपाकी दुणावले | देखिजे जेवी ||५९२||

तैसी श्रीहरीववचींची अक्षरे | संजयो सांगितली आदरे |

तिही अंधु तोही अवसरे | सुखिया जाल ||५९३||

पहा, श्रीहरीच्या मुखातील जे आले, ते मी राजा धृतराष्ट्राला सांगितले, तर तोही त्या उपदेशाने सुखी झाला. कसा? तर पहा, किती

साधे उदाहरण दिले, द्राक्षपिकाला दूध घातले जाते. हल्ली रासायनिक द्रव्ये घालतात. पण मग त्यावेळी काय म्हणाल? दूध वाया गेले? पण नंतर प्रत्यक्ष द्राक्ष गोड आली की, मग त्याचा उपयोग झाला असे वाटतेच ना? धृतराष्ट्राला याचा उपदेश कसा झाला? यासाठी माऊलींनी त्यावेळच्या प्रचलित शेतीवरचा दाखला देऊन आपल्याला चकित केले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - -

# अध्याय १६ वा

# दैवासुरसंपद्विभाग योग

या अध्यायाची सुरुवात माऊलींनी गुरुवंदनेनी केली आहे. त्यातले प्रत्येक दाखले त्यांच्या अतिउच्च प्रतिभेची गुरूप्रति असलेल्या आत्यंतिक प्रेमाची साक्ष देतात. काही मोजकी उदाहरणे पाहू या.

जेणे विवळतिये सवळे । लाहोनि आत्मज्ञानाचे डोळे ।
सांडिती देशहंतेची अविसाळे । जीवपक्षी ||३||

सदगुरुंच्या आत्मरूपी बोधाने काय होते? तर प्रभात काळी **जीवरूप पक्षांचे** आत्मज्ञानरूपी डोळे प्रकाशतात मग देहाची अहंता / अहंकार जो आहे तो अविसाळे म्हणजे घरटयात राहत नाही. निघून जातो ही माझ्या सदगुरुंची कृपा आहे.

जपाचेनि विवेक किरणसंगे । उन्मेखसूर्यकांतु फुणगे |
दीपले जाळिती दांगे । संसाराची ||८||

विवेक किरण म्हणजे ज्ञानाचा सूर्य व त्याची विवेक रूपी किरणे ती सुर्यकांत मण्यावर

पडतात. हा मणी कसा आहे? तो कृतीज्ञानरूप प्रधान आहे. मग वृत्तीचा नाश होतो. दांगे म्हणजे वन/आरण्य. त्यामुळे संसाररुपी हे जे आरण्य आहे, वन आहे ते पूर्ण जाळून टाकते. थोडक्यात सदगुरुंची कृपा प्रवृत्तिकडून निवृत्तीकडे नेते. संसारातून परमात्म्याकडे वळविते.

न दिसणे दिसणेनसी मावळवी । दोही दोही झांकिले ते सैंध पालवी |
काय बहू बोलो ते आघवी | उखाचि आनी ||१५||

ज्या स्वरूपज्ञानाच्या बोधाने चालतात ते ज्ञान अगदी यथार्थ प्रकट झाले तर काय होते? एक प्रकारची पहाट होते. त्या पहाटेचे किंवा त्या अवस्थेचे वर्णन काय करावे? ते अवर्णनीय आहे. जे प्रकटीकरण आहे ते माझ्या सदगुरुंची मजवर झालेली ज्ञानरूपी कृपाच आहे.

यानंतरच्या सर्वच ओव्या खुपच सुंदर आहेत.

माझिया सत्यवादाचे तप | वाचा केले बहुत कल्प |
तया फळाचे हे महाद्विप | पातली प्रभु ||३२||

मला हा गीतारूपी महासागर कसा मिळाला असेल? त्याचे कारण माऊली सांगतात. हे प्रभो, हे सदगुरु असे तर नाही ना की, माझ्या सत्यवादाचे तप जे मी अनंत कल्प केले. (चार युग = एक कल्प) व त्याचे हे फळ आहे.

पै निर्धना घरी वानिवसे | महालक्ष्मी येऊनी बैसे |
तया ते निर्धन असे म्हणो ये काई ||३६||
तैसा मी गीता वाखाणी | हे स्वपुष्पांची तुरंबणी |
परी समर्थे तुवा शिरयाणी | फेडिले ते ||३३||

पहा, माऊलींच्या नम्रता व सदगुरुंच्या सामर्थ्याबद्दलचा अतूट विश्वास. खरे म्हणजे गीतेवर भाष्य करावे म्हणजे आकाशरूपी फुलांचा सुगंध घेण्याची अशक्य गोष्ट, पण ती तुमच्या समर्थ कृपेने शक्य झाली व माझी इच्छा फलद्रूप झाली. ती कशी? तर समजा, निर्धन माणसाच्या घरात अचानक महालक्ष्मीने प्रवेश केला तर तो निर्धन राहील काय? साक्षात महालक्ष्मीच्या सहवासाने तो श्रीमंत होईलच ना! माऊलींचे सदगुरु प्रेम येथे ओतप्रोत भरून वाहत आहे.

पाणी बुडऊ ये मिठाते | तव मीठची पाणी आते |
तेवी आपण जालेनि अद्वैते | नाशे भय ||

अभयमध्ये भय कसे नाश पावते? तर अद्वैत अवस्थेत. त्यासाठी साधे मीठ व पाण्याचे उदाहरण दिले. पाणी जर मिठाला बुडवू लागले तर काय होईल? मीठच पाणी होईल. एकमेकात एकरूप होईल. तसे अद्वैतात भय कसले?

आता सत्वशुद्धी जे म्हणिजे | ते ऐशा चिन्ही जाणिजे |
तरी जळे ना विझे | राखोंडी जैसी ||७४||

भगवान दैवी संपत्तीची लक्षणे सांगतात. पहिले अभय नंतर सत्वशुद्धि. आता त्यासाठी राख झालेली आहे. ती जळत पण नाही व विझतही नाही. तशी सत्वशुद्धिची बुद्धी तिला आता संकल्प / विकल्प उरत नाही. आता दान म्हणजे काय, यासाठी काही उदाहरणे देतात.

आता देहवाचाचित्ते | यथा संपन्ने वित्ते |
वैरी जालियाही आर्तांते | न वंचणे जे का ||
पत्र पुष्प पुष्प छाया | फळ मूळ व धनंजया |
वाटेचा न चुके आलिया | वृक्षु जैसा ||८७||

दानासाठी ही दोन उदाहरणे दिलीत. जो शत्रूही आर्त भावाने दानासाठी आला तरी त्याला यथासंपत्ति दान देतो त्याला वंचित ठेवीत नाही किंवा झाड वाटसरू आला तरी त्याला आपल्या फळाला किंवा छायेला झाड कधी नाही म्हणत नाही. ही दानाची उदाहरणे माऊलींनी देऊन आपल्याला दानाचे महत्त्व पटवले आहे. नंतर यज्ञ हे फळासाठी कशा प्रकारे केले जातात, त्यासाठी काही उदाहरणे पाहूया.

आता चेंडूवे भूमी हाणिजे | नव्हे तो हाता हाणिजे |
की शेती बी विखुरिजे | परी पिकी लक्ष ||११||

किती साधे उदाहरण यज्ञाच्या फळासाठी दिले. पहा, चेंडू आपण आपटतो तर पुन्हा हातावर यावा म्हणूनच ना! शेतात बी का पेरतात?

त्याचा उद्देश पिक यावे हाच ना! तसे यज्ञ करण्यामागे फलप्राप्तीचाच उद्देश आहे.

आता बाळाच्या हिती स्तन्य | जैसे नानाभूती चैतन्य |
तैसे प्राणी मात्री सौजन्य | आर्जव ते |

आर्जव कशाला म्हणतात? तर प्राणीमात्रामधील सौजन्याला. त्यासाठी दोन साधी उदाहरणे दिली आहेत. आई बाळाला त्याच्या हितासाठी स्तनपान करते. ते आर्जवाचे स्वरूपच. प्राणीमात्रामधील चैतन्य तेही सौजन्य स्वरूप आर्जव आहे. आता सत्य कसे असावे? पहा,

परी आहिती कोपोनि सोप | लालनी मऊ जैसे पुष्प |
तिये मातेचे स्वरूप | जैसे का होय ||१२३||
तैसे श्रवण सुख चतुर | परिणामोनि सचार |
बोलणे जे अविकार ते सत्य येथे ||१२४||

आई बाळाचे हित ज्यात नाही अशापासून त्याचे रक्षण करत त्यासाठी प्रसंगी त्याच्यावर रागावण्याचे नाटक करते. कारण तिचे अंत:करण फुलाप्रमाणे मऊ असते. सत्यभाषण कसे तर ऐकतांना मधुर, चतुर पण परिणामी सत्य व कोणालाही न दुखावणारे असले पाहिजे.

नाना रंभेचेनिही रूपे | शुकी नुठेजेचि कंदर्पी |
का भस्मी वन्ही उद्दीपे | घृतेही जेवी ||१२७||

अक्रोधत्व ऐसे | नाव ते ये दशे |

जाण ऐसे श्रीनिवासे | म्हणिले तया ||१३०||

"अक्रोध" म्हणजे काय? शुक्राचार्य ऋषीला रंभेच्या लावण्यरूपाने सुद्धा विषयवासना निर्माण झाली नाही व ते क्रोधीत पण झाले नाही. भस्माला पुन्हा अग्नी प्रज्वलित करायला त्यात तूप टाकले तर ज्वाला येतील काय? नाही. या दोन्ही अवस्थेस "अक्रोधत्व" समजावून सांगितले आहे.

आता मृत्तिकात्यागे घटु | तंतुत्यागे पटु |

त्यजिजे जेवी वटु | बीजत्यागे ||१३१||

का त्यजुनी भिंतिमात्र त्यजिजे अवघेचि चित्र |

का निद्रा त्यागे विचित्र स्वप्नजाळे |

तेवी बुद्धिमंती देही | अहंता सांडुनि पाही |

सांडिजे अशेषही | संसारजात ||१३४||

जया नाव त्यागु ||१३५||

आता त्याग कशाला म्हणतात, यासाठी काही उदाहरणे देऊन समजावण्याचा माऊली प्रयत्न करतात. घटाने मातीचा त्याग केला तर काही शिल्लक राहील का? नाही. दुसरे वस्त्राने तंतूचा त्याग केला तर

वस्त्र राहील का? नाही. बीजाने वृक्षाचाच त्याग केला तर वृक्ष नाही व बी पण नाही. भिंतीवर चित्र काढले. त्या चित्राने भिंतीचाच त्याग केला तर चित्र राहील काय? नाही. आपल्याला एखादे भयंकर स्वप्न पडते. आपण त्या वेळी घाबरतो. पण तेवढयात जर झोपमोड होऊन आपण जागे झालो तर स्वप्नही नाही व भीती पण नाही. अगदी त्याचप्रमाणे विवेकी पुरुषाने देहामधील अहंता म्हणजे अहंकार याचा त्याग केला, तर पूर्ण संसारच त्यागला असे होते. देहबुद्धिमधील अहंकार गेला तर शुद्ध बुद्धिच राहील. हा त्याग करायला सांगितला आहे. यानंतर माऊलींनी अपैशून्य म्हणजे कोणाचेही उणेपण, कमीपणा न पाहणे व तरी मदत करणे. हा गुण सांगण्यासाठी अनेक उदाहरणे दिली. आपण त्यातील काही मोजकी पाहू या.

आता कदर्थवीत व्याधी | बळीकरणाचिया आधी |
आपपरु न शोधी | सद्वैद्यु जैसा ||१४१||

एखादा व्याधीग्रस्त माणूस बरा होण्याकरता आला तर जो चांगला वैद्य आहे तो त्यामध्ये भेदाभेद करीत नाही. आपपरभाव न बाळगता सर्वच व्याधीग्रस्तांचे तो उपचार करतो. हे उत्तम पुरुषाचे भूमूक्षाचे उदाहरण आहे. दुसरे एक उदाहरण पहा.

का चिखली रुतली गाये | धडभाकड न पाहे |

जो तियेचिया ग्लानी होये | कालाभुला ||१४२||

गाय चिखलात रुतली आहे व एखादा चांगला / सज्जन माणूस ती गाय काढतांना ती दुभती आहे का, भाकड आहे? म्हणजे दूध देत नाही, याचा विचार करत बसत नाही. त्याचे अंतःकरण कासावीस होते व गाईला बाहेर काढण्याचाच तो प्रयत्न करतो. तसे उत्तम पुरुष कधीच भेदाभेद करीत नाही.

का महावनी पापिये | उघडी केली विपाये |

ते नेसल्याविणे न पाहे | शिष्टु जैसा ||१४४||

एखादी स्त्री कोणीतरी पाप्याने, दुष्ट माणसाने उघडी नागडी केली व तसेच तिला वनात सोडले, तर सज्जन माणूस तिच्या अंगावर वस्त्र टाकल्याशिवाय पुढे जाणारच नाही. पूज्य गोंदवलेकर महाराजांच्या चरित्रात असा एक प्रसंग आला आहे. ज्याला त्यांनी रात्री रामनाम करण्यास सांगितले, तोच रात्री दुष्कर्म करून उघडया जागेवर स्त्रीसह झोपलेला त्यांनी सकाळी पाहिला. तो थंडीत कुडकुडू नये व त्या स्त्रीला उघडी पाहून महाराजांनी स्वतःचे वस्त्र दोघांच्याही अंगावर टाकले होते. सज्जन त्यांच्या कृतीतून मनात कोणाबद्दलही द्वेषभावना कधीच दाखवत नाहीत.

यानंतर दया म्हणजे काय, यासाठी माऊलींनी जी उदाहरणे दिली ती पाहू या!

आता दया ते ऐसी | पूर्णचंद्रिका जैसी |
निवविता न कडसी | सानेथोर ||१५४||

दया कशी असते? त्यासाठी पौर्णिमेच्या चंद्राचे चांदणेचा दाखला दिला. चंद्राचे चांदणे गारवा देत असता लहान थोर असा भेद मानत नाही. माऊलींनी यानंतर खूप छान उदाहरण दिले आहे.

पै जगी जीवनासारिखे | वस्तू अंगावरी उपखे |
परी जाते जीवित राखे तृणाचेही ||१५६||

पहा, पाण्याचे उदाहरण पहा. पाणी स्वतः नाश पावते. परंतु तृणाला म्हणजे गवतात शिरून गवताला जिवंत ठेवले जाते, हे त्याचे उदाहरण किती स्पष्टपणे समजावून सांगितले. पुन्हा पाण्याचे दुसरे उदाहरण पहा.

निम्न भरलियाविणे | पाणी ढळोचि नेणे |
तेवी श्रांत तोषौनि जाणे | सामोरे पा ||१५८||
पै पायी काटा नेहटे | तव व्यथा जीवी उमटे ||
तैसा पोळे संकटे | पुढलांचेनि ||१५९||

शेतात आपण पाणी देतो किंवा पावसाचे पाणी जमिनीवर पडते, त्यावेळी ते पाणी आधी खळगे / खोल भाग भरून नंतरच पुढे वाहते. दयावान पुरुष पीडिताचे दुःख निवारण केल्याशिवाय अन्य काहीही करणे त्याला सुचत नाही. पायात काटा असला तर आपल्या जीवाला व्यथा होते, अगदी त्याप्रमाणे दुसऱ्याचे दुःख पाहून तो दुःखी होतो.

नातरी बाळकोद्देशे | मातेचे स्नेह जैसे |
काय सांगो ऐसे जिणे | जे जगाचेनि जीवे प्राणे |
तया नाव म्हणे मार्दव मी ||१७४||

बालकासाठी मातेचे प्रेम कसे असते? तर स्नेहाने भरलेलेच. त्याप्रमाणे ज्याचे जगणेच जगाच्या कल्याणाकरिता असते ते मार्दव होय. यानंतर अचापल्य म्हणजे काय? यासाठी काही उदाहरणे देतात.

आता सूत्रतंतू तुटलिया | चेष्टाचि ठाके सायरखडिया |
तैसी प्राणजये कर्मेंद्रिया | खुंटे गती |
की मावळलिया दिनकरू | सरे किरणांचाप्रसरू |
तैसा मनोगये प्रकारू बुद्धीद्रियांचा ||१८४||
एवं मनपवननियमे | होती दाही इंद्रिये अक्षमे | ते अचापल्य वर्मे | येणे होय ||१०५||

आपण कळसूत्री बाहुल्यांचा खेळ पाहतो. त्याला मागे एक दोरी असते. ती दोरीच तुटली तर खेळ थांबतो. अगदी त्याप्रमाणे प्राणांवर व कर्मेंद्रियेवर जय मिळवला तर त्यांच्याकडून होणाऱ्या क्रिया आपोआप थांबतात. सूर्यास्त झाल्यावर किरणांचा जो पसारा दिसत होता, तो आपोआपच थांबतो. त्याप्रमाणे मन व प्राण यांचे नियमन केल्याने दशेंद्रियांच्या क्रिया असमर्थ होऊन थांबतात. यालाच अचापल्य म्हणतात. आता धृतिसाठी उदाहरण देतात.

आकाशी धूमाची रेखा | उठिली बहुवा आगळिका |
ते गिळी येकी झुळुका | वारा जेवी ||१९४||
तैसे अधिभूतादि दैवा | अध्यात्मादि उपद्रवा |
पातलिया पांडवा | गिळूनि घाली ||१९५||
ऐसे चित्तक्षोभाच्या अवसरी | उचलूनी धैर्या जें चांगावे करी |
धृती म्हणिवे अवधारी | तियेते गा ||१९६||

आकाशात धुरांच्या रेषा असल्यावर एका वाऱ्याची झुळूक आली तर त्या आपोआप नाहीशा होतात. त्याप्रमाणे आपल्याला आधिभौतिक / आध्यात्मिक / आधिदैविक पिडा झाली तर जो तो सगळे सहन करतो, म्हणजेच चित्ताचा क्षोभ झाला असता तो त्यांच्या अंगभूत धैर्याने विचलित होत नाही, यालाच धृती म्हणतात.

यानंतर शौच म्हणजे काय? यासाठी एक साधा दाखला दिला आहे.

आता निर्वाळूनि कनके भरिला गांगेपीयुखे |
तया कलशाचियासारिखे शौच |असे |

शुद्धतेचे स्वरूप कसे असते? तर कलश पात्र एकदम स्वच्छ करून त्यात गंगाजल भरावे. आत बाहेर-शुचित्व असे असावे. यानंतर अद्रोहत्वासाठी सोपी उदाहरणे दिली आहेत .

का फेडित पाप ताप | पोखीत तीरींचे पादप |
समुद्रा जाय आप || १९९|| गंगेचे जैसे |

गंगा समुद्राला मिळायला जाताना त्यात कोणी स्नान करीत असेल तर स्नान करणाऱ्याचे पापताप- तर नाहिसे होतेच; पण काठावर असलेल्या वृक्षांचे पण सहजगत्या पोषण करते.

किंबहुना दिवसराती पुढिलांचे सुख उन्नति |
आणित आणित स्वार्थी ||२०१|| प्रवेशिजे |
वांचूनि आपुलेनि काजालागी || प्राणीजातांच्या अहितभागी |
संकल्पाचीही आडवंगी || २०३ || न करणे जे |
पै अद्रोहत्व ऐशिया गोष्टी |

ऐकसी जिया किरीटी | ते सांगितले हे दिठी |

पाहो ये तैसे ||२०४||

स्वतः स्वार्थामध्ये मग्न असताना देखील नेहमी सभोवतालच्या जीवांचा उन्नतीचा विचार व चित्तात असाच विचार सतत चालू असतो.

दुसऱ्याच्या अहिताचा विचारही ज्याच्या मनात येत नाही त्यालाच "अद्रोहत्व" म्हणतात .अमानित्वासाठी माऊलींनी शंकराचे व गंगेचे उदाहरण दिले आहे.

आणि गंगा शंभूच्या माथा |पावोनि संकोचे जेवी पार्था |

तेवी मान्यपणे सर्वथा ||२०५|| लाजणे जे |

ते हे पुढत पुढती  अमानित्व |जाण||२०६|| सुमती

शंकराने गंगेला स्वतःच्या जटेत धारण केल्यावर तिचा वेगाचा गर्व नाहीसा झाला व ती जशी लज्जित झाली त्याप्रमाणे लोकांच्या मानसन्मानाने जो लज्जित होतो त्यालाच **अमानित्व** म्हणतात.

दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, निष्ठुरता व अज्ञान या असूर संपत्तीचे उदाहरण घेऊन वर्णन पाहू या.

कारण जे जीविता  तरी | ते वानिले जरी सेविता |

अन्नचि पंडुसुता ||२२१|| होय विष |

म्हणौनि वाचेना चौबारा | घातलिया धर्माचा पसारा |

धर्मुची तो अधर्मु होय विरा ||२२७|| तो दंभु जाणे |

अन्न हे जीवाचे रक्षण करते; परंतु त्याचा अतिरेक झाला तर तेच विषाप्रमाणे मारक ठरते म्हणून आपण करत असलेल्या धर्म-आचरणाची वाच्यता करत बसलो तर धर्मच जो चांगला आहे तोच अन्नाच्या अतिरेकाप्रमाणे अधर्म होतो, अशा वागण्याला 'दंभ' म्हणतात.

तैसा माजे स्त्रिया धने | विद्या स्तुती बहुतेमाने |

एका दिवसीचेनि परान्ने ||२२७|| अल्पकु जैसा |

अभ्रछायेचिया जोडी मृगांबु देखोनि फोडी | निदैवु घर मोडी |
|

पाणियाडे मूर्ख उतणे जे संपत्त | किंबहुना ऐसैसे |ि मिसे |

तो दर्पु गा अनारिसे ||२२९|| न बोले घेई |

आपली स्त्री धन, विद्या, स्तुती व मिळणारा मान सन्मान यांनी जो उन्मत्त होतो? कसा? तर एखाद्या दरिद्री माणसाला परान्न मिळाले तर तो त्या अन्नाने सुद्धा मातततो. एखादा दुर्भागी माणूस स्वतःचे घर असूनसुद्धा जर ढगाच्या छायेवर विश्वास ठेवून घर मोडायला निघाला तर तो दर्प होय म्हणजेच संपत्तीचा **मद** म्हणजेच दर्प होय.

पतंगा नावडे ज्योती | खद्योता भानूची खंती |

टिटिभेने अपांपती वै |री केला ||२३४||

तैसा अभिमानाचेनि मोहे ||२३५|| ईश्वराचेही नाम न साहे |

पतंग हा किडा ज्योतीचा )दिव्याचा( द्वेष करतो. त्याला ज्योति आवडत नाही .खद्योता म्हणजे काजवा. त्याला सूर्याची खंत वाटते. टिटवीने समुद्रालाच वैरी करावे त्याप्रमाणे अभिमानाच्या भलत्या मोहाने त्याला ईश्वराचे नामसुद्धा सहन होत नाही.

क्रोधासाठी माऊलींनी अनेक साधी साधी उदाहरणे दिली आहेत.

आणि पुढिलांचे सुख देखणियांचे होय मिख |

चढे क्रोधाग्नीचे विख || मनोवृत्ती |

शितळाचिये भेटी | तातला तेली आगी उठी |

चंद्र देखोनि जळे पोटी २|| कोल्हा जैसा |३८||

तैसा विद्या विनोद विभवे | देखे पुढिलांची दैवे |

तंव तंव रोषु दुणावे ||२४२|| क्रोधु तो जाण |

दुसऱ्याचे सुख पाहून त्याला प्रचंड विरोध उत्पन्न होतो. कसा? तर उकळत्या तेलात पाणी टाकल्यावर जसा भडका उडतो तसा किंवा

चंद्राला पाहून म्हणजे चंद्राचा प्रकाश पाहून कोल्ह्याला तो आवडत नाही. त्याचा तो तिरस्कार करतो. अगदी याचप्रमाणे दुसऱ्याची विद्या, विनोद बुद्धी किंवा ऐश्वर्य-वैभव पाहून जो मनात रोष उत्पन्न होतो त्यालाच **क्रोध** म्हणतात. यानंतर **अज्ञान** समजवण्यासाठी अनेक उदाहरणे दिली आहेत त्यातील २-३ उदाहरणांनी अज्ञान कसे ते पाहू या .

तरी शितोष्णस्पर्शा | निवाडू नेणे पाषाणु जैसा |
का रात्री आणि दिवसा | जात्यंधु तो |
नातरी ते नानारसी | रीधोनि दर्वी जैसी |
परी रसस्वादासी चाखो नेणे ||२४८||
तैसे पापपुण्याचे खिचटे | करोति खाता बुद्धिचेष्टे |
कडु मधुर न वाटे | ऐसी जे दशा |
तिये नाम अज्ञान ||२५२||

दगडाला शितोष्णाचा स्पर्श सारखाच फरक कळत नाही. जो जन्मत:च आंधळा आहे त्याला रात्र व दिवस यातील फरक कसा समजेल?दर्वी म्हणजे स्वयपाकात वापरतो ती पळी .सगळ्या स्वयपाकातील रसात मिसळते. पण त्या रसाची भिन्नता तिला कळते का? नाही. अगदी या उदाहरणाप्रमाणे पाप-पुण्य, बरे-वाईट याचे

आकलन करण्याची क्षमताच नसलेली बुद्धी म्हणजेच 'अज्ञान' होय. असा माणूस सारासार विचार करत नाही.

हे सगळे ६ दोष असुरी संपत्तित आहेत.

माऊलींनी आसुरी संपत्तीबद्दल खूप परखड मत मांडले आहे. विरोधाभासातून त्यांनी काही उदाहरणे दिली आहेत.

काळिमा सांडील कोळसा | वरी चोखी होईल वायसा |
राक्षसही मांसा | विटो शके |
परी आसुरी प्राणिया ||२८६|| शौच नाही धनंजया |

माऊली या उदाहरणात खूपच सुंदर दाखला देता. कोळसा एक वेळ आपला काळेपणा सोडीन, वायसा म्हणजे कावळा. तो सुद्धा एक वेळ पांढरा होईल, मांस खाण्याच्या राक्षसाला पण वीट येईल, पण आसुरी वृत्तीच्या मनुष्यात शुद्धता येणे अशक्य आहे. अजून याबद्दल काय वर्णन करावे? असे माऊली म्हणतात. नंतर त्यांनी एक समर्पक उदाहरण दिले आहे.

उधवणीचे जेवी तोंड | उभळी धुवाचे उभड |
हे जाणिजे तेवी उघड ||२९४|| सांगो ते बोल |

पूर्वी धूर बाहेर जायला उंच धुराडे होते. त्याला उधवणी म्हणत. आता फॅक्टरीत चिमणी असते .ज्यातून धूर बाहेर पडतो. धुराडयातून धूरच बाहेर पडणार .आसुराची गोष्ट अशीच आहे. त्यांच्या वर्तनाकडून काहीही चांगली अपेक्षा करणे चुकीचे आहे.

विरूढालिया अशुभ | फुटती तै ते कोंभ |

पापाचे कीर्तिस्तंभ ||३२०|| चालते ते |

विरूढालिया म्हणजे पेरणी. जर चांगले बी पेरले नाही तर येणारे कोंभ/अंकुर तसेच उगवणार. तसेच आसुरी स्वभावाचे व संपत्तीचे उन्मत्त लोक. हे लोक म्हणजे पापांचा प्रसार करणारे स्तंभच आहेत.

आमिष कवळु थोरी आशा | न विचारिता गिळी मासा |

तैसे कीजे विषयाशा ||३३७|| तयांसी गा |

मासा पकडला गेल्यावर आपण त्याच्या गळाला खायचे चिकटवतो. मासा ते खायला जातो व ते गिळण्याचे निमित्त होते, त्याला वर काढले जाते, त्यातच त्याचा नाश. विषयांमुळे होणारा नाश आसुरी स्वभावांच्या लोकांचा कसा होतो ,याकरिता अतिशय संयुक्तिक उदाहरणाची योजना केली आहे.

ज्वराचेनि आटोपे | रोगी भलतैसे जाये |

चावळती संकल्पे | जाण ते तैसे |

अंगात ताप चढल्यावर रोगी अतिशय असंबद्ध बडबड करतो. आसुरी वृत्तीचे संकल्प हे अशा व्यर्थ बडबडण्यासारखे असतात.

आटीचा लोहाचे खांब जैसे | का उधवले आकाशे |

शिळाराशी ||३७९||

लोखंड तप्त करून आटवून त्याचे खांब केले तर ते ताठ राहतात म्हणजे वाकत नाहीत किंवा शिळाराशी म्हणजे खडकजन्य पर्वत. जे उंचच उंच असतात. या दोन्ही उदाहरणातून ताठपणा सुचवायचा. आसूरी लोक नम्र असत नाही. ते स्वभावाने ताठ असतात. यानंतरचे उदाहरण हल्लीसुद्धा लागू पडेल असे आहे.

तैसे यागाचेनि नावे | जग वाऊनि हावे |

नागविती आघवे ||३८७|| आहेरावारी |

नावाला यज्ञयाग करायचा जगाला फसवायचे व त्याच्याकडून आहेर उकळायचा. यज्ञाला यायचे निमंत्रण देऊन त्यांची फसवणूक करायची.

परी काम क्रोधलोभ या तिहींचेची थोंब|

थांवे तेथे अशुभ ||४२६|| पिकले जाण |

काम, क्रोध, लोभ ह्यांच्या एकत्रीकरणाला माऊलींनी एका वृक्षाची उपमा दिली आहे. असा वृक्ष जिथे बहरतो, वाढतो त्या वृक्षाला अशुभच फळे येणार हे ठरलेले आहे. काम, क्रोध, लोभ या तिघांचा त्याग माऊलींना सहजरित्या सुचवायचा आहे.

पतीचिया मता | अनुसरोनी पतिव्रता |

अनायासे आत्महिता | भेटेचि ते |

पतिव्रता स्त्री फक्त पतीच्या मनाप्रमाणे वागते व आत्महित साधते, त्याप्रमाणे शास्त्रानुसार वागावे, असे यातून माऊलींना सुचवावयाचे आहे.

शास्त्र म्हणेल जे सांडावे | ते राज्यही तृण मानावे |

जे घेववी ते न म्हणावे ||४६०|| विषही विरू |

सोळाव्या अध्यायाचा समारोप करताना माऊलींनी शास्त्राप्रमाणे आचरण करण्याचा उपदेश केला आहे. शास्त्र जे अस्वीकारते, मग ते राज्य असले तरी त्याचा त्याग करावा, त्याला तृणासमान मानावे व शास्त्राने ज्याचा अंगीकार करायला सांगितले ते विषाप्रमाणे असले तरी अहितकारी मानू नये.

- - - - - - - - - - - - - -

# अध्याय १७ वा

# श्रद्धादिनिरुपण योग

या अध्यायाची सुरुवात माऊली गुरुस्तवनाने करतात.

तरी नुरोनि वेगळेपण रसी भजिन्नले लवण |
तैसे नमन माझे जाण | बहु काय बोलो |
आता रिता कुंभ समुद्री रिगे | तो उचंबळत भरोनि निगे |
का दशी दीपसंगे | दिपुचि होय ||१९||
तैसा तुझिया प्रणिती | मी पूर्णु जाहलो श्रीनिवृत्ती ||

पाण्यात मीठ टाकले की ते वेगळे राहत नाही, पाण्याशी एकरूप होते; त्याप्रमाणे तुम्हाला नमस्कार करणे म्हणजे तुझ्या स्वरूपाचा वेगळेपणा न उरणे होय. यापेक्षा मी काय बोलणार? रिकामा घट समुद्रात बुडवायला तर तो भरून येतो किंवा सुताची वात दिव्याच्या संगतीने स्वतःच दिवा होते, अगदी या उदाहरणाप्रमाणेच मी सदगुरु श्रीनिवृत्तीनाथांना नमस्कार केला तर माझे अपूर्णत्व शिल्लक राहत नाही, मी पूर्णरूप होऊन जातो.

भगवान अर्जुनाच्या प्रश्नाला उत्तर देताना स्वभावजन्य श्रद्धेप्रमाणे देहधारी माणसाची कृती घडते. याकरिता अनेक उदाहरणे देतात.

गंगोदक जरी जाले | तरी मद्यभांडा आले |
ते घेऊ नये काही केले | विचारी पां |
चंदनु होय शीतळू | परी अग्नीसी पावे मेळू |
तै हाती धरिता जाळू | न शके काई ||५९||
तैसे श्रद्धेचे दळवाडे | आंगे कीर चोखडे |
परी प्राणियांच्या पडे विभागी जे ||५५||

माणसाच्या श्रद्धेप्रमाणे त्रिगुणात्मक श्रद्धा स्वभावाप्रमाणे त्या प्रभावाप्रमाणे कार्य करते, हे समजावून सांगण्यासाठी माऊलींनी पहिले गंगेच्या पाण्याच्या उदाहरण दिले आहे. गंगेचे पाणी शुद्ध आहे पण तेच जर दारूच्या भांडयात ओतले, तर ते प्यावे का? तर नाही. चंदन शितल आहे. पण चंदनाचा व अग्नीचा संयोग झाला तर ते जळणारच. मग ते हातात धरता येईल का? त्याप्रमाणे श्रद्धा स्वभावत:च चांगली असली तरी जीवाच्या स्वभावाप्रमाणे ती काम करते. श्रद्धा कशी असते व स्वभावावर कसा परिणाम करते, याचा एक सहज समजण्यासारखा दाखला माऊली पुढे देत आहे.

जैसे जीवनाचि उदक | परी विषी होय मारक |
का मिरयामाजी तीख | उंशी गोड ||

पाणी हे जीवन आहे पण त्यात पाण्याचे विषात रूपांतर झाले तर ते जीवाला मारक ठरते. मिरीत उतरले तर तिखट बनते व उसात गोड बनते. अशाच प्रकारे श्रद्धापण राजस, सात्विक व तामस रूप धारण करते. सात्विक श्रद्धेच्या लोकांचा उपयोग इतरांना कसा होतो, यासाठी माऊलींनी छान परिचित उदाहरण दिले. पहा,

पै एक दिपु लावी सायासे | आणिक तेथे लाऊं बैसे |
तरी तो काय प्रकाशे | वंचिजे गा ||८८||
येका गौतमासीचि गंगा | येरा समस्ता काय जगा |
वोहोळ जाली?||९१||
म्हणौनि आपुलियापरी | शास्त्र अनुष्ठिती कुसरी |
जाणे तयाते श्रद्धाळू जो वरी | तो मूर्खही तरे ||९२||

एखाद्याने सामान आणून दिवा लावला व तिथे दुसरा कोणी येऊन बसला तर तो दिवा त्याला प्रकाश देणार नाही का? गौतमाने खूप प्रयत्न करून गंगा पृथ्वीवर आणली मग इतरांना गंगा उपभोग घेऊन देणार नाही का? म्हणून स्वतःसाठी जरी श्रद्धापूर्वक शास्त्राचे अनुष्ठान केले व त्याचे अनुकरण दुसऱ्याने केले तर तोही तरून जाईलच ना!

आहाराप्रमाणेच शरीरात धातु निर्माण होतात, यासाठी अगदी साधे उदाहरण ज्ञानेश्वर महाराज देतात.

जैसे भांडियाचेनि तापे | आंतुले उदकही तापे |

तैसी धातुवशे ओटोपे | चित्तवृत्ती ||११७||

भांडे तापले की पाणी आपोआप तापते. त्याप्रमाणे अन्नापासून जे धातू उत्पन्न होतात त्यातूनच चित्तवृत्ती बनतात. यानंतर आहाराचे प्रकार प्रथम विशद करतात. प्रथम सात्विक आहाराचे वर्णन केले आहे.

आंगे साने परिणामे थोरू | जैसे गुरुमुखीचे अक्षरू |

तैशी अल्पी जिही अपारू | तृप्ती राहे ||१२९||

गुरुंचा उपदेश अतिशय थोडया शब्दात असतो. पण त्याचा अर्थ गहन व व्यापक असतो, तसा सात्विक आहार आकाराने लहान पण परिणामाच्या दृष्टीने गोड व थोडेसे सेवन केले तर तृप्ती टिकून राहते.

आकारे नव्हती डगळे | स्पर्शे अति मवाळे |

जिभेलागी स्नेहाळे | स्वादे जिये |

सात्विक आहार अन्न आकाराने व वजनाने पण हलके असते. स्पर्शाला अतिशय मऊ, जिभेला स्निग्धयुक्त रुचीचे असतात. यानंतर राजस आहाराचे वर्णन केले आहे.

जैसे खारट अपाडे | राजसा तया आवडे |

उन्हाचेनि मिळे तोंडे | आगिची गिळी ||१४१||

अत्यंत खारट पदार्थ व राजस प्रवृत्तीच्या माणसाला आवडतात. अतिशय उष्ण आहार त्यांना आवडतो. जणू त्या आहारातून अग्निच गिळतो. राजस आहार दुःखाला कारणीभूत होतो, तामस आहार थोडक्यात पाहू.

निपजले अन्न तैसे | दुपाहरी का येरे दिवसे |

अतिकरे तै तामसे | घेईजे ते ||१५५||

का बहुवे दिवशी वोलांडिले | स्वादपणे सांडिले |

शुष्क अथवा सडले | गाभिणेही हो ||१५९||

सकाळचे दुपारी म्हणजे शिळे अन्न तामसी वृत्तीच्या लोकांना आवडते. खूप दिवसाचे शिळेसुद्धा चालते. चवहीन, निरस-सडलेले एवढेच काय त्यात किडे झालेले असतील तरी त्याला ते अन्न आवडते. यानंतर सात्विक यज्ञाचे खूप विस्तृत वर्णन केले आहे. त्यातील काही भाग आपण पाहू.

पातलेया झाडाचे मूळ | मागुते सरो नेणोचि जळ |

जिराले का केवळ | तयाच्याचि आंगी ||१७४||

तैसे मने देही | यजननिश्चयाच्या ठायी |
हारपोनि जे काही | वांछितिना ||१७५||
किंबहुना फळाशेवीण | ऐसेया निगुती निर्माण |
होय तो यागु जाण | सात्त्विकु गा ||१८४||

पाणी एकदा झाडांच्या मूळात गेले की, मागे येत नाही. ते झाडात जिरून जाते. त्याप्रमाणे मनाने देहाने यज्ञ करण्याचा निश्चय केला जातो. त्यात कोणत्याही इच्छा किंवा फळाची अपेक्षा नसते. फळाची अपेक्षा नसली तरी अतिशय दक्षतापूर्वक यज्ञ केला जातो. त्याला सात्विक यज्ञ म्हणतात.

ऐसी केवळ फळलागी महत्त्व | फोकारावया जगी |
पार्था निष्पाजि जे यागी | राजस पै ते ||१८८||

फलाची अपेक्षा ठेवून व लोकांमध्ये प्रसिद्धी मिळावी म्हणून जो यज्ञ केला जातो तो राजस यज्ञ होय.

नाही विधीची तेथे चाड | नये मंत्रादिक तयाकुड |
अन्नजाता न सुये तोंड | मासिये जेवी ||१९२||
तैसे वायांसि सर्वस्व वेचे | मुख न देखता |
श्रद्धेचे | नागविले निपुत्रिकांचे जैसे घर ||१९४||

ज्या यज्ञात विधीबद्दल जराही चाड नाही म्हणून विधीहीन. त्यात मंत्राचा उच्चारही नाही. त्या यज्ञमंडपात माशीच्या तोंडाला पण अन्न जाणार नाही असा प्रकार. खूप पैसा खर्च केला जातो, पण त्या यज्ञात श्रद्धाच नसते. निपुत्रकाचे घर दुसऱ्याने बळकावून वस्ती करावी तसा हा यज्ञाचा प्रकार आहे.

भूतमात्राचेनि नांवे | तृणही नासुडावे |
किंबहुना सांडावे | छेद भेद ||२१२||
ऐसेसी जै शरीरी | राहाटीची पडे उजरी |
तै शारीर तप घुमरी | आले जाण ||२१३||

तृण म्हणजे गवत. त्यातही जीव आहे असे मानून तेसुद्धा उपटू नये, ही भावना. इतर वस्तूला छेद किंवा भेद होईल हेही टाळावे, असे वागण्याचे शरीराला वळण पडते. हेच शारीरिक तप समजावे.

तरी लोहाचे आंग तुक | न तोडिताची कनक |
केले जैसे देख | परिस तेणे | ||२१६||
तैसे न दुखविता सेजे | जावळिया सुख निपजे |
ऐसे साधुत्व का देखिजे बोलणा जिये ||२१७||
पाणी मुदल साडा जाये | तृण ते प्रसंगेचि जिये |
तैसे एका बोलिले होये | सर्वांही हित ||२१८||

परिस लोखंडाचे सोने स्पर्शाने करते. पण त्यात आकार पण बदलत नाही की वजनपण. साधुत्वाचे बोलणे कसे असते? दुसऱ्याला न दुखविता उलट त्याला सुख होईल, अशी भाषण मधुरता. पाणी झाडांना दिले जाते, पण त्यावर गवत सहज उगवते. एकापाशी जरी बोललो तरी ते इतरांनाही हितकारक असते हेच वाचिक तप होय.

जैसी नाना विकल्पजाळे | सांडूनि गेलिया सकळे |
मन राहे का केवळे | स्वरूपे जे ||२२७||
मन मनपणाही धरू नेणे | शिवतले जैसे लवणे |
आपुले निज || २३३|| परी ते असो हे जाण |
मानस तपाचे लक्षण |

मनाची स्वरूप स्थिती कशी होते तर नाना प्रकारच्या विकल्पाने ते रिकामे होते. विकल्प राहतच नाहीत. मीठ जसे पाण्यात विरघळते व मिठपणाला विसरते तसे विकल्परहित मन मनपणाला विसरते. मनाच्या या स्थितीला मानस तप म्हणतात.

जै पुरतिया सत्वशुद्धी | आचारिजे आस्तिकबुद्धि |
तै तयातेचि गा प्रबुद्धी | सात्विक म्हणिपे ||२४१||

श्रद्धायुक्त अंतःकरणाने व शुद्ध मनाने जे तप आचरले जाते ते सात्विक तप होय.

लोकांचिया विविधा पूजा | आश्रयो न धरावया दुजा |
भोग भोगावे वोजा | महत्त्वाचिया ||२४५||
अंग बोल माखूनि तपे |
विकावया आपणपे अंगहीन पडते | जियापरी |
हे असो धनमानी असा वाढवुनि तप किजे सायास |

लोकांनी आपलीच पूजा करावी, स्तुती करावी, इतरांचा आश्रय धरू नये, सर्व भोगाची इच्छा व फळ आपल्यालाच मिळावे अशी असते. द्रव्य व मान्यतेसाठी प्रयत्नाने जे तप केले जाते ते राजस तप होय.

आंगभरे सुटला धोंडा | आपण फुटोनि होय खंडखंडा |
का आड जालिया ते रगडा | करी जैसा ||२६०||
तेवी आपलिया आटणिया | सुखे असतया प्राणिया |
जिणावया शिरणिया | कीजती गा ||२६१||
किंबहुना हे वोखटी | घेऊनि क्लेशाची हातवटी |
तप निफजे ते किरीटी | तामस होय ||२६२||

डोंगराचा कडा असतो त्यातील एखादा मोठा दगड (धोंडा) खाली पडतो. त्यावेळी स्वतःचे तर तुकडे होतातच, पण पडताना मध्ये येणाऱ्या वस्तूचा पण चुरा करतो. त्याप्रमाणे तापसी तप करणारे स्वतःचा

नाश ओढवून तर घेतातच पण सुखी प्राणी यांनापण खाली खेचतात. किंबहुना, तशी उत्कट इच्छा तरी बाळगतात. याप्रमाणे जे क्लेश उत्पन्न करतात त्याला तामस तप म्हणतात.

यानंतर दानाचे तीन प्रकार अतिशय साध्या पद्धतीने सांगितले आहेत.

> आणि दान जया द्यावे | तयाते ऐसेया पाहावे |
> जया घेतले नुमचवे | कायसेनही ||२७८||
> साद घातलिया आकाशा | नेदी प्रतिशब्दु जैसा |
> का पाहिला आरसा | येरीकडे ||
> नातरी उदकाचिने भूमिके |
> आफळिलेनि कंदुके | उधळौनि कवतिके |
> न येईजे हाता ||२८०||
> ऐसिया जे सामग्रिया | दान निफजे वीरराया |
> ते सात्विक दानवर्या | सर्वाही जाण ||२५३||

आपण ज्याला दान देतो त्याला दानाची परतफेड करण्याची संधीच मिळू नये, कसे? पहा, आकाशाकडे पाहून हाक मारली तर प्रतिशब्द येतो का? नाही. आरशाच्या पाठीमागे उभे राहिले तर दिसेल का? नाही. आपण पाण्यावर चेंडू (कंदुके) आदळला तर हातात परत

येईल का? अशा पद्धतीने सत्पात्री जे दान केले जाते त्यात अपेक्षाच नाही ते सात्विक दान होय.

राजस दानाची जी उदाहरणे दिली ती आजही रोजच्या व्यवहारातील आहेत, म्हणून मुद्दाम सर्वच देतो म्हणजे समजणे व त्याचा अर्थही कळेल व असे आपल्या हातून घडू नये अशी बुद्धी होईल. पहा,

परी मनी धरुनि दुभते | चारिजे जेवी गाईते |
का पेंव करुनि आइते | पेरू जाईजे ||२८५||
नाना दिठी घालून आहेरा | अवंतुं जाइजे सोयिरा |
का वाण धाडिजे घरा | वोवसीयाचे ||२८६||
मग पुढिलांचे काज कीजे | पूजा घेऊनि रसु दीजे ||
पीडितांसी ||२८७||
काय बहु सांगो सुमती | जे दीजे या मनोवृत्ती |
ते दान गा त्रिजगती | राजस पै ||२९३||

गाईला चारा का देतो? तर तिने दूध द्यावे म्हणूनच ना! किती स्वार्थबुद्धी आपली? पेव म्हणजे धान्याचे कोठार. ते आधी तयार करायचे मग पेरणीला सुरुवात करायची म्हणजे नंतर येणाऱ्या धान्याची अपेक्षा आधीच. लग्नात पाहुण्यांना सोय-याना आमंत्रण देतो का? आहेराची अपेक्षा धरूनच. आजकाल पत्रिकेत लिहितात की, आहेर स्वीकारले जाणार नाही, हे खूप अपवादात्मक. पण आहेर काय काय

मिळाला याची चर्चा आपण करतोच ना! माऊलींच्या अशा दाखल्यांची मला खूपच मजा वाटते. समाजाचे हे बारीक निरीक्षण आहे किंवा त्यांच्या प्रतिभेची उत्तुंग परिसीमा आहे. अजूनही वाण देण्याची प्रथा घरोघरी आहे. परत येईल अशी अपेक्षा ठेवूनच वाण दिले जाते. अहो घरी आज-काल वाढदिवस साजरा करतो. Return Gift काय आहे? माऊलींच्या भाषेत या बदल्यात काही तरी मिळेलच, ही अपेक्षाच ना!

मोबदला घेऊन काम करणे, पूजा म्हणजे पैसे, रस म्हणजे औषध. पैसे घेऊन औषध देणे आजकाल राजकारणी आरोग्य शिबिरे घेतात. फुकट आहेत का? दिसते फुकट पण त्यांचा हेतू मतदानात मदत व्हावी हाच असतो. हे निराळे सांगायला नको. थोडक्यात अशी मनोवृत्ती ठेवून जे दान दिले जाते ते राजस दान होय.

मी मुद्दाम सविस्तरपणे ओव्या घेतल्यात कारण त्या आजपण व्यवहारात आहेत.

पै बोळविजे रिणाइतु | तैसा झकवी तयाचा हातु |
तू करणे याचा बहुतु | प्रयोग तेथ ||३०५||
आणि जया जे दे किरीटी | तयाते उमाणी तयासाठी |
मग कुबोले का लोटी | अवज्ञेच्या ||३०६||
हे बहु असो यापरी | मोल वेचणे जे अवधारी |
तया नाव चराचरी | तामस दान ||३०७||

कर्जदार घरी आला तर त्याला थोडेफार देऊन बोळवण करतो. आपण ते करताना अरे-तुरे करतो म्हणजे अपमान. ज्यावेळी थोडेफार देतो, त्यात कुबोले म्हणजे अपमानास्पद शब्द. दुसऱ्याचा अपमान करून दिलेले दान काय उपयोगाचे? अयोग्य काळी व अपात्री अपमान करून दिले जाते ते तामस दान होय.

एव ॐ तत्सदाकारू | ब्रह्मनाम हे त्रिप्रकारू |

हे फुल तुरुंबी सुंदरू | उपनिषदांचे ||३४३||

ॐ तत्सत या आकाराचे हे तीन प्रकाराचे ब्रह्मनाम. याला माऊलींनी उपनिषदांचे सुंदर फुल म्हटले आहे, याचा तू सुगंध घे.अगा अन्न आणि भूक | पासी असे परी देख |

जेऊ नेणता बाळक | लंघनयि की ||३५०||

कां स्नेहसूत्र वैश्वानरा | जालियाही संसारा |

हातवटी नेणता वीरा | प्रकाशु नोहे ||

मंत्राच्या उपयोगाची हातोटी माहीत व्हावी, याकरिता माऊलींनी ही उदाहरणे दिली आहेत. पहिले दिले लहान मुलाचे. पोटात भूक आहे, जवळ अन्न आहे. पण ते कसे जेवावे, हे माहीत नसलेल्या बालकाला उपवास घडतो. तेल, वात व अग्नी आहे. पण त्याची पद्धत माहीत नसेल तर दिवा कसा लावणार? मग प्रकाश कसा मिळावा?

तैसे वेळ कृत्य पावे | तेथिचा मंत्रही आठवे |

परी व्यर्थ ते आघवे | विनियोगेवीण ||३५२||

योग्य कृतीसाठी मंत्रच आठवून उपयोग नाही. तो कसा म्हणायचा आहे हे जर माहित नसेल तर हे सगळे व्यर्थच होय!

आंधारी अभंगु दिवा | आडवी समर्थु बोळावा |

तैसा प्रणवो जाणावा | कर्मारंभी ||३५९||

अंधारात दिव्याचा व आरण्यात समर्थ शक्तिशाली सोबतीचा आधार असतो, त्याप्रमाणे कर्मारंभी प्रणवाचा म्हणजे ओंकाराचा रक्षक म्हणून उपयोग होतो.

स्थळी नावा जिया दाटिजे |

जळी तियांची जेवी तरिजे |

तेवी बंधकी कर्मी सुटिजे | नामे येणे ||३६६||

जमिनीवर नाव (होडी) ठेवली तर ती जड वाटते. तीच पाण्यात गेली की, हलकी होऊन तरून पुढे जाते, त्याप्रमाणे कर्मे बंधनकारक असली तरी नामाने तरली जातात म्हणजे बंधनकारक ठरत नाहीत. **ओंकार** नामाचे महत्त्व साधे उदाहरण देऊन समजावले आहे.

दिव्यौषध जैसे रोगिया | का सावावो ये भंगालिया |

सच्छब्दु कर्मा व्यंगलिया | तैसा जाण || ३९३ ||

सत शब्द कर्माचा उद्धार करतो यासाठी माऊली हे उदाहरण देतात. एकाच रोग्याला दिव्यौषध मिळावे किंवा एखादा पराभूत होत असतांना मदत मिळावी तसे व्यंग पावलेल्या कर्माला सत शब्दाचा व सत्कर्माचा चांगला उपयोग होतो.

उदायिला आकाशी । रवीचि रवीते प्रकाशी ।

हे नामव्यक्ती तैसी | ब्रह्मचि करी ॥ ४०४ ॥

आकाशात सूर्यप्रकाश पडला म्हणजे सुर्योदय झाला हे कळते अगदी त्याप्रमाणे नाम व परब्रह्म हे स्वप्रकाशत्वानेच समजते.

परी परीसाचा वरकली | नाही चोंखाकिडाची बोली |

तैसी ब्रह्मी अर्पिता केली | ब्रह्मचि होती || ४०७ ||

परिसाचा लोखंडाला स्पर्श झाल्यावर त्याचे सोन्यात रूपांतर होते. मग त्या सोन्याला कस लावण्याची आवश्यकता पडत नाही. अगदी या न्यायानेच जी कर्मे ब्रह्मार्पण करतो ती आपोआपच ब्रह्मस्वरूप होतात.

अश्रद्धेने केलेल्या हवनाचे, दानाचे किंवा तपाचे काहीही फळ मिळत नाही. यासाठी काही दाखले माऊली देतात. त्यातील एक पाहू या.

घाणा गाळिले गुंडे | तेथ तेल ना पेंडी जोडे ।

तैसे दरिद्र तेवढे | ठेलेचि आंगी || ४१९ ||

गुंडे म्हणजे दगड-गोटे. ते घाण्यात घातले तर तेल व पेंड मिळेल का? नाही. त्याप्रमाणे व्यर्थ द्रव्य खर्च होते व दारिद्रय येते; जर आपण श्रद्धापूर्वक दान, हवन व तप केले नाही तर.

या संपूर्ण संवादाचा परिणाम अर्जुन स्वतःला हरवून बसण्यात झाला. अतिशय सूचक व समर्पक रितीने माऊली ते समजावतात,

तेथ निजानंदा बहुवसा | माजी अर्जुन तो सहसा |

हरपला चंद्रु जैसा | चांदिणेनी || ४२४ ||

पौर्णिमेला चांदणे पडते. त्या चांदण्याच्या प्रकाशात चंद्र जसा स्वतःला हरपून बसतो त्याप्रमाणे अर्जुनाला जो आत्मानंद झालाय त्यात तो स्वतःलाच हरपून बसलाय.

- - - - - - - - - - - - - - - - - - - -

# अध्याय १८ वा

# सर्वगीतार्थसंग्रह योग

भावार्थ दिपिकेचा हा कलशाध्याय आहे. त्याची सुरुवात माऊली गुरुस्तवनाने करतात. आपले सदगुरु श्री निवृत्तीनाथ यांच्याबद्दल स्तुती करताना माऊलींच्या काव्यप्रतिभेला झळाळी लाभली आहे. त्याचा आनंद आपण ही घेऊ या.

जयजय देव प्रबळ | विदळीतामंगळ कुळ |
निगमागमद रुमफळ | फलप्रद || २ ||
जयजय देव सकल | विगत विषय वत्सल |
कलितकाळ कौतुहल | कलातीत || ३ ||
जयजय देव निश्चल | चलितचित्तपान तुंदिल |
जगदुन्मीलना-विरल | केलिप्रिय || ४ ||

आपले सदगुरु प्रबळ म्हणजे सामर्थ्यवान आहेत. सर्व अमंगळ, अशुभ गोष्टींचा नाश करणारे आहेत. निगमागमदरुम म्हणजे वेदशास्त्राचे वृक्ष त्याला फळाची प्राप्ती करून देणारे. तुमचा जयजयकार असो.

सकल म्हणजे परिपूर्ण. तुम्हाला विषयांचा मागमूसही नाही. कालचक्राच्या फेऱ्यात तुम्ही अजिबात सापडलेले नाहीत. तुम्ही कालातीत आहात. नेहमी स्थिर आहात. (निश्चल). चलित चित्रपान तुंदिल ह्या एकाच शब्दाने माऊलींनी सुचविले की, साधकांच्या चंचल चित्ताने त्याचा स्वत: अंगीकार करून ते स्वतः जणू प्राशन करून तुम्ही मस्त झालात. जगतातील अनेक क्रिडा सहज करणाऱ्या तुम्हाला मी नमस्कार करतो. जयजयकार करतो.

माझी वाणी तुमची स्तुती करायला अनावर झाली आहे हे सांगताना माऊलींनी सहजपणे दाखले दिले आहेत.

हे काय एकैक ऐसैसे | नानापरिभाषावशे |
स्तोत्रे करू तुजोद्देशे | निर्विशेषा || ११ ||
जिही विशेषणी विशेषिजे | ते दृश्य नव्हे रुप तुझे |
हे जाणे मी म्हणौनि लाजे | वानणा इही || १२ ||
परी मर्यादेचा सागरू | हा तवंचि तया डगरु |
जव न देखे सुधाकरू | उदया आला ||
सोमकांतु निजनिर्झरी | चंद्रा अर्घ्यादिक न करी |
ते तोचि अवधारी | करवी की जी ||

नेणो कैसी वसंतसंगे | अवचितिया वृक्षांची अंगे |

फुटती तै हे तयाही जोगे | धरणे नोहे ||१५||

अहो सदगुरु वेगवेगळ्या विशेषणांनी तुमची स्तुती मी किती करावी? तुम्ही तर निर्विशेष आहात. म्हणजे विशेषणांच्याही पलिकडे आहात. मी ज्या विशेषणांनी तुमची स्तुती करतो ते तुमचे मूळस्वरुप किंवा खरे रूप नाही, हे समजते. त्यामुळे संकोचही वाटतो. चंद्रोदय झाला नाही व समुद्र मर्यादा ओलांडित नाही तोपर्यंतच त्याला प्रसिद्धी मिळते. सोमकांत मणी चंद्राला स्वतःच्या उदकाने अर्घ्य देतो म्हणतात. मला वाटते की, चंद्रच त्याला तसे करायला भाग पाडतो. वसंत ऋतू सुरू झाला की, वृक्षाला आपोआप कशी पालवी फुटते, हे समजत नाही त्याप्रमाणे तुमची स्तुती करताना माझी वाणी मला स्वस्थ बसू देत नाही. तिला उन्मेष प्राप्त झाला आहे.

तेथ म्हणितले श्रीनिवृत्ती | नको हे पुढतपुढती ।

परिसी लोहा घृष्टी किती । वेळवेळा कीजे गा? || २८ ||

माऊलींची ही स्तुती ऐकून त्यांचे सदगुरू श्री निवृत्तीनाथ जे म्हणाले, ते पहा, "तुम्ही पुन्हा पुन्हा असे का म्हणता? लोखंडाचे सोने होण्यासाठी ते परिसावर सारखे घासावे लागते का? नाही ना? म्हणजे थोडया स्तुतीतच सर्व विशेषणांचा समावेश येतो हे सुचवावयाचे आहे.

जी गीतारत्नप्रासादाचा | कळसु अर्थचिंतामणीचा ।
सर्व गीतादर्शनाचा । पाढाऊ जो |
लोकी तरी आथी ऐसे | जे दुरूनि कळसु दिसे |
आणी भेटीचि हातवसे | देवतेची तिये || ३१ ||
तैसेचि एथही आहे | जे एकेचि येणे अध्याये |
आघवाचि दृष्ट होये | गितागमु हा || ३२ ||

अठराव्या अध्यायाचे महत्व माऊली विशद करताना म्हणतात, गीतारूपी "रत्नमंदिर" आहे व हा अध्याय चिंतामणीचा अर्थरूप कळसच आहे. पाढाऊ म्हणजे बोध देणारा वाटाडयाप्रमाणे दिशा दाखविणारा. या अध्यायातून तुम्हाला मार्ग सापडेल बोध होईल. लोकांची अशी श्रद्धा असते की दुरून देवळाचा कळस दिसल्यावर देवळातील देवतेचे दर्शन घेतल्याचे श्रेय मिळते. या अध्यायाचा अभ्यास/चिंतन केले की, संपूर्ण गीतादर्शनाचा लाभ मिळेल.

पहा, माऊलींना गीतेबद्दल नितांत आदर आहे. तुम्ही गीतेचे श्रवण करा की पठण. मोक्षाचा लाभ सारखाच. त्यासाठी माऊलींनी श्रीमंतांकडच्या घरच्या भोजनाचे उदाहरण दिले. म्हणजे तिथे पक्वान्नाची रेलचेल आहे. काही कमी पडत नाही म्हणजे तुम्ही तळातील घरात जेवायला बसा नाहीतर वरच्या मजल्यावर बसा. एकच

जेवण. म्हणजे गीता तुम्ही ऐका किंवा वाचा. लाभात फरक नाही. पुढची ओवी मी मुद्दाम देतो. प्रेमाची जात कशी असते? माऊली म्हणजे मूर्तिमंत प्रेमभाव. त्यासाठी गाय-वासरूचे उदाहरण दिले.

वत्स धालयाही वरी | धेनू न वचावी दूरी ।
अनन्य प्रीतीची परी | ऐसी आहे |
तेणे काजेविणेही बोलावे | ते देखिले तरी पाहावे |
भोगिता चाड दुणावे | पढीयंतयासाठी || ७९ ||
ऐसी प्रेमाची हे जाती | आणि पार्थ तव तेचि मूर्ती |
म्हणौनि करू लाहे खंती | उगेपणाची || ८० ||

वासराचे दूध पिऊन पोट भरलेले असते. तरीही त्याला वाटते मातेने म्हणजे गाईने दूर जाऊ नये. अनन्य प्रितीचे उत्तम लक्षण हेच आहे. आपण एखाद्यावर अतिशय प्रेम करीत असतो त्यावेळी त्याने आपणाशी काहीही काम नसले तरी बोलावे असे वाटते. हा जो ऐकण्याचा भोग आहे तो दुणावा म्हणजे द्विगुणीत व्हावा. खऱ्या प्रेमाची हीच तर ओळख आहे. पार्थ तर प्रेमाचे मूर्तिमंत रूप. देव आपल्या प्रश्नाचे उत्तर द्यायचे सोडून शांत का बसले म्हणून त्याला खंत वाटते आहे. यानंतर अर्जुनाने त्याच्याच प्रश्नात नित्य नैमित्तिक कर्म व काम्यकर्म यातील भेद स्पष्ट करताना छान उदाहरणे दिलीत, पाहू या.

तरी आपैसी दांगे डोंगर | झाडे डाळती अपार |
तैसे लांबे राजागर | नुठीती ते || ९४ ||
न पेरिता सैंध तृणे | उठती तैसे साळीचे होणे |
नाही गां राबाउणे | जियापरी || ९५ ||
कां अंग जाहले सहजे | परी लेणे उद्यमे कीजे |
नदी आपैसी आपादिजे | विहिरी जेवी || ९६ ||
तैसे नित्य नैमित्तिक | कर्म होय स्वाभाविक |
परी न कामिता कामिक | न निफजे जे ||१९७||

ह्या ओव्या मुद्दाम घेतल्या आहेत. नेहमीची कर्मे व काम्यरूप | इच्छारूप कर्मे म्हणजे काय ह्याचे माऊलींनी केलेले स्पष्टीकरण समजावे. अरण्यात (दांगे) किंवा डोंगरावर झाडे आपोआप (डाळती) येतात. परंतु राजागर म्हणजे बाग यातील झाडे लावावी लागतात. भाताचे पीक (लांबे) घ्यावे लागते. गवत आपोआप उगवते. परंतु भाताचे पीक राब करून पेरावे लागते. पहा, माऊलींनी शेतीतील उदाहरण देऊन समजावले आहे. अंग म्हणजे शरीर. त्याची वाढ होते परंतु लेणे म्हणजे अलंकार त्यांना घडवावे लागते. नदीचा प्रवाह आपोआप वाहतो. परंतु विहीर खोदावी लागते तरच पाणी येईल या सगळ्या उदाहरणाचा एकच अर्थ आहे. नित्य नैमित्तिक कर्म

स्वभावत:च घडतात पण काम्य कर्म आपल्या इच्छा उत्पन्न झाल्या तरच घडतात आणि या काम्यकर्मांचे फळ भोगावेच लागते. त्यासाठी माऊलींनी कशाचे उदाहरण दिले. पहा,

देहाचिया गांवा आलिया | जन्ममृत्युचिया सोहळिया |
ना म्हणो नये धनंजया | जियापरी |
का ललाटीचे लिहिले | न मोडे गा काही केले |
काळे गोरेपण धुतले | फिटो नेणे || १०२ ||
केले काम्य कर्म तैसे | फळ भोगावया धरणे बैसे |
न फेडिता ऋण जैसे | वोसंडिना || १०३ ||

एकदा जीव देहात आला तर त्याला जन्ममृत्यूचा सोहळा हा पहावाच लागतो. त्याला नाही म्हणण्याची सोय नाही. आपल्या नशिबी जे आहे त्या कपाळावरच्या रेषा पुसल्या जात नाहीत. शरीराचा गोरेपणा/काळेपण कितीही धुतले तरी जाणे अशक्य. त्याप्रमाणे इच्छेने जे काम्यकर्म केले जाते ते त्याचा फळभोग द्यायला टपलेले असते. कसे? तर आपण ऋण म्हणजे कर्ज घेतले तर ते फेडावेच लागते. म्हणून इच्छा त्याला अनुसरून कर्म हे करतांना विवेक बाळगावा. हे यातून आपण शिकावे. आपल्या इच्छेला संयम ठेवावा. काम्यकर्म मुमुक्षेने

आचरू नये याकरिता माऊली तुम्हाला आम्हाला समजेल असा दाखला देतात, ते पुढे पाहू या.

गूळ नेणता तोंडी | घातला देचि गोडी | आगी मानूनी राखौडी |
चेपिला पोळी | काम्यकर्मी हे एक | सामर्थ्य आथी स्वाभाविक |
म्हणौनि नको कौतुक | मुमुक्षु एथ || १०६ ||

गुळाची चव कशी आहे हे समजा आपल्याला माहित नाही पण तोंडात घातला तर गोड लागणारच. राखोंडी समजून विस्तवावर पाय ठेवला तर पोळणारच. तसेच इच्छारूप कर्माचे फळ हे ठरलेले असते ते त्या कर्माच्या स्वभावानुसार मिळतेच. पण मुमुक्षेने अशा इच्छारूप काम्यकर्माच्या कौतुक म्हणूनही आचरण करू नये.

मग सस्य फळपाकात | तैसे निमालिया कर्मजात |
आत्मज्ञान गिवसित | अपैसे ये || १२९||

धान्य पिकले म्हणजे वाळते त्याप्रमाणे कर्माच्या फल त्यागाने जे निर्जीव बनतात मग फलदायी राहत नाही अशी वृत्ती असणाऱ्या साधकाला आत्मज्ञान आपण होऊन शोधत येते. त्यागाचा स्वीकार किंवा अस्वीकार कसा करावा याकरिता पुढचे उदाहरण पहा,

जे औषध व्याधी अनोळख | ते घातलिया परते विख |

का अन्न न मानिता भूक | न मारी काय? ||
म्हणौनि त्याज्य जे नोहे | तेथ त्यागाते न सुवावे |
त्याज्यालागी नोहावे | लोभापर || १३३ ||

आपल्याला काय व्याधी म्हणजे आजार आहे याची चिकित्सा न करताच औषध घेतले तर ते विषासारखे मारक ठरू शकते. आपल्याला भूक लागली त्यावेळी अन्न सेवन केले नाही तर भूक मरून जाते हे आपल्या सगळ्यांना माहित आहे. म्हणून त्याग करण्यास जे योग्य नाही त्याचा त्याग करू नये व जे त्याग करण्यास योग्य आहे अशाची इच्छा करू नये.

कर्माचा त्याग करू नये यासाठीची उदाहरणे माऊली देतात.

मनशुद्धीच्या मार्गी | जै विजयी व्हावी वेगी |
तै कर्म सबळालागी | आळसु न किजे |
भांगार आथी शोधावे | तरी आगी जेवी नुबगावे |
का दर्पणालागी सांचावे | अधिक रज || १४० ||
नाना वस्त्रे चोख होवावी | ऐसे आथी जरी जीवी |
तरी संवदणी न मनावी | मलिन जैसी || १४१ ||
तैसी कर्मे क्लेशकारे | म्हणौनि न न्यावी अव्हेरे |
का अन्नलाभे अरुवारे | रांधतिये उणे || १४२ ||

ज्यांना मन-चित्त शुद्धी करण्याची इच्छा आहे त्यांनी त्यासाठी लागणारी कर्मे आचरणात आणायला आळस करून काय उपयोग? सोन्याला शुद्ध करायचे तर अग्नीला कंटाळून चालेल काय? आरसा स्वच्छ करायचा तर रज म्हणजे पांढरी भुकटी/पावडर तिला साचवावेच लागेल. तुमची वस्त्रे स्वच्छ करायचीत तर संवदणी म्हणजे परटाकडे जे धुण्याचे साधन त्याला घाण म्हणून कसे चालेल? म्हणून कर्म त्रास देणारी आहेत म्हणून त्याग करून कशी चालतील? यानंतर माऊलींनी एक सोपे उदाहरण दिले आहे. सुग्रास भोजन पाहिजे तर स्वयंपाक करण्याचा त्रास होणारच. थोडक्यात त्रास होणार म्हणून कर्मे टाळून कसे चालेल? नंतर माऊलींनी त्यागाचे प्रकार सांगितले आहेत. यज्ञ, दान व तप ही कर्मे त्याज्य नाहीत यासाठीचे दाखले पाहू या.

जिये यज्ञदानतपादिके | इये कर्मे जिये आवश्यके |
तियें न सांडावी पांथिके | पाऊली जैसी ||
हारपले न देखिजे | तव तयाचा मागु न सांडिजे |
का तृप्त न होता न लोटिजे | भाणे जेवी || १५० ||
नाव थडी न पवतां | न खांडिजे केळी न फळता |
का ठेविले न दिसता | दीपु जैसा || १५१ ||

यज्ञदान व तप ही आवश्यक कर्मे आहेत ती सोडून कसे चालेल? वाटसरू चाललाय तर वाट सोडून चालला तर काय उपयोग? वस्तु हरवली तर तिचा शोध लागेपर्यंत तो शोध चालू ठेवावा. भोजनाचे ताट (भाणे) तृप्ती होईपर्यंत दूर लोटावे का? नाही. आपल्याला दुसऱ्या किनाऱ्यावर जायचे तर नाव मध्येच सोडून देऊन कसे चालेल? केळी न पिकताच तोडली तर चालणार नाही. दिवा घेऊन अंधारात आपण वस्तु शोधतोय तर वस्तु सापडल्याशिवाय दिवा विझवून कसे चालेल? ही सगळी उदाहरणे मुद्दाम विस्तृत दिली. कारण कर्माचा त्याग आपण करू नये. आत्मज्ञानाची इच्छा बाळगता पण यज्ञ-दान-तप आचरायला नको त्याबद्दल उदासीनता बाळगू नये.

कर्माचरण विधीपूर्वक करावे. मग त्याने रजोगुण व तमोगुणाचा नाश होऊ शकतो. पहा, पुढचे उदाहरण.

अधिके जंव जंव औषधी | सेवनेचि मांडी बांधी |
तंव तंव मुकिजे | व्याधी | तयाचिये ||
तैसी कर्मे हातोपाती | जै किजती यथानिगुती |
तै रजतमे झडती | झाडा देऊनी || १५६ ||

एखादा आजारी असेल व औषध द्यायला तत्पर असेल तर त्याची व्याधी लवकर बरी होते. त्याप्रमाणे कर्म करतांना विधीपूर्वक केले तर रज व तम गुणांचा नाश करते.

कर्मफळात इच्छा नसावी.

सांडूनि दुधाची टकळी | गोवारी गावधेनू वेटाळी |
किंबहुना कर्मफळी | तैसे कीजे || १७४ ||

गोवारी म्हणजे गाई सांभाळणारा-गुराखी. टकळी म्हणजे आशा. गुराखी म्हणजे दुधाची आशा न बाळगता गावातल्या गाई सांभाळतो. त्याप्रमाणे कर्म करतांना कर्मफळाची इच्छा धरू नये. विहित कर्माचा त्याग करू नये. त्या त्यागास तामस त्याग म्हणतात.

नातरी आंधाराचेनि रोखे | जैसी डोळा रोविजती नखे |
तैसा कर्मद्वेषे अशेखे | कर्मेचि सांडी || १७८ ||
तयाचे जे कर्मे सांडणे | ते तामस पै मी म्हणे |
शिसाराचे रागे लाटणे | शिरची जैसे || १७९ ||

अंधाराला दिसत नाही. त्याचा राग डोळ्यात नखे घालून काय उपयोग? त्याप्रमाणे कर्माचा त्याग करणे म्हणजे त्याग हा तामस झाला. शिसारा म्हणजे अर्धशिशी. डोळे दुखते म्हणून डोकेच तोडावे का?

राजस त्याग म्हणजे काय? ह्याकरिता परिचित उदाहरणे दिली आहेत.

ऐसा शरीराचिया क्लेशा | भेणे कर्मे विरेशा |
सांडी तो परियेसा | राजसु त्यागु || १९२ ||
एरव्ही तेथही कर्म सांडे | परी तया त्यागफळ न जोडे |
जैसे उतले आगी पडे | ते नलगिचे होमा |
का बुडोनी प्राण गेले | ते अर्धोदकी निमाले |
हे म्हणो नये जाहले | दुर्मरणाचि || १९४ ||

शरिराला कष्ट पडतील ह्या भितीने ज्या कर्माचा त्याग केला जातो तो राजस त्याग होय. अशा त्यागाचे कर्म घडून सुद्धा फळ मिळत नाही. होम चालू असताना दूध उतू गेले म्हणजे ते होमाला उपयोगी पडले असे होत नाही ते वाया गेले म्हटले जाते. एखादा नदीत / विहिरीत / पाण्यात बुडून मृत्यु पावला तर तो बुडाला म्हणून मृत्यु पावला असेच म्हणतात की त्याला तुम्ही जलसमाधी म्हणाल? नाही. असा त्याग असू नये. तो मोक्षाप्रत जात नाही. यानंतर सात्विक त्याग समजावून सांगतात.

आवडतियेही फळी | असारे साली आंठोळी |
त्यासाठी अवगळी | फळाते कोण्ही?

आता जाळूनि बीज जैसे | झाडा कीजे निर्वंशे |
फळ त्यागूनि कर्म तैसे | त्याजिले नेणे |
लोह लागत खेवो परिसी | धातूंची गंधा काळिया जैसी
जाती रजतमे तैसी | तुटली दोन्ही || २०९ ||

आपल्याला एखादे फळ आवडते त्यातले बी, त्याची साल, कोय टाकून द्यायची का सगळेच फळ त्यात बी व साल आहे म्हणून टाकले जाते?

बी जाळले तर त्यातून झाडाची वाढ होत नाही त्याप्रमाणे फक्त फलत्याग करून कर्माचे बीज जाळून टाकावे म्हणजे कर्म बद्ध होत नाही. लोखंडाला परिसाचा स्पर्श झाल्यावर त्याचा गंज व काळिमा निघून जातो तसे कर्मामधील अभिमान व फळाची इच्छा हे त्यागले तर रजोगुण व तमोगुण नाहिसे होतात.

कर्माचा त्याग करू नये ते शक्य ही नाही. यासाठीची उदाहरणे पुढे पाहू या.

मृत्तिकेचा वीटु | घेऊनि काय करील घटु? |
केउता ताथु पटु | सांडिल तो? || २१९ ||

तेवीचि वान्हित्व आंगी | आणि उबे उबेगणे आगी |
की तो दीपु प्रभेलागी | द्वेषु करील काई || २२० ||
हिंगु त्रासिला घाणी | तरी कैचे सुगंधत्व आणी?
द्रवपण सांडूनि पाणी | के राहे ते? || २२१ ||
तैसा शरिराचेनि आभासे | नांदतु जव असे |
तव कर्मत्यागाचे पिसे | काइसे तरी? || २२२ ||

मडके म्हणजे घात त्याला मातीचा कंटाळा करून कसे चालेल? वस्त्राला तंतूचा त्याग करून चालणार नाही.

आग उष्णतेला कधी कंटाळते का? दिवा प्रकाशाचा द्वेष करतो का? हिंग म्हणेल माझा घाण वास आहे, मग काय त्याला सुगंध प्राप्त होईल का? पाण्याचा द्रवपणा पाण्याने सोडून टाकला का? म्हणून शरिर आहे तोपर्यंत कर्माचा त्याग करण्याचा आग्रह धरून काय उपयोग? यावर एकच उपाय. कर्माचा त्याग न करता कर्माचे फळ ईश्वरार्पण करावे मग आत्मबोध होतो.

बिजचि वरोसि वेंचे | तेथ वाढती कुळवाडी खांचे |
तेवी फळत्यागे कर्माचे | सारिले काम || २५८ ||

पेरणी करता शेतकरी बी साठवून ठेवतो पण तेच जर रोजच्या घरातील उपयोगासाठी वापरले तर काय होईल? शेतीचा पुढचा व्यापारच थांबेल पेरणी नाही तर पीक नाही. त्याप्रमाणे कर्मफलाचा त्याग करून त्यांनी कर्माचे फलाची अपेक्षाच ठेवली नाही मग बद्धता संपते. आत्मबोधाला सुरुवात होते. कर्मफलसंन्यास म्हणजे अज्ञान पण उरत नाही याकरिता खालील ओव्या पाहू या.

पडोनि गेलिया भिंती | चित्रांची केवळ होय माती |
का पाहालेया राती | आंधारे उरे? || २६३ ||
जै रूपचि नाही उभे | तै साउली काह्याची शोभे ||?
दर्पणेवीण बिंबे | वदन कें पां || २६४ ||
फिटलिया निद्रेचा ठावो |कैंचा स्वप्नासि प्रस्तावो?
मग साच का वावो | कोण म्हणे | २६५ ||
तैसे गा संन्यासे येणे | मूळ अविद्येसीचि नाही जिणे |
मा तियेचे कार्य कोणे | घेपे दीजे || २६६ ||

आपण भिंतीवर चित्र काढलेले आहे पण भिंतच पडली तर त्या चित्राची माती होते. कर्मफलसंन्यासाने कशाचाच ठावठिकाणा राहत नाही. मग कर्म कुठे व फळ कुठे?

रात्री अंधार पडतो पण दिवस उजाडला की रात्र संपते तसा अंधारही. कर्मफलाचे असेच घडते संन्यास वृत्तीने. आपण उन्हात उभे राहतो व आपली सावली पडते. पण उभेच राहिलो नाही तर आकृती नाही व सावली नाही. आरसाच नाही तर प्रतिबिंब कसे दिसणार? झोपेतून जागे झालो तर स्वप्नही नाही. मग ते पाहिलेले खरे खोटे हे पण सांगता येणार नाही.

या सगळ्या उदाहरणावरून एकच विशद करायचे. कर्मफलसंन्यासाने अज्ञानाचा समूळ नाश. मग कर्मफळाची उठाठेव कशाला?

आत्मा व कर्म यात भेद आहे पण आपली मात्र फसगत होते. पण आपल्या अज्ञानामुळे ते त्याच्याच ठिकाणी वाटते. हे पटवून देताना रोजच्या माहितीची उदाहरणे दिलीत पाहू या.

पांघरौनि नईचे उदक | असे नईचिमाजी खडक |
परी जाणिजे का वेगळिक | कोडीची ते || २७१ ||
हो का उद्काजवळी | परी सीनानीचि ते बाबुळी |
काय संगास्तव काजळी | दीपु म्हणो ये || २७२ ||
पार्था गा तेतुलिने माने | आत्मेनिसी कर्म सिने |
परी घेवविजे अज्ञाने | ते कीर ऐसे || २७५ ||

नदीमध्ये खडक आहे तो आत आहे त्यावरून पाण्याचा प्रवाह आहे. परंतु तो वेगळा आहे व पाणी वेगळे आहे हे समजते. पाण्यावर किंवा जवळ शेवाळ साचते ते व पाणी वेगवेगळे. दिव्याला काजळी येते पण काजळी म्हणजे दिवा होत नाही. अगदी ह्याच न्यायाने अर्जुना, आत्मा व कर्म यांत भेद आहे. परंतु आपल्याला वाटते आत्म्याच्या ठिकाणीच कर्म आहे.

यानंतर कोणत्याही कर्माच्या सिद्धीला आवश्यक पाच कारणे सांख्य सिंद्धांतात सांगितली. ती पाहू या. आधी या पाच कारणांचा व आत्म्याचा संबंध नाही हे सांगतात. मग कारणे सांगतात. हा विषय चांगला समजावून घ्यायचा आहे. त्यामुळे त्याचे चांगले मनन करू या.

तोय तेज घुमू | यया वायूसी संगमु
जालिया होय अभ्रागमु | व्योम ते नेणे | ३०८ |
नाना काष्ठी नाव मिळे | ते नावाडेनि चळे |
चालविजे अनिळे | उदक ते साक्षी || ३०९ ||
का कवणे एके पिंडे | वेचिता अवतरे भांडे |
मग भवंडीजे दंडे | भ्रमे चक्र || ३१० ||

आणि कर्तृत्व कुलालाचे | तेथ काय ते पृथ्वीयेचे |
आधारावाचूनि वेचे | विचारीपा || ३११ ||
तैसे पांचहेतु मिळणी | पांचेचि इही कारणी |
कीजे कर्मलतांची लावणी | आत्मा सिना || ३१३ ||

पाच कारणांमुळे कर्म वेलीची उभारणे होते. आत्मा यावरून वेगळा (सीना) आहे हे सांगताना आपल्याला समजतील अशी उदाहरणे श्री ज्ञानेश्वर महाराजांनी दिली आहेत.

१) पाणी उष्णता व वाफ यांचा वायुशी संबंध आला की, ढग जमा होतात याची आकाशाला (व्योम) कल्पनाच नसते.

२) दोन लाकडांच्या तुकड्यांनी नाव तयार होते. ती नाव नावाडी पाण्यात चालवतो. वायुच्या मदतीने यात पाणी मात्र फक्त साक्षी आहे. त्याचा ह्याच्याशी काही संबंध नाही.

३) कुंभार मातीचा गोळा करतो तो चाकावर ठेवतो. चाकाला गती देतो. मातीच्या गोळयाचा आकार बदलत जातो व भांड्याचा आकार येतो. यात मातीने काय केले? हे तर कुंभाराचे (कुलाल) कौशल्य आहे.

४) म्हणून जी ५ कारणे कर्माची आहेत त्याचा आत्म्याशी काही संबंध नाही. आत्मा वेगळा आहे. कारणे वेगळी आहेत.

शरीर जीव इंद्रिय त्याचे व्यापार क्रिया व अधिष्ठात्री देवता ही ५ कारणे चांगली समजली तर कर्माचा सिद्धांत समजेल. म्हणून मुद्दाम सविस्तर पाहण्याचे ठरवले आहे. देहाला अधिष्ठान म्हटले आहे.

ययाते अधिष्ठान ऐसे | म्हणिजे ते याचि उद्देशे |

जे स्वभोग्येंसी वसे | भोक्ता येथ || ३१६ ||

जीव हा यात वास करतो व सुख दुःख भोग भोगतो.

इंद्रियांच्या दाहे हाती | जाचोनिया दिवोराती |

सुखदु:खे प्रकृती | जोडीजती जिये | ३१७ |

तिये भोगावया पुरुखा | आन ठावोचि नाही देखा |

म्हणौनि अधिष्ठान भाखा | बोलिजे देहा || ३१८ ||

५ ज्ञानेंद्रिय व ५ कर्मेंद्रिये ह्याच्या करून, कष्ट करून प्रकृतीमार्फत जी सुखदुःखे मिळवली जातात, ती भोगण्यासाठी या जीवाला दुसरी जागाच नाही देहाशिवाय. म्हणून अधिष्ठान म्हणजे देह. हे कर्मासाठीचे पहिले कारण होय.

यानंतरचे दुसरे कारण **जीव**. ते चांगले सविस्तर समजून घेणे आवश्यक आहे. त्यालाच **कर्ता** म्हटले आहे.

कर्ता हे दुजे | कर्माचे कारण जाणिले | प्रतिबिंब म्हणिजे

चैतन्याचे जे ॥ ३२१ ॥

कर्म आपण करतो. त्याला दुसरे कारण कर्ता. कर्ता कोण? त्याला उपमा दिली आहे चैतन्याच्या प्रतिबिंबाची. शरीरात राहणारा साक्षीभूत जीवच कर्ता बनला आहे.

आकाशचि वर्षे नीर । ते तळवटी बांधे नाडर ।
मग बिंबोनि तदाकार । होय जेवी ॥ ३२२ ॥
तैसे आपुलेनि विसरे । चैतन्यचि देहाकारे ।
आभासोनि आविष्कारे । देहपणे जे ॥ ३२४ ॥
प्रकृति करी कर्मे । ती म्या केली म्हणे भ्रमे ।
येथ कर्ता येणे नामे । बोलिजे जीवु ॥ ३२६ ॥

किती सुंदर रीतीने समजावले आहे. पाऊस पडतो आकाशातून. खाली पडला की पाण्याचे डबके तयार होते. त्यात पाणी साचते व आकाशाचे प्रतिबिंब पूर्ण डबक्यात पडते. अगदी आपल्या स्वरुपाची आठवण विसरतो हे चैतन्य. देह मीच आहे आशा रूपाने वावरू लागते. वास्तविक कर्मे प्रकृति करते. ती कर्मे मी केली असे जीव भ्रमाने म्हणतो. म्हणूनच जीवास कर्ता म्हंटले आहे. आपण सगळेच अनेक गोष्टींचे श्रेय घेतोच नां. आपल्या देहातील चैतन्याचा व जीवाचा संबंध नसताना

कर्तेपणा घेतोच. आता तिसरे कारण इंद्रिये. त्यांच्याशिवाय कर्म कसे शक्य आहे?

कां घराआंतुल एकु | दीपाचा तो अवलोकु |
गवाक्षभेदे अनेकु | आवडे जेवी || ३२८ ||
कां एकुचि पुरुषु जैसा | अनुसरत नवा रसा |
नवविधु ऐसा | आवडो लागे || ३२९ ||
तेवी बुद्धीचे एक जाणणे | श्रोत्रादिभेदे येणे |
बाहेरी इंद्रियपणे | फांके जे कां || ३३० ||
ते पृथग्विध करण | कर्माचे इया कारण |
तिसरे गा जाण | नृपनंदना || ३३१ ||

घरात आपण दिवा लावतो; पण भिंतीला झरोके असतात. आता खिडक्या आहेत त्यालाच गवाक्ष शब्द वापरला, त्यातून प्रकाश बाहेर पडला तर तो वेगळा वेगळा भासतो. एकच पुरुष पण नवरसाचे (वीररस, करुणरस, शांत रस इत्यादी) अविर्भाव दाखवु लागला की, वेगवेगळा भासतो. वास्तविक बुद्धीचे ज्ञान एकच, पण कान, डोळे, स्पर्श, चव, गंध यांचा ज्ञानेंद्रियांमार्फत वेगवेगळा अनुभव येतो, म्हणून इंद्रिये हे कर्माचे तिसरे कारण आहेत.

यानंतर प्राणशक्ती एकाच वायूची असते. पण ही प्राणशक्ती कर्माचे चौथे कारण आहे.

या प्राणशक्तिचे मुद्दाम सविस्तर वर्णन माऊलींनी केले ते पाहू या. आपल्यालाही ते समजावे हा उद्देश आहे.

तैसी क्रियाशक्ति पवनी | असे जे अनपायिनी |

ते पडिली नानास्थानी | नाना होय ||३३३||

प्राणवायुमध्ये शाश्वत असणारी क्रियाशक्ति निरनिराळ्या ठिकाणी विभागली गेली व त्यामुळे तिला नावे पण निरनिराळी आहेत.

जै वाचे करी येणे | तै तेचि होय बोलणे |

हाता आली तरी घेणे | देणे होय || ३३४ ||

अगा चरणाच्या ठायी | तरी गति तेचि पाही |

अधोद्वारी दोही | क्षरणे तेची |

ती क्रियाशक्ति वाचेत आली की तिला बोलणे म्हणतात व हातात प्राणशक्ती आली की देणे घेणे व्यवहार होतो. पायांची गति ही पण प्राणशक्तीच. मलमूत्रोत्सर्ग ही क्रिया सुद्धा वायुनेच घडते.

आता आपल्या परिचयाची ५ प्राणशक्ती पाहू.

१) कंदोनी हृदयावरी | प्रणवाची उजरी | करिता तेचि

शरिरी| प्राणु म्हणिजे.||३३६||

ओंकार म्हणतांना नाभी पासून हृदयापर्यंत जी शक्ति येते ती प्राण होय. प्राणाय स्व:हा: म्हणतो आपण.

२) मग ऊर्ध्वीर्चीया रिगानिगा | पुढती तेचि शक्ति पै गा |

उदानु ऐसिया लिंगा | पात्र जाहली |

हीच शक्ति हृदयाच्या वर कंठापर्यंत आली तर तिला

कंठस्थ वायु म्हणजे उदान म्हणतात. उदानाय स्व:हा:

३) अधोरान्ध्राचेनि वाहे | अपानु हे नामे लाहे |

गुदद्वाराने बाहेर पडणाऱ्या ह्याच शक्तीला अपान म्हणतात. अपानाय स्वःहा:

४) व्यापकपणे होय | व्यानु तेचि || ३३८ ||

सर्व शरिरात व्यापली की तिचे नाव **व्यान** होते.

व्यानाय स्व:हा:

५) आरोगिलेनि रसे | शरिर भरी सरिसे | आणि न सांडिता असे |

सर्वसंधी | मग तेचि क्रिया पाठी |

समान ऐसी किरीटी | बोलिजे गा || ३४० ||

आपण अन्न खाल्यानंतर त्याचा अन्नरस होतो. तो सर्व शरिरात पसरतो. सर्व सांध्यामध्ये हीच वायुशक्ति असते. त्यामुळे अन्नरसाचे वहन सुरळीत होते. याच शक्तीला समान म्हणतात. समानाय स्वाहा:

अशा प्रकारे ह्या वायुशक्तिला कर्माचे चौथे कारण म्हणतात.

नाना कमळी पांडवा। विकासु जैसा बरवा |
विकासीही यावा | परागाचा तो | ३४६ ||
वाचे बरवे कवित्व | कवित्वी बरवे रसिकत्व |
रसिकत्वी परतत्व | स्पर्शु जैसा ||
इंद्रय प्रौढी मंडळा | श्रृंगारू एकुचि निर्मळा |
जै आधिष्ठात्रिया का मेळा | देवतांचा जो ।| ३४९ ||
ते देववृंद बरवे कर्मकारण पाचवे | अर्जुना एथ
जाणावे | देवो म्हणे || ३५१ ||

कमल विकसित झाले की शोभून दिसते. ह्या विकासित झालेल्या या कमलात परागाचा उठाव आला की, आणखीनच शोभून दिसते. आपली वाणी काव्यरूप असावी व त्यात रसिकतेची भर पडावी व त्या रसिकतेला पण परतत्वविषयक विचार असला म्हणजे ती वाणी उत्तम संज्ञा प्राप्त करते. आपली जी इंद्रिये आहेत त्याच्या अनुकूलतेसाठी

शोभून दिसणारी गोष्ट म्हणजे स्थानांची देवतेची अनुकूलता. हा देवतांचा समुदाय हे कर्माचे पाचवे कारण होय.

प्रत्येक स्थानाची देवता आहे. इंद्रियाकडुन कर्मे घडत असताना हे दैवत अनुकूल पाहिजे हा याचा अर्थ.

ह्या पाच कारणाशिवाय कोणतेही कारण घडत नाही.

अगा बावन्ना वर्णापरता । कोण मंत्रु आहे पंडुसुता |
का बावन्नही नुच्चारिता | जीवु आथी || ३७३ ||
परी मंत्राची कडसणी | जव नेणिजे कोदंड पाणी |
तव उच्चार फळवाणी | न पवे जे वी ||

कर्म यथाशास्त्र घडावे लागते, तरच त्याचा फायदा होतो. त्यासाठी आपल्या वर्णमालेतील ५२ अक्षरांचा व मंत्राचा दाखला दिला आहे. कोणताही मंत्र ह्या ५२ अक्षराला सोडून आहे का? नाही. आपण ही ५२ अक्षरे कधी ना कधी उच्चारतोच. परंतु ही अक्षरे ज्या मंत्रात आहेत ती म्हणण्याची पद्धत माहीत नसेल तर उपयोग नाही. त्याचे फळ मिळत नाही. कर्माचे तसेच आहे. त्याला शास्त्राच्या विधीचा विनियोग माहीत असावा.

पाहे पां बद्ध भावना दृढा । नळिये वरी तो बापुडा |

काय मोकळेया पायाचा चवडा | न ठकेचि पुंसा ||

म्हणौनि निर्मळे आत्मस्वरूपी | जो प्रकृतिचे केले आरोपी |

तो कल्पकोडीच्या मापी | मवीचि कर्मे || ३९४ ||

पोपट नळीवर बसलेला असतो. पण मनाने त्याला वाटते, मी बांधला गेलो आहे. पायाचा पंजा मोकळा असूनही त्या कल्पनेमुळे तो ती नळी काही सोडत नाही. अगदी या न्यायाप्रमाणे निर्मळ आत्मस्वरूपावर जो प्रकृतीच्या कर्माचा आरोप करतो तो कित्येक वर्षापर्यंत कर्मबंधनातच अडकतो. आत्मस्वरूप कधीही बद्ध होत नाही. हा त्याचा साधा अर्थ आहे. आपल्यावर कर्तेपणाचा आरोप गेल्यावर अद्वयानंद होतो. यासाठी अग्नी व पदार्थ याचे रूपक घेऊन समजावले आहे.

जैसा वन्हि लागे । ते वान्हिचि जालिया आंगे |

दाह्यदाहक विभागे | सांडिजे ते || ४११ ||

तैसा कर्मकारा दुजेया | तो कर्तेपणाचा आत्मया |

आळू आला तो गेलिया | काही बाही | जे उरे || ४१२ ||

एखाद्या वस्तूला अग्नीचा स्पर्श झाला तर त्याचे अस्तित्व उरत नाही. भेद संपतो. त्याप्रमाणे आत्म्याहून भिन्न जे कर्म आहे त्या कर्मामुळे आत्म्यावर जो कर्तेपणाचा आरोप होता तोच गेला तर काय

उरेल? त्याला देहभानही नसते. तोच त्याचा अद्वयानंद होतो. एवढे असूनही ज्या कर्माने देह उत्पन्न झाला आहे ते कर्म त्या देहाकडून आपोआप घडते. याकरिता माऊलींनी ४-५ उदाहरणे देऊन समजावले आहे. उदाहरणे सहज समजण्यासारखी आहेत. सगळीच पाहू म्हणजे व्यवस्थित समजायला सोपे जाईल.

वारा जरी वाजोनि वोसरे । तरी डोल रुखी उरे |
का सेंदे द्रुति राहे कापुरे | वेचलेनि || ४२३ ||
का सरलेया गीताचा समारंभु | न वचे
राहवलेपणाचा क्षोभु ||
भूमी लोळोनि गेलिया अंबु | वोल थारे || ४२० ||
अगा मावळलेनि अर्के | संध्येचिये भूमिके |
ज्योतिदीप्ती कौतुके | दिसे जैसी || ४२५ ||
नाना चक्री भांडे जाले | ते कुलाले परते नेले ||
परी भ्रमेचि ते मागिले | भोवंडिलेपणे || ४२७ ||
तैसा देहाभिमानु गेलिया | देह जेणे स्वभावे धनंजया |
जाले ते अपैसया | चेष्ट्वीच ते || ४२८ ||

वारा सुटतो नंतर तो थांबतो. पण तरीही झाडांची पाने काही काळ हलत राहतात. सेंदे म्हणजे डबी. त्यात कापूर ठेवतो. कापूर संपला तरी काही काळ त्यात वास राहतो. आपण समजा गाण्याच्या कार्यक्रमाला गेलो, गाणे संपले, कार्यक्रम झाला तरी मनात त्या गाण्याच्या ताना वाद्याचे झंकार - बोल काही काळ उरतातच.

एखाद्या पृष्ठभागावर पाणी साचते. कालांतराने ते पाणी वाहून जाते. राहत नाही, तरीही पृष्ठभागाचा ओलसरपणा राहतोच. सूर्य मावळतो, पूर्ण दिसेनासा होतो. तरी सायंकाळी त्याची छटा आकाशात राहते त्याला आपण सांजप्रकाश म्हणतो. कुंभार मातीची भांडी तयार करताना पाहिले आहे का? भांडे तयार झाले की, अलगद कुंभार ते खाली घेतो; पण त्याने चाकाला जी गती दिलेली असते, ते चाक काही काळ तरीही फिरते. अगदी ह्या सगळ्या उदाहरणाप्रमाणे देहाभिमान गेला तरी देह आहे तर तो ज्या कर्माने उत्पन्न झाला ते कर्म देहाकडून आपोआप क्रिया करून घेतेच. त्याला आत्म्याच्या संकल्पाची गरजच नसते. जो आत्मस्वरूपी लीन झाला त्याला देहादी कर्माचे भानच नसते. त्यासाठी खूप छान पद्धतीने समजावले आहे.

सुवर्णाचिया चंडिका | सुवर्णशूळेचि देखा |
सुवर्णाचिया महिखा | नाशु केला || ४४ ||

तो देवलवासिया कडा | व्यवहारू गमला फुडा |
वाचूनि शूळ महिष चामुंडा | सुवर्णाचि ते || ४४५ ||
चै चित्रीचे जळ हुतांशु | तो दृष्टीचाचि आभासु |
पटी आगी वोलांशु | दोन्ही नाही || ४४६ ||
मुक्ताचे देह तैसे | हालत संस्कारवशे |
ते देखोनि लोक पिसे | कर्ता म्हणती || ४४७ ||

मुक्त देहाची अवस्था कशी असते व त्याचे कर्म विषयक व्यापार कसे चालतात? तो यापासून कसा अलिप्त आहे, हे पुन्हा एकदा महाराज सांगतात.

देवी सोन्याची, तिच्या हातात शूळ दिला तो सोन्याचाच. महिषासुर केला तोही सोन्याचाच. भाविकांना वाटते हे तीनही किती भिन्न आहे, देवी शूळाने महिषासुराचा वध करते. खरे पाहता हे सगळे सोनेच.

कापडाच्या वस्त्रावर आपण छान चित्र काढतो. त्याला अग्नी ज्याला दाखवतो, पाणी दाखवतो. नीट लक्षात घ्या, हा दृष्टीचा भ्रम आहे. कारण त्या वस्त्राला हा भेद जाणवतच नाही. अगदी हाच न्याय त्या ज्ञात्याच्या देहादि व्यापाराला किंवा कर्माला लागू पडतो. वेडे लोक या ज्ञात्या पुरुषाला तो कर्मे करतो, असे म्हणतात. मी याचा अनुभव

अकोल्याचे संत गुलाबबाबा यांच्या सान्निध्यात एकदा कोपरगावच्या शेतकऱ्याकडे त्यांच्या दर्शनाला गेलो तेव्हा घेतला आहे. विदेही अवस्थेत कर्म मग काय घडते, याचा पत्ताच लागत नाही.

यानंतर ज्ञान काय, ज्ञेय काय व ज्ञाता काय ह्या तीन क्रिया पाहू .

हे असो इही इंद्रिया राहाटे | जे सुखदु:खेसी जीवा भेटे |
ते सुषुप्तिकाली वोहटे | जेथ ज्ञान | तया जीवा नाव ज्ञाता |
आणि जे हे सांगितले आता | तेचि एथ पंडुसुता |
ज्ञानजाण || ४६६ ||

इंद्रीयाद्वारे हे सुखदुःखादी अनुभव जीवाला देते, ते ज्ञान होय. सुषुप्ती अवस्थेत ते लय पावते. जाणणाऱ्या जीवाला ज्ञाता म्हणतात. ह्या सुख-दुःखाच्या अनुभवाला ज्ञान म्हणतात. ज्ञेयाचे पाच प्रकार व काय ते पाहू या.

तरी शब्द स्पर्शु | रूप, गंध रसु | हा पंचविध
आभासु | ज्ञेयाचा तो |
जैसे एकेचि चूतफळे | इंद्रिया वेगवेगळे |
रसे वर्णे परिमळे | भेटिजे स्पर्शे || ४७३ ||
तैसे ज्ञेय तरी एकसरे | परी ज्ञान इंद्रियाद्वारे |

घे म्हणौनि प्रकारे | पाचे झाले |

शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे ज्ञेयाचे पाच प्रकार आहेत. आंबा हे एकच फळ (चूतफळ = आंबा) पण त्याचे भोग पहा. स्पर्श / पाहणे / चव घेणे / वास घेणे. वास्तविक ज्ञेय एकच. पण पाच प्रकारच्या इंद्रियांकडून त्याचे ज्ञान होते म्हणून पाच प्रकार झाले एवढेच.

आणि समुद्री वोघांचे जाणे | सरे लाणीपासी धावणे |
का फळी सरे वाढणे | सस्याचे जेवी |
तैसे इंद्रियाच्या वाहवटी | धावतया ज्ञाता जेथ ठी|||
होय ते गा किरीटी | विषय ज्ञेय || ४७६ ||

नदीचा प्रवाह समुद्रात शिरल्यावर संपतो. प्रवास करताना जिथे मुक्काम करायचा ते ठिकाण आले की तो प्रवास थांबतो. धान्य (सस्य) पिकले की वाढ खुंटते, त्याप्रमाणे इंद्रियांद्वारा धावणाऱ्या ज्ञानाची जी अखेरची सीमा त्याला ज्ञेय म्हणतात.

हे ना घनगर्जना सरिसा | मयूर वोवांडे आकाशा |
ज्ञाता ज्ञेय देखोनि तैसा | धावचि घे || ४८४ ||

ढगांचा गडगडाट ऐकला की आता पाऊस पडेलच, या आशेने मोर नाचायला सुरुवात करतो. ज्ञाता पण असेच करतो. ज्ञेय दिसले की

धाव घेतो. कोणत्याही विषयाच्या मागे आपण कसे पळतो, धाव घेतो हे आपल्याला सर्वांना चांगले माहीत आहे.

त्यावेळच्या प्रथेप्रमाणे शेतसारा शेतकऱ्याकडून वसूल करण्यासाठी राजा त्याला राबवून घेतो हे माऊलींनी सांगितले आहे. त्याप्रमाणे इंद्रिये दुःखाचा ठाव नाहिसा होईपर्यंत कर्ता राबवून घेतो दहाही इंद्रियांना. ते खालील ओवीत आहे.

मग फिटे दु:खाचा ठावो | तव राहाट्वी रात्रि दिवो |
विकणवाते का रावो | जयापरी || ५०४ ||
विकणवाते = सारा थकलेल्या शेतकऱ्याचा ) असा अर्थ.

माऊलींनी शेतकऱ्याच्या शेतसाऱ्यासंबंधीचे उदाहरण देऊन कमाल केली आहे असे मला वाटते. त्याचा मालक किंवा राजा त्याला राबवतो, त्याप्रमाणे इंद्रिय कर्मे करून घेतात. थकत नाहीत.

कर्ता, क्रिया व करण हे सर्व कर्माचे जीवन आहे ह्यासाठी पुढची ओवी पाहू.

वन्ही ठेविला असे धूमु | आथी बीजी जेवी द्रुमु |
का मनी जोडे कामु | सदा जैसा || ५१३ ||
तैसा कर्ता क्रिया करणी | कर्माचे आहे जिंतवणी |

सोने जैसे खाणी | सुवर्णाचिये || ५१४ ||

अग्नि आहे तेथे धूर आहे. बीज आहे म्हणजे येणाऱ्या वृक्षाचे सूक्ष्म रूप आहे, मन आहे म्हणते कामरूपी वासना आहे; त्याप्रमाणे कर्ता, क्रिया करण ही सर्व कर्माचे जीवन आहे. सोन्याची खाण असली तर तिचे सर्वस्व जीवन म्हणजे सोनेच. कर्माचा व आत्म्याचा संबंध नाही. कर्ता, क्रिया, करण ह्या त्रिपुटींनी कर्म घडते.

सात्विक ज्ञानाचा उदय झाला तर ज्ञेय हे ज्ञात्यासह त्यात सामावून जाते, शिल्लक राहत नाही. हे समजावले आहे पुढच्या ओवीत. सर्वत्र त्याला आत्मस्वरूप अनुभवास येते. भिन्नता राहत नाही.

जैसा सूर्य न देखे अंधारे | सरिता नेणिजती सागरे

का कवळिलिया न धरे | आत्मछाया || ५३० ||

तयापरी जया ज्ञाना | शिवादि तृणावसाना |

इया भूतव्यक्ति भिन्ना | नाडळती || ५३१ ||

सूर्य कधी अंधाराला पाहू शकेल काय? नाही. जी नदी सागराला मिळते ती कोठे असे समुद्राला विचारले तर सांगता येईल का? सावलीला आपण पकडू शकतो का? नाही. यात सगळे अभिन्न आहे, त्याप्रमाणे ज्या ज्ञानाला शिवापासून ते गवताच्या गाडीपर्यंत कोठेही

भिन्नता दिसत नाही ते सात्विक ज्ञान होय. राजस ज्ञानाने भिन्नत्व कसे अनुभवतात, यासाठी सोपी उदाहरणे दिली ती पुढील ओव्यांत पाहू या.

अलंकारपणे झांकले | बाला सोने का वाया गेले |
तैसे नामी रुपी दुरावले | अद्वैत जया || ५४२ ||
अवतरली गाडग्या घडा | पृथ्वी अनोळख जाली मूढा |
वन्हि जाला कानडा | दिपत्वासाठी || ५४३ ||
का वस्त्रपणचेनी आरोपे | मूर्खाप्रति तंतु हारपे ||
नाना मुग्धा पढू लोपे | दाऊनि चित्र || ५४४ ||
तैशी जाया ज्ञाना | जाणोनि भूतव्यक्ति भिन्ना |
ऐक्य बोधाची भावना | निमोनि गेली |५४५|

आपण सोन्याचे अलंकार करतो. वेगवेगळे अलंकार पाहून ती सगळी भिन्न भिन्नपणे पाहतो. त्यातील सोने या मूळ स्वरूपाला आपण विसरतो.

मातीची वेगवेगळी भांडी सुद्धा भिन्नपणे पाहतो त्यातील समान असणारे पृथ्वीतत्त्व आपण विसरतो. वास्तविक लावलेला दिवा हे अग्नीचे रूप असून आपण त्याला दिवा आहे, असेच ओळखतो. वस्त्र हे तंतूपासून विणले जाते, पण आपण तंतूच्या स्वरूपाला विसरून वस्त्र

वेगळे पाहतो. कापडावर चित्रे काढल्यावर चित्रे पाहताना मूळ कापडाला आपण विसरतो. त्याप्रमाणे ज्या ज्ञानाच्या भावनेने भिन्नत्व प्रत्ययाला येते तेच राजस ज्ञान होय. नंतर तामस ज्ञान समजावले आहे.

नाना वनामाजी बोहरी | कडसणी जेवी न करी |
का जीत मेले न विचारी | बैसता माशी |
तैसे निषिद्ध सांडूनि जावे | का विहित आदरे घ्यावे |
ते विषयांचेनि नांवे | नेणेचि जे || ५५७ ||

रानात वणवा पेटल्यावर वर्ज-अवर्ज्य असे काही राहत नाही. सगळे सारखेच पेटते. माशी पदार्थावर बसताना जिवंत मेलेला असा काही भेद करीत नाही; त्याप्रमाणे तामस ज्ञान इतके विषयाधीन असते की त्यात काय घ्यावे, काय टाकावे हा विवेक शिल्लक उरत नाही. पुढची ओवी मुद्दाम पहा, तुम्हाला निश्चित ही उपमा आवडेल.

तैसे जे वायाणे | वोसाळ दिसे जाणणे |
तयाते मी म्हणेज | तामसज्ञान || ५७८ ||
तेही ज्ञान इया भाषा | बोलिजे तो भावी ऐसा
जात्यांधाचा कां जैसा | डोळा वाडु || ५७९ ||

वांझ म्हणजे निरूपयोगी व अर्थशून्य उपयोगाचे म्हणजे हे तामसज्ञान. माऊली म्हणतात, याला ज्ञान तरी का म्हणायचे, तर आंधळ्याचा डोळा आहे, असे म्हणण्याचा हा प्रकार आहे. आता सात्विक, राजस व तामस कर्म समजावून घेऊ, माऊलींनी दिलेल्या उदाहरणातून!

आणि आंगा जीवाची संपत्ती | वेचूनी बाळाची करी पाळती |
परी जीवे उबवणे हे स्थिती | न पाहे माय || ५८९ ||
तरी अकराणाचेनि खेदे | द्वेषाते जिवी न बांधे |
जालियाचेनि आनंदे | फुंजो नेणे || ५९२ ||

आई बाळाची काळजी घेताना जीवाची पर्वा करीत नाही. शरीराला पडणाऱ्या कष्टाची तिला फिकीर नाही; त्याप्रमाणे कर्मात व्यत्यय आला तरी खेद नाही किंवा कर्म चांगल्या रीतीने पार पडली तरी ज्याला चित्तात ना अभिमान येतो, ना त्याचा त्याला गर्व होतो. हेच सात्विक ज्ञान होय. राजस ज्ञानासाठी दिलेली उदाहरणे खूप मजेशीर आहेत.

एका कणालांगी उंदिरू | आसका उपसे डोंगरू |
कां शेवाळोद्देशे दर्दुरू | समुद्र डहुळी |

हे असो परमाणूचिनी लाभे | पाताळ लांघिती वोळंबे |
ते काम्य कर्म सक्लेश | जाणावे येथ राजस || ६१० ||

धान्याच्या एका कणासाठी उंदीर पुरा डोंगर पोखरतो. शेवाळासाठी बेडूक समुद्र ढवळून काढतो. वाळवी एक एका मातीच्या कणासाठी पाताळापर्यंत जाते. कष्टाला, श्रमाला अंत नाही, अशी ही राजस कर्मे आहेत.

तामस ज्ञानाने कष्ट होतात व दुसऱ्यालाही अपाय होतो.

का आपण आंगे जळे | आणि नागवी जगाचे डोळे |
पतंगु जैसा सळे | दीपाचेनि || ६१८ ||
तैसे सर्वस्व वाया जावो | वरी देहाही होय घावो |
परी पुढील अपावो | निफजविजे जेणे || ६१९ ||

पतंगाला दिवा सहन होत नाही. तो त्याचा द्वेष करायला जातो. पण घडते काय? पतंग तर स्वतः जळतो; पण दिवा विझतो, ज्योत विझली की अंधार होतो म्हणजे अपाय स्वतःला व दुसऱ्याला. तामस कर्माचे असेच आहे. कर्माप्रमाणे भगवान कर्ता तीन प्रकारचे आहेत असे सांगतात.

आणि आदरे करी बहुवसे | परी कर्ता मी हे नमुसे |

वर्षाकाळीचे जैसे | मेघवृंद || ६३४ ||

तव अधिकाधिक | उत्साहो धरी आगळीक |

सोने जैसे पुटी तुक | तुटलिया कसी || ६४१ ||

नातरी आदरिले | अव्यंग सिद्धी गेले | तरी तेही

जिंतिले | मिरवू नेणे |

इया खुणा कर्म करिता | देखिजे जो पंडुसुता |

तयाते म्हणिपे तत्वतां | सात्विकु कर्ता || ६४८ ||

सात्विक कर्ता सर्व कर्मे आदरपूर्वक करतो. परंतु त्याला कर्तृत्व केल्याचा यत्किंचितही अभिमान नसतो. त्यासाठी पावसाळ्यातील ढग गर्जना करीत नाही. पण वर्षाव मात्र करतात, हे उदाहरण दिले आहे. तो अतिशय उत्साहाने कर्म करीत जातो, त्यासाठी सोन्याचे उदाहरण दिले आहे. सोनी आगीत घातले तर वजनात घट पडेल, पण कसाला वाढते? सुरू केलेले कर्म सिद्धीस गेले तरी त्याबद्दल मिरवत बसत नाही. असे कर्म करणारा सात्त्विक कर्ता होय.

कृपणु चित्ती ठेवा आपुला | तैसा दक्षु पराविया माला |

बकु जैसा खुतला | मासेयासी || ६५४ ||

तैसे मने वाचा काये | भलतया दुख देतु जाये |

स्वार्थु साधिता न पाहे | पराचे हित ||

कनकाचिया फळा | आतु माज बहिरी मौळा |

तैसा सबाह्य दुबळा | शुचीत्वे तो || ६५८ ||

यानंतर राजस कर्ता कसा असतो हे उदाहरणांनी पटवून दिले आहे. कृपण माणूस स्वतःच्या पैशासाठी सावध असतो. बगळा माशासाठी जणू ध्यान लावून बसलेला असतो, तसा हा राजस कर्ता मनाने, वाचेने व शरीराने दुसऱ्याला दुःख द्यायला तत्पर असतो. कनक म्हणजे धोतऱ्याचे फळ. त्यात बेशुद्ध पडण्याचे बी आत असते. तसा हा आत-बाहेर पवित्र असतो, दुबळा असतो.

तिया करिताही वेळी | काय झाले हे न सांभाळी |

चला वायु वाहटुली | चेष्टे तैसा ||

आणि आणिकांचे निके केले | विरू होय जया आले |

जैसे अपेय पया भिनले | लवण करी || ६७५ ||

वावटळ सुटली तर वारा स्वैर संचार करतो त्याप्रमाणे तामस कर्ता क्रिया करताना परिणामांकडे अजिबात लक्ष देत नाही. अगदी स्वैराचाराने वागतो. दुसऱ्याचे बरे झालेले अजिबात आवडत नाही. कसे? तर मीठ दुधात पडले तर पिण्यास अयोग्य ठरते. तसेच हा कर्माचा दुसऱ्याला त्रास होईल असेच बघतो.

आता बुद्धिचे तीन प्रकार माऊलींनी दिलेल्या उदाहरणातून पाहू या.

तृषार्ता उदके जिणे | का पुरी पडलिया पोहणे |
अंधकूपी गति किरणे | सुर्याचेनी || ७०५ ||
नाना पथ्येसी औषध लाहे | तरी दाटलाही जिये |
का मीना जिव्हाळा होये | जळाचा जरी || ७०६ ||
तरी तयाच्या जीविता | नाही जेवी अन्यथा |
तैसे कर्मी इया वर्तता | जोडेचि मोक्षु || ७०७ ||
ऐसेनि कार्याकार्यविवेकी | जे प्रवृत्ती निवृत्ति मापकी |
खरा कुडा पारखी | जिया परी |
तैसी कृत्याकृत्य शुद्धी | बुझे जे निरवधी |
सात्विक म्हणिपे बुद्धि | तेचि तू जाण || ५१७ ||

तहान लागलेला माणूस पाण्याने जगतो. पुरात पडला तर पोहून तरतो. विहिरीत पडला व खूप अंधार आहे तर सूर्यप्रकाशाने वर येण्याचे सुचते. रोग्याने पथ्य पाळले तर तो बरा होतो, माशाला पाणी असले की, जगतो; त्याप्रमाणे जसे कर्माचरण केल्याने जीवाला अपाय होत नाही उलट मोक्षच मिळतो. रत्नांची पारख असणारा खरे-खोटे रत्न

ओळखतो. त्याप्रमाणे कार्य-अकार्य प्रवृत्तिपर वा निवृत्तीपर याचे मूल्यमापन जी बुद्धी करते ती सात्त्विक बुद्धी होय.

अगा डोळांवीण मोतिये | घेता पाहु मिळे विपाये |
न मिळणे ते आहे | ठेविले तेथे |
तैसे अकरणीय अवचटे | नोडवे तरीच लोटे |
एरव्ही जाणे एकवटे | दोन्ही जे का || ७२२ ||

डोळ्याने चांगली पारख करून न घेता आपण मोती घेतले तर कदाचित चांगले निघतीलही, पण त्यात चांगले मिळणार नाही हे गृहीत धरावे लागते. त्याप्रमाणे जे करण्यास योग्य नाही असे कृत्य पुढे आले तर सहजगत्या ते घडो की ना घडो आपल्या दृष्टीने ती करण्यायोग्य की अयोग्य हे सारखेच वाटते. या बुद्धिला राजस बुद्धी म्हणतात

नाना निधानचि निदैवा | होये कोळसयाचा उडवा |
पै असते आपणपे जीवा | नाही आले || ७२५ ||
तैसे धर्मजात तितुके | जिये बुद्धीसी पातके |
साच ते लटिके | ऐसेचि बुझे |

तामस बुद्धीला सत्य-असत्य वाटते. धर्म-अधर्म वाटतो.

एखादा दैवहीन पुरुष असावा तिथे द्रव्याचा ठेवा असला तरी त्याला द्रव्याचा ठेवा समजत नाही. जणू तो ठेवा हा कोळसा असल्याचे भासते. त्याप्रमाणे शास्त्राने केलेले आचरण त्याला म्हणजे त्याच्या बुद्धीला पाप वाटते व जे सत्य आहे ते खोटे दिसते, अशी अविवेकी बुद्धी ही तामस बुद्धी होय.

का अगस्तिचेनि दर्शने | सिंधु घेऊनि गती मौने |
चंद्रोदयी कमळवने | मिठी देती ||
हे असो पावो उचलिला | मदमुख न ठेवीत खाला |
गर्जेनि पुढा जाला | सिंहु जरी |
तैसा जो धीरु | उठलिया अंतरु |
मनादिके व्यापारू | सांडिती उभी || ७३७ ||

सात्त्विक धृतीचे माऊली वर्णन करतात. अगस्ती ऋषी दिसताच समुद्र शांत होतो, मौन बाळगतो. चंद्रोदय झाला की, सूर्य कमळे आपोआप मिटतात, सिंहाची गर्जना ऐकल्यावर मदोन्मत्त हत्तीलाही पाऊल खाली ठेवण्याचे भान राहत नाही, त्याप्रमाणे सात्विक धैर्याचा उदय झाला असता मन, प्राण व इंद्रियाचे व्यापार जागच्या जागी थांबतात. हे सर्व सात्विक धैर्य होय.

जे कर्म भांडवला सूये | तयाची चौगुणी येती पाहे |

तेवढे सायास | जया धृती ||
ते गा धृती राजस ||

ज्या कामात कर्म हेच भांडवल वापरून त्याची चौपट वाढ होण्याची इच्छा धरतो. त्यासाठी ज्या धैर्याचे साहस करतो ते राजस धृतीत मोडते.

आणि देहधनाचिया आवडी | सदाभय तयाते न सांडी |
विसंबू न सके धोंडी | काठिण्य जैसे |
लसणाते न सांडी गंधी | का अपथ्यशीळाते व्याधी |
तैसी केली मराणावधी | विषादे तया |
एवं पांचही हे निद्रादिक | तामसाच्या ठाई दोरव |
जिया धृती देख | धरिले आहाती || ७६१ ||

धोंडा म्हणजे कठीण हे समीकरणच आहे, त्याप्रमाणे त्याच्या धृतीत देहबुद्धी पक्की असल्याने भय त्याला सोडत नाही. लसणाचा दुर्गंध जात नाही किंवा पथ्य न पाळणारा असेल तर त्याला व्याधीचे भय सोडत नाही; त्याप्रमाणे निद्रा, भय, शोक, विषाद व मद हे पाच दोष तामसी धृतीच्या माणसाला सोडत नाही.

आता आपण सुखाचे प्रकार पाहू या.

ऐसा जया सुखाचा आरंभु | दावी काठिण्याचा क्षोभु |
मग क्षीराब्धी लाभु | अमृताचा जैसा || ७८८ ||
पै कोलिताही कोपे ऐसे | द्राक्षांचे हिरवेपण असे |
ते परिपाकी का जैसे | माधुर्य आले || ७९० ||
जेव्हा सागरी गंगा जैसी | आत्मा मीनल्या बुद्धि जैसी |
अद्वयानंदाची आपैसी खाणी उघडे || ७९२ ||
ऐसे स्वानुभवविश्रामे | वैराग्यामूळ जे परिणमे |
ते सात्विक येणे नामे | बोलिजे सुख || ७९३ ||

सुखाचा आरंभ सुरुवातीला कष्टप्रद वाटतो खरा; शेवट मात्र परमसुखदायी असतो. त्यासाठी ते समुद्रमंथनाचा दृष्टांत देतात. क्षीराब्धिमंथनातून कष्ट खूप झाले, पण देवांना अमृताची प्राप्ती झाली. हिरवी द्राक्षे खाल्ली, तर ती जिभेला खूप चटका देतात, पण ती चांगली पक्व झाली तर मधुर लागतात, गोड लागतात. गंगा किती लांबून येऊन समुद्राला मिळते पण नंतर समुद्राला मिळाली की, तिचे वाहणे थांबते. त्याप्रमाणे बुद्धी एकदा का आत्मस्वरूपापाशी एकरूप होते त्यावेळी तिला अद्वयानंदाची प्राप्ती होते. आधीचे यम-नियमाचे कष्ट संपतात. ज्या सुखाला वैराग्य हा आरंभ तर आत्मानुभव हा विश्रामाचे ठिकाण आहे

ते **"सात्विक सुख"** होय. हे मुद्दाम विस्ताराने देतो, कारण आपल्याला याच सुखाची प्राप्ती करून घ्यायची आहे.

अधिकारिया रिगता गांवो | होय जैसा उत्साहो |
का रिणावारी विवाहो | विस्तारिला || ८९५ ||
तैसे विषयेंद्रियदोखी | जे सुख जीवातेपोखी |
मग उपडिला खडकी | हंसु जैसा |
तैसी जोडी आघवी आटे| जीविताचा ठाय फिटे |
सुकृताचियाही सुटे | धनांची गाठी || ७९९ ||
तैसे आदी जे गोडिरे | अंती कडू || ८०४ ||

राजस सुख हे आपण सर्व उपभोगतो. इच्छा, कामना, विषय यांतून. आपल्याला प्रारंभी खूप बरे वाटते; पण त्या सुखानंतर दुःख येते. राजाचा एखादा अधिकारी गावात आल्यावर आपल्याला आधी बरे वाटते, पण तो अधिकारी काहीतरी गावाला त्रास देणार हे नंतर लक्षात येते. पहा, माऊलींची सामाजिक व राजकीय दृष्टी. घरी लग्न असले व आपली आर्थिक ऐपत नसली, तर आपण कर्ज काढतो. लग्नाच्या वेळी आनंद होतो पण कर्ज फेडता-फेडता आपली नंतर तारांबळ होते.

विषय व इंद्रिय यांच्या संयोगापासून होणारे सुख पहिल्यांदा चांगले वाटते पण जीवाची दशा नंतर दुःखप्रद होते. त्यासाठी माऊली छान व मजेशीर उदाहरण देतात. खडकावर पाणी साचलेले असताना त्यावर ताऱ्यांचे, नक्षत्रांचे प्रतिबिंब पडले तर हंसाला ते रत्न वाटते. ते घ्यायला तो जातो, तर त्याची चोच मात्र फुटते. त्याप्रमाणे राजस सुखाच्या मागे लागले तर आयुष्य वाया जाते. जमवलेले धन पण संपते. थोडक्यात सुरुवातीला गोड व नंतर मात्र विषवत ते राजस सुख होय. या वाटयाला आपण जाऊ नये, असे माऊली सुचवतात.

आणि अपेयाचेनि पाने | अखाद्याचेनि भोजने |
स्वैरस्त्रीसंनिधाने | होय जे सुख || ८०६ ||
जे आलस्यावरी पोखिजे | निद्रेमाजी जे देखिजे |
जयाच्या आद्यंती भुलिजे | आपुली वाट || ८०८ ||
ते गा सुख पार्था | तामस जाण सर्वथा |
हे बहु न सांगोचि जे कथा | असंभाव्य हे || ८०९ ||

आता तामस सुखाचे वर्णन श्री ज्ञानेश्वर महाराज करतात. जे पिऊ नये ते पिल्याने, जे खाऊ नये ते खाल्ल्याने किंवा स्वैराचारिणी स्त्रीच्या संगतीने जे सुख होते त्याचा शेवट हमखास वाईटच! तामस सुख आळसात वाढते, झोपेत वाटते झोपावेच, त्यात आपले कल्याण कोठून

शोधणार? माऊली म्हणतात, हे सुख तामस होय. ते म्हणतात, मी याचे जास्त वर्णन करीत नाही कारण सुख शब्द तरी का वापरायचा?

का पुटी वाळला उंसी | गोडी जैसी |
तैसा विषमाही जीवा | लागी उजुकारी बरवा |
लागी उजुकारी बरवा | ते आर्जव गा | ८४३ ||

उसाची कांडी वाकडी असली तरी रस गोड, त्याप्रमाणे आपणास त्रास देणाऱ्यापाशीही सरळपणाने वागणे म्हणजे आर्जव.

पै राजमुद्रा आधिलीया | प्रजा भजे भलतया |
तेवी शास्त्र स्वीकारिलिया | मार्गमात्राते |
आदरे जे का मानणे | ते आस्तिक्य मी म्हणे || ८५० ||

राज्यामध्ये ज्याच्याजवळ राजमुद्रा धारण केलेली असते, त्याप्रमाणे शास्त्रविहित मार्गाने अनुसारितो ते अस्तिक्य होय.

क्षत्रियांच्या शौर्याचे उदाहरण देताना माऊलींनी सूर्य व सिंहाची उपमा दिली आहे.

परी भानु हा तेजे | नापेक्षी जेवी विरजे |
कां सिंह न पाहिजे | जावळिया ||
ऐसा स्वयंभु जो जीवे लाठू |

सावायेवीण उभ्दटू | ते शोर्य गा || ८५७ ||

सूर्य सर्व विश्वाला प्रकाश देतो. त्याला कोणाच्याही मदतीची गरज भासत नाही. सिंहाला दुसऱ्याशी सामना करताना कोणाची सोबत लागत नाही, त्याप्रमाणे स्वतः बलवान असल्याने त्याला दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा न करता तो शूरपणा दाखवतो. त्याला 'शौर्य' म्हणतात.

आणि पाणी हो का भलतेतुके |

परी ते जिणौनि पद्म फांके |

का आकाश उंचिया जिंके | आवडे तयाते | ८६२ ||

प्रज्ञा फळ तया अर्था | वेझ देणे ते |

ते दक्षत्व गा चोख || ८६४ ||

दक्षता हा क्षत्रियांचा गुण आहे. त्यासाठी कमळ व पाण्याचे उदाहरण दिले आहे. पाणी खोल असले तरी कमळ त्याला खाली ठेवून फुलतेच. एखादा पदार्थ कितीही उंच ठेवला तरी आकाश उंच राहणार; त्याचप्रमाणे कितीही प्रसंग आले तरी बुद्धीमध्ये उत्पन्न होणारे विकारांना ज्या गुणांनी जिंकतो तो दक्षता गुण होय.

जुंझ अलौकिक | कर्माचे आहे जिंतवणी |

आदित्याची झाडे | सदा सन्मुख सूर्याकडे |

तेवी समोर शत्रुपुढे | होणे जे कां || ८६५ ||

झुंजारता म्हणजे काय? तर सूर्यकमल नेहमी सूर्याकडे तोंड करते, त्याप्रमाणे तो नेहमी शत्रूच्या समोर झुंज देतो.

विहित कर्माबद्दल माऊलींनी खूप छान प्रकारे समजावून सांगितले आहे. आपल्या वाटयाला आलेले विहित कर्म केल्याने आत्मानंद मिळतो. साध्या साध्या उदाहरणातून किती सहजपणे समजावले ते खालील ओवीत पाहू.

आणि आपुली माये | कुब्ज जरी आहे |
तरी जीये ते नोहे | स्नेह कुऱ्हे की || ९२७ ||
येरी जिया पराविया | रंभेहुनि बरविया |
तिया काय कराविया | बाळके तेणे | ९२८ ||
आणि पाणियाहूनि बहुवे | तुपी गुण कीर आहे |
परी मीना काय होय | असणे तेथे | ९२९ ||
म्हणौनि जे विहित जया जेणे | फिटे संसाराचे धरणे |
क्रिया कठोर तऱ्ही तेणे | तेचि करवी || ९३१ ||

समजा आपली आई कुबडी असली म्हणजे शरिराने वाकडी असली म्हणून तिचे प्रेम वाकडे असते का? आईपेक्षा इतर स्त्रिया खूप

रूपवान असल्या तरी बालकाला त्यांचा काय उपयोग? पाण्यापेक्षा तुपात जास्त गुणकारी गुण असले तरी मासे त्या तुपात काय करणार? म्हणून शास्त्राने सांगितलेले विहित कर्म करावे. त्यात कष्ट असले तरी त्याचे आचरण सोडू नये, हे आग्रहाने माऊली प्रतिपादन करतात.

नैष्कर्म्यसिद्धी प्राप्तीसाठी चित्ताचे संतुलन झाले की, जी अवस्था होते त्याबद्दल माऊली काही उदाहरणे देतात.

पै परीपाकाचिये वेळे | फळ देठे नां देठू फळे |
न धरे तैसे स्नेह खुळे | सर्वत्र होय || ९५७ ||

पिकलेल्या फळाची अवस्था कशी होते, देठ त्याला किंवा फळ देठाला टिकू शकत नाही. ज्याचे चित्त असक्त झाले त्याचे वस्तूंवरचे असे प्रेम आपोआप कमी होते, हा या उदाहरणाचा अर्थ आहे. यानंतरची ओवी सदगुरुंची भेट साम्यदशा झाल्यावर होते, हे सांगताना छान रूपक दिले आहे.

धरवणी वेचे सरे | तैसे भोग प्राचीन पुरे |
नवे तंव नुपकरे | कांहिचि करू || ९६५ ||
ऐसी कर्म साम्यदशा | होय तेथ विरेशा |
मग श्रीगुरू आपैसा | भेटेचि गा || ९६६ ||

एखाद्या ठिकाणी पाणी साचलेले असते ते वापरून झाले की, संपते त्याप्रमाणे संचित कर्म व देहभोगाने प्रारब्धकर्म संपते, क्रियमाण कर्म तो आता करत नाही, म्हणजे भोग व कर्म याची साम्यदशा किंवा अवस्था त्या सत्पुरुषाला प्राप्त होते. या अवस्थेत त्याला सदगुरु भेटतात. नैष्कर्म्यसिद्धी कशाला म्हणतात? त्यासाठी माऊली आरसा व समुद्रतरंग ही दोन उदाहरणे देतात.

मुखा भासेसी आरिसा | परौता नोलिया विरेशा |
पाहातेपणेवीण जैसा | पाहता ठाके ||
तैसे नेणणे जे गेले | तेणे जाणणेही नेले |
मग निष्क्रिय उरले | चिन्मात्रयी || ९७७ ||
तेथ स्वभाव धनंजया | नाही कोणीचि क्रिया |
म्हणौनि प्रवादु तया | नैष्कर्म्यु ऐसा || ९७८ ||
ते आपुले आपणपे | असे तेचि तेचि होऊनि हारपे |
तरंगु का वायुलोपे | समुद्रु जैसा |
देऊळाचिया कामा कळसु | उपरम गंगेसी सिंधु प्रवेशु ||
का सुवर्णशुद्धी कसु | सोळावा जैसा || ९८१ ||

आपण आपले मुख आरशात पाहतो ते आपलेच प्रतिबिंब असते, **आरसा दूर केला तर काय होते?** पाहण्याची क्रिया राहत नाही. पण पाहणारा राहतो. तसे अज्ञान तर जातेच व ते जाणण्याचे जाणणेपणही घेऊन जाते. मग जे उरते ते त्याची अवस्था असंगज्ञान होय. यावेळी क्रियाच राहत नाही. कर्माचा संभव नाहीसा होतो. त्यालाच **नैष्कर्म्यसिद्धी** म्हणतात. वारा शांत झाला तर समुद्राचे तरंग नाहीसे होतात. लाटा समुद्रात लय पावतात. कळस लावला म्हणजे देऊळाचे काम पूर्ण झाले असे आपण म्हणतो. गंगा सागराला मिळाली की, ती गंगा राहत नाही. सोन्याचा सोळावा कस लागला, त्याच्या शुद्धतेची ती परिसीमा असते. स्वरूपस्थिती व आत्मसिद्धी या सगळया वरील उदाहरणांवरून अज्ञानाने ज्ञानही स्वरूपपस्थितीला लय पावून आत्मसिद्धीप्रत अवस्था येते. ब्रह्मस्थितीची प्राप्ती आपोआप होत नाही. त्याला वेळ लागतो. त्यासाठी सर्व इच्छाच उरत नाहीत. मग मोक्षाकडे वाटचाल होते. त्यासाठी माऊली उदाहरणाने समजावून सांगतात.

परी वोखद घेतखेवो | काय लाभे आपुला ठावो?
कां उदयजातांचि दिवो | मध्यान्ह होये? || ९९८ ||
सुक्षेत्री आणि वोलटे | बीजही पेरिले गोमटे |
तरी आलोट फळ भेटे | परी वेळे की गां || ९९९ ||

जोडला मार्ग प्रांजळु | मिनला सुसंगाचाही मेळु |
तरी पाविजे वाचुनि वेळु | लागेचि का || १००० ||
तैसा वैराग्यलाभु जाला | वरी सद्गुरूही भेटला |
जीवी अंकुर फुटला | विवेकाचा || १००१ ||
तेणे ब्रह्म एक आथी | येर आघवीचि भ्रांती |
हेही कीर प्रतीती | गांढ केली |
परी तेचि जे परब्रह्म | सर्वात्मक सर्वोत्तम |
मोक्षाचेही काम | सरे येथ || १००३ ||

माऊलींनी हे ब्रह्मपद मिळताना वेळ कसा लागतो, यासाठी आपल्याला माहिती असलेली उदाहरणे दिली आहेत. औषध घेतल्याबरोबर प्रकृती बरी होते का? वेळ लागतोच. सूर्य उगवला की, लगेच दुपार होते का? माध्यान्हकाळ यायला वेळ लागतोच! जमिनीची उत्तम मशागत केली व चांगल्या प्रतीचे बियाणे पेरले तर उत्तम व भरघोस पीक येईल. पण त्याला वेळ तर लागेलच ना? आपण प्रवासाला सरळ रस्त्याने निघालो, आपल्याला सोबत पण मिळाली पण प्रवासाचे अंतर कापायला वेळ लागेलच ना? शहरात काही आपण पोहोचणार नाही. त्याप्रमाणे वैराग्याची प्राप्ती झाली त्यात सदगुरुंची भेट झाली, नित्य-अनित्य विवेक जागृत झाला, ब्रह्म हेच सर्वश्रेष्ठ आहे. बाकी सगळे

भासमान आहे, हेही जाणले. तरीही या सर्वात्मक व सर्वोत्तम ब्रह्म प्राप्तीनंतर मोक्षाचीही इच्छा उरत नाही. या सगळ्या क्रिया होताना वेळ द्यावा लागतो.

सांडूनि कुळे दोन्ही | प्रियासी अनुसरे कामिनी |
द्वंद्वत्यागे स्वचिंतनी | पडली तैसी || १०१३ ||

पतिव्रता स्त्री जशी माहेर-सासरची दोन्ही कुळे त्याचा अभिमान सोडते व पतीलाच दैवत मानते व त्याप्रमाणे वागते. अगदी याचप्रमाणे द्वैताचा त्याग करून बुद्धी आत्मचिंतनात मग्न होते.

आणि परपुरुषे कामिली | कुलवधू आंग न घाली |
निद्रालस्या न मोकली | आसन तैसे || १०२७ ||

कुलवान स्त्री परपुरुषाने इच्छा केली, तरी त्याला शरीराचा उपभोग घेऊ देत नाही. त्याप्रमाणे निद्रा व आळस येईल असा आहारसुद्धा आत्मस्वरूपी लीन झालेला महापुरुष करत नाही.

पहावे दिस तंववरी | दिठीते न संडी दीप जरी |
तरी के आहे अवसरी | देखावया || १०४४ ||
तैसे मोक्षी प्रवर्तलया | वृत्ती ब्रह्मी जाय लया |
तव वैराग्य आथी तया | भंगु कैचा || १०४५ ||

आपण एखादी वस्तू शोधतो जवळ दिवा आहे व डोळयाने वस्तू शोधण्याचे चालू आहे मग वस्तू दिसण्यास वेळ थोडाच लागणार आहे? याप्रमाणे जर मोक्षप्राप्तीच्या साधनेला वैराग्याची साथ असेल तर मग मोक्ष मिळायला अडचण कसली?

मुळाचे तोडणे जैसे | होय का शाखोद्देशे |
कामु नाशलेनि नाशे | तैसा क्रोधु || १०६० ||

झाडाचे मूळ तोडले तर फांद्या तोडाव्या लागत नाही, त्याही तुटतातच. त्याची वाढ कुठून होणार? त्याप्रमाणे **कामच** नाहीसा झाला, तोच उत्पन्न झाला नाही तर मग क्रोध तरी कुठून येणार?

घडतां महोदधीसी | गंगा वेगु सांडी जैसी कां कामिनी
कांतापासी |
स्थिर होय | नाना फळतिये वेळे | केळीची वाढी मांटुळे |
कां गावापुढे वळे |मार्गु जैसा || १०८२ ||
तैसा आत्मसाक्षात्कारू | होईल देखोनि गोचरू |
ऐसा साधनहतियेरू | हळूचि ठेवी || १०८३ ||

गंगा समुद्राला मिळाली की, तिचा वेग आपोआप थांबतो. पत्नी आपल्या पतिपाशी स्थिर होते; केळी पक्व झाली की, वाढ आपोआप खुंटते; आपल्याला ज्या गावी जायचे ते आले की, आपले चालणे थांबते. या न्यायाप्रमाणे आत्मसाक्षात्काराची वेळ जवळ आली की, इतर साधनांची मार्गे हव्यास उपक्रम आपोआप क्षीण होतात, किंवा कमी होतात. म्हणजे इतर साधनांची गरज संपते किंवा त्याची आवश्यकता साधकांना भासतच नाही. साधने म्हणजे जप-तप-यज्ञ-अनुष्ठान कुठपर्यंत? तर आपल्याला स्वस्वरूपाची प्रचिती येईपर्यंतच!

पाटीयेवरील अक्षरे | जैसी पुसता येती करे |
तैसी हारपती भेदांतरे | तयांचिये दृष्टी || १०९९ ||

आपण शाळेत पूर्वी पाटी वापरत होतो, त्यावर पेन्सिलीने लिहीत होतो. आपण ते लिहिलेले हाताने पुसत होतो; त्याप्रमाणे त्याच्या दृष्टीने सर्व वस्तू वस्तुतील भेद आपोआप नाहिसा होतो.

तरंग सर्वांगी तोय चुंबी | प्रभासर्वत्र विलसे बिंबी |
नाना अवकाश नभी | लुंठतु जैसा |
तैसा रूप होऊनि माझे | माते क्रियाविण तो भजे |
अलंकारू का सहजे | सोनयाते जेवी | ११४९ ||
का चंदनाची द्रुती जैसी चंदनी भजे अपैसी |

का अकृत्रिम शशी | चंद्रिका ते |

तऱ्ही अद्वैती भक्ति आहे | हे अनुभवचि जोगे नव्हे |

बोला ऐसे || ११५१ ||

लाट जशी सर्व बाजूंनी पाण्याचा उपभोग घेते, प्रभा जशी बिंबाशी एकरूप होते, अवकाशातील पोकळी जशी आकाशाशी जणू लोळण घेते, त्याप्रमाणे असा साधक जो मदरूप झाला, तो कोणतीही क्रिया न करता त्याला माझे भजन घडत असते. सोन्याचा अलंकार जणू सोन्याचे भजन करतो, म्हणजे अलंकाराचे सोन्याशी अनन्यत्व असते. चंदनाचा सुगंध चंदनाच्या झाडाशी एकरूप असतो. चंद्राची प्रभा ही चंद्राशी एकरूप असते, त्याचप्रमाणे अद्वैतात क्रिया करणे अवघड जाते, तरीही अद्वैतात भक्ती घडते. ही गोष्ट अनुभवाची आहे, बोलण्याची नाही. माऊली अनेक प्रकारे अद्वैत समजावून सांगतात.

पावो आपणपया वोळघे? केवी वन्हि आपणया लागे |?

आपणपा पाणी रिघे | स्नाना कैसे?

म्हणौनि सर्व मी जालेपणे | ठेले तया येणे जाणे |

तेचि गा यात्रा करणे | अद्वया मज || ११६८ ||

पहा, किती अलंकृत भाषा वापरून माऊली सांगतात. पायानेच पायावर चढता येईल का? नाही. अग्नीनेच अग्नीला पोळता येईल का?

पाण्यानेच स्नानासाठी जाणे या गोष्टी घडणे कालत्रयी शक्य नाही. म्हणून लौकिक अर्थाने जो मत्स्वरूप झालाय, त्याचे येणे-जाणे संपले. त्याला माझ्या स्वरूपाची यात्रा घडली असेच समजायला हवे ना!

जेव्हा कापुर जळो सरे | तयाचि नाम अग्नि पुरे |
मग उभायतातीत उरे | आकाश जेवी | १२११ |
कां धाडलिया एका एकु | वाढे तो शून्य विशेखु|
तैसा आहे नाहीचा शेखु | मिचि मग आथि || १२१२ ||

कापूर पूर्णपणे जळाला म्हणजे अग्नीही संपलाच. तेथे ना कापूर राहतो ना अग्नि. पोकळी म्हणजे आकाश उरते. माऊली गणितात समजावून सांगतात. मजा आहे. एकातून एक वजा केले तर शून्य उरते. तसे आहे, नाही हा व्यवहारच संपल्यावर जे शिल्लक राहते ते शेष म्हणजे मीच! ब्रह्मतत्त्व हेच होय!

अगा वसुधेच्या पोटी | निधान सिद्ध किरीटी |
वन्हि सिद्ध काष्ठी | वोहा दूध | परी लाभे ते असते |
तया कीजे उपायाते | येर सिद्धचि तैसा येथे | उपायो मी ||
वारा आभाळचि फेडी | वांचूनि सूर्याते न घडी |
का हातु बाबुळी धाडी | तोय न करी || १२३१ ||

तैसा आत्मदर्शनी आडळु | असे अविद्येचा जो मळु |
तो शास्त्र नाशी येरू निर्मळु | मी प्रकाशे स्वये || १२३२ ||

अहो, पृथ्वीच्या पोटात अनंत रत्नांसारखा ठेवा आहे. लाकडात अग्नी आहे. (वोहा = कासे) कासेत दूध आहे. हे सगळे नित्य सिद्ध आहे. परंतु त्या सिद्धगोष्टींची प्राप्ती होण्यासाठी प्रयत्न तर करावेच लागतील, हाच न्याय भगवान सांगतात. माझ्या प्राप्तीसाठीही लागू पडतो. उपाय यालाही करावेच लागतील. वारा काय करतो? सूर्य दिसत नसेल तर ढग फक्त दूर करतो. सूर्य आणतो का? नाही. सूर्य आहेच. पाण्यावर साचलेले शेवाळ हाताने दूर केले की, पाणी दिसते. ते आधीही असतेच की. या उदाहरणाप्रमाणे आत्मदर्शनाला कशाचा प्रतिबंध होता? तर अज्ञानाचा. ते दूर झाले की, मी असंग स्वयंप्रकाशी नित्य सिद्ध आहेच! त्याचे दर्शन घडते. पण अज्ञान दूर व्हायलाच उपाय करावे लागतात. आपण त्यामध्येच कमी पडतो.

भानूभूषिता प्राचिया | सतेजा दिशा आघविया |
तैसी शास्त्रेश्वरा गीता या | सनाथे शास्त्रे || १२३५ ||

गीतेचे महत्त्व अध्यात्मशास्त्रात अनन्यसाधारण आहे. सूर्योदय झाल्यावर पूर्व दिशेला उजेड पडतो, हे खरे! पण मग सर्वच दिशांना तो प्रकाश सतेज करतोच ना! त्याप्रमाणे अध्यात्मशास्त्रांचा राजा हे

गीताशास्त्र आहे. तिच्यावर इतर शास्त्रांचे सनाथपण किंवा सौभाग्यपण अवलंबून आहे.

का बावने आणि घुरे | हा निवाडा तवचि सरे |
जंव न घेपती वैश्वानरे | कवळूनि दोन्ही || १२५३ ||
नाना पांचिके आणि सोळे | हे सोनया तवचि आले |
जंव परिसु आंगमेळे | एकवटीना || १२५४ ||
म्हणौनि माझिया भेटी | तयाची सर्व कर्मे किरीटी |
जाऊनि बैसे तो पाटी | सायुज्याच्या || १२५७ ||

(बावन = चंदन.) चंदनाचे लाकूड व इतर रायवळ झाडांचे लाकूड हा भेद कुठपर्यंत? जोपर्यंत ती अग्नीत टाकत नाही तोपर्यंत. सोन्याचा कस पाच आहे का १६ आहे हेसुद्धा जोपर्यंत परिसाचा स्पर्श होत नाही तोपर्यंत! एकदा तो झाला की, हिणकस धातू पण सोनेच बनते. म्हणून भगवान अर्जुनाला सांगतात, बाबा रे, एकदा माझ्या स्वरूपाची भेट झाली की, सगळी कर्मे भस्म होतात व तो सायुज्यपदावर जाऊन विराजमान होतो.

सूर्याचेनि सावाये | डोळा सावाईला होये |
तै आंधाराचा आहे | पाडु तया? || १२७१ ||

तैसा माझेनि प्रसादे | जीवकणु जयाचा उपमर्दे |

तो संसाराचेनि बाधे | बागुले केवी? || १२७२ ||

लख्ख सूर्यप्रकाश पडलाय, मग डोळे अंधाराला कसे घाबरतील? त्याप्रमाणे माझ्या प्रसादामुळे त्याची जीवदशा संपली. त्याने संसाररूपी मिथ्या गोष्टीची काळजी का करावी?

भगवान अर्जुनाला तुझा क्षात्रधर्म तुला युद्ध करायला प्रवृत्त करतील, हे सांगतात. याच्या पुष्टीसाठी माऊली काही उदाहरणे देतात. पहा खालच्या ओवीमध्ये!

पै पूर्वे वाहता पाणी | पाव्हिजे पश्चिमेचे वाहणी ||

तरी आग्रहोचि उरे ते आणी | आपुलिया लेखा | १२८६ |

का साळीचा कणु म्हणे | मी नुगवे साळीपणे ||

तरी आहे आन करणे | स्वभावासी || १२८७ ||

तैसा क्षात्रसंस्कारसिद्धा | प्रकृती घडिलासी प्रबुद्धा |

आता नुठी म्हणसी हा धांदा | परी उठाविजसीचि तूं||

१२८८ ||

पूर्व दिशेकडे पाण्याचा ओघ/प्रवाह चालू आहे. एखादा पोहणारा म्हटला, मी पश्चिमेकडे तोंड करून पोहतो, तर त्याचा आग्रह फुकट

जाईल. पाणी त्याला पूर्वेकडे ओढणार. साळीचे बी पेरत असताना त्या बियांनी ठरवले, साळी म्हणून उगवणार नाही, असे शक्य होईल का? नाही. म्हणून अर्जुना, तू बुद्धिमंत आहेस, जन्मत: सिद्ध क्षत्रिय आहेस. प्रकृतीने तुझा स्वभावधर्म निश्चित केला आहे. मग तू कितीही म्हटलं की, मी युद्ध करणार नाही, तरीही हे बोलणे व्यर्थ आहे. तुझ्या प्रकृती स्वभावाप्रमाणे तुला युद्धाला तयार व्हावेच लागेल.

तरी बांधोनि हात पाये | जो रथी घातला होये |
तो न चले तरी जाये | दिगंता जेवी || १२९३ ||
तैसा तू आपुलियाकडुनि | मी काहीच न करी म्हणौनि |
ठासी परी भरवसेनि | तूंचि करेसी || १२९४ ||

माऊलींनी **रथात** बसलेल्या माणसाची छान उपमा दिली आहे. त्या वेळी रथाचा वापर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाताना होत असावा. माणसाचे हात-पाय बांधून जरी त्याला रथात बसवला, तर तो काही न करता रथाबरोबर योग्य ठिकाणी पोहोचेलच. त्याप्रमाणे हे अर्जुना, तुझा निश्चय मी काही करणार नाही असा असला; तरी खात्रीने तू क्षात्र धर्माचेच आचरण करणार!

सूत सुते गुंतले | तृणेचि बांधले | कां आत्मबिंबा घेतले |
बाळके जळी || १३०६ ||

तयापरी देहाकारे | आपणपेचि दुसरे |
देखोनिजीव आविष्कारे | आत्मबुद्धि ||
भ्रामकांचेनि संगे | जैसे लोहे वेढा रिगे |
तैसी ईश्वरसत्तायोगे | चेष्टती भूते || १३३१ ||

सुताची गुंडी जशी सुतांनी गुंडाळलेली असते अथवा गवताची पेंडी जशी गवताच्याच आळयाने बांधतात. पाण्यातील आपल्या प्रतिबिंबाला पाहून मूल (बालक) ते आपणच आहोत, असे समजते. अगदी या रुपकाप्रमाणे देह हा आपणच आहोत, असा भ्रम मानून जीव तेथे आत्मबुद्धिने प्रकट होतो. सगळीकडे ईश्वरसत्ता कशी आहे, यासाठी साधे लोहचुंबक व लोखंड याचे उदाहरण देतात. लोहचुंबकाच्या संगतीने लोखंडाला जशी गती मिळते तशी ईश्वरीय सत्तेने प्राणीमात्र व्यवहार करतात.

भगवान अर्जुनाला सर्वस्व देऊन उपदेश करतात. अत्यंत प्रेमाचे लडिवाळ बोलणे आहे हे! किती भावनावश होऊन भगवान पार्थाशी बोलतात. पहा, यातील भाव ओळखा व त्या आनंदाची अनुभूती घ्या.

जैसी भुलली वोरसे | माया बोले बाळा दोषे |
प्रीतिही परी तैसे | न करूचि हो || १३२८ ||
येथ आकाश आणि गाळिजे | अमृताही सालि फेडिजे |

क्या दिव्याकरवी करविजे | दिव्य जैसे |
जयाचेनि अंगप्रकाशे | पाताळीचा परमाणु दिसे |
तया सूर्याही कां जैसे | अंजन सूदले |
तैसे सर्वज्ञेही मिया | सर्वही निर्धारुनिया |
निके होय ते धनंजया | सांगितले तुज || १३३१ ||

प्रेमाने वेडी झालेली आई तिच्या बाळाला उद्देशून लाडिकपणाने संबोधते, हे आपल्याला माहीत आहे. बाळा, बबडया, चिमण्या आमचेही तुझ्यावर आई व बाळासारखेच प्रेम आहे बरं! फक्त आम्ही तसे लडिवाळपणे तुला उद्देशून बोलत नाही, एवढेच!

आकाश जसे गाळून घ्यावे, अमृताची साल काढावी, प्रतिज्ञेनेच जशी प्रतिज्ञा करावी, ज्या सूर्याचे तेज इतके अलौकिक आहे की, पाताळातील परमाणूही दिसावेत. त्याच सूर्याच्या डोळयात जणू अंजन घालावे, त्याप्रमाणे अर्जुना, सर्वज्ञ असलेला मी, जे चांगल्यातले चांगले आहे ते तुला सांगितले बरं का!

माऊलीची साहित्य प्रतिभा उच्चकोटीची आहे. भगवान सांगतात, पण अर्जुन निवांत आहे, हे जणू माऊली पाहतात व मग त्यांच्या मनात आले की अर्जुन असे काय करतो? परत थोडक्यात

सांगावे का? त्यासाठी माऊली अगदी रोजच्या व्यवहारातील उदाहरण देतात.

वाढतया पुढे भुकेला | उपरोधे म्हणे मी धाला |
तै तोचि पीडे आपुला | आणि दोषुही तया |
तैसा सर्वज्ञु श्रीगुरू | भेटलिया आत्मनिर्धारू |
न पुसिजे जै आभारू | धरूनिया || १३३५ ||

आपण पंगतीला बसलोय व वाढणारा विचारतो वाढू का? आपण संकोचाने भूक असूनही म्हणावे नको, पुरे. तशातला हा प्रकार आहे. त्रास कोणाला? ज्याला भूक लागलेली असते त्यालाच. दोष कोणाचा? त्याचाच. सर्वज्ञ श्रीगुरूंची गाठ पडली व आत्मनिश्चयाविषयी संकोच धरून मौन पाळले, काहीच प्रश्न केला नाही तर कसे चालेल?

आरिसाचिया देखिलया | गोमटे कीजे धनंजया |
ते तया नोहे आपणया | लागी जैसे |
तैसे पार्था तुझेनी मिषे | मी बोले आपणयचि उद्देशे |
माझ्या तुझ्या ठाई असे | मी तूपण गा? || १३४८ ||

भगवान म्हणतात, अर्जुना, आरशात चांगले प्रतिबिंब दिसावे म्हणून आरसा स्वच्छ करतो. स्वच्छ करतो ते आरशासाठी का? तर

आपणच त्यात दिसावी यासाठीच ना! मी बोलतोय स्वतःसाठीच. तुझे फक्त निमित्त आणि शेवटी आत्यंतिक लडिवाळपणे भगवान म्हणतात. तुझ्यात आणि माझ्यात भेद थोडाच आहे?

जैसी जळीची प्रतिभा | जळनाशी बिंबा |
येता गाभागोभा | काही आहे? || १३६५ ||
पै पवना अंबरा | कां कल्लोळु सागरा |
मिळता आडवारा | कोणाचा गा? || १३६६ ||
म्हणौनि तूं आणि आम्ही | हे दिसताहे देहधर्मी |
मग ययाच्या विरामी | मीचि होसी || १३६७ ||

पाण्यात प्रतिबिंब पडते. पाणी आटून गेल्यावर त्या प्रतिबिंबाला आपल्याशी ऐक्य व्हायला कोणाचा अडसर आहे का? वारा आकाशात सामावून घेण्यास किंवा लाटा समुद्रात जाण्यास कोण घडवते का? त्याप्रमाणे अर्जुना, तुझा-माझा भेद दोन शरिरामधील भासमान उपाधीमध्ये आहे. तो भ्रम काढला तर आपण एकरूप आहोत, हे तुला आताही कळेल.

अगा प्राकृताही राया | आंगी पडे जे धनंजया | ते दासिरूहि
की तया |

समान होय | मा मी विश्वेश्वरू भेटे | आणि जीवग्रंथी न सुटे |
हे बोल नको वोखटे | कानी लाऊ || १४०४ ||

अगदी काकुळतीला येऊन पण प्रेमाने अर्जुनाला भगवान विचारतात. माझी भेट होऊन तुझी जीवदशा कायम राहिली हे मी काही एक तुझे ऐकायला तयारच नाही. कारण शक्यच नाही हे एखाद्या राजाने सामान्य दासीचा स्वीकार केला तर ती राणी होतेच ना! मग मी तर या पूर्ण विश्वाचा स्वामी व माझी भेट होऊनही तुला अजूनही जीवाच्या दशा याची सुटका होत नाही, हे अशक्य आहे.

भगवान अर्जुनाला आलिंगन देतात हा प्रसंग माऊली वर्णन करतात. हा प्रकार कसा आहे पहा,

दीपे दीपु लाविला | तैसा परिष्वंगु तो जाला |
द्वैत न मोडिता केला | आपणपे पार्थु || १४२२ ||

एका दिव्याने दुसरा दिवा लावावा असे हे अलिंगन आहे, हे देव व भक्त या द्वैताला धक्का न लावता पार्थाला आत्मरूप केले. या ओवीचे चांगले मनन करा. द्वैतात राहून अद्वैत साधण्याचा हा अतिशय अलौकिक प्रकार आहे. फक्त भगवानच हे करू जाणे.

यानंतर माऊली १ ते १७ अध्यायामधील विशद विषय थोडक्यात सांगतात. गीता ही वेदांची भाषा बोलते. पण तरीही ती त्यापेक्षा श्रेष्ठ आहे. यासाठीच्या ओव्या मुद्दाम खाली देत आहे.

वेदु संपन्नु होय ठाई | परी कृपणु ऐसा आनु नाही |
जे कानी लागला तिही | वर्णांच्याची || १४५७ ||
येरा भवव्यथा ठेलिया | स्त्रीशूद्रादिका प्राणियां |
अनवसरू मांडूनिया | राहिला आहे || १४५२ ||
तरी मज पाहता ते मागील उणे |
फेडावया गीतापणे | वेदु वेठला भलतेणे |
सेव्य होआवया || १४४९ ||

वेद साहित्यांमध्ये संपन्न मान्य. पण त्याच्याइतका कृपण/कंजूष ही कोणी नाही. कंजूष का? तर त्याने आपला उपभोग घेण्याचा अधिकार फक्त तीनच वर्णांना दिला म्हणून. या भवसागरात खरंच जे त्रासलेत त्या स्त्री व शूद्र प्राण्यांचे काय? त्यांना हा अधिकार वेदांनी का नाही दिला? म्हणून महाराजांना असे वाटते की, जणू वेदच भगवतगीतेच्या रूपात प्रकट झाला व गीता सर्वांच्या उद्धारास कारणीभूत ठरली, त्यासाठीची ओवी अप्रतिम आहे. सर्वांच्या परिचयाची आहे. पहा,

परी वत्साचेनि वोरसे | दुभते होय घरोद्देशे |
जाले पांडवाचेनि मिषे | जगदुद्धरण || १४६७ ||

गाय वासराला दूध पाजते. पण तिच्या दूधाने घरातील सर्वांनाच दुधाचा लाभ होतोच ना! त्याप्रमाणे अर्जुनाचे निमित्त करून भगवान गीताशास्त्राचा उपदेश करतात. त्यात जगाचाही उद्धार झालाच ना! किती सहज सुंदर उपमा आहे!

गाय धड जोडे गोमटी | तै तैचि पिवो ये किरीटी |
जै जाणिजे हातवटी | सांजवणीची || १४८३ ||
तैसा श्रीगुरू प्रसन्नु होये | शिष्य विद्याही कीर लाहे |
परी ते फळे संप्रदाये | उपासिलिया || १४८४ ||

तुम्हाला चांगली दुभती गाय दिली पण दूध कसे काढायचे, हेच माहित नसेल तर तिचा तुम्हाला देऊन काय उपयोग? त्याप्रमाणे सदगुरु प्रसन्न होऊन विद्या देतात. पण संप्रदायात सांगितलेली उपासना घडली नाही तर विद्येची प्राप्ती कशी होणार?

सागरू गंभीरू होये | हे कोण ना म्हणत आहे |
परी वृष्टी वाया जाये | जाली तेथ || १४९२ ||
धालिया दिव्यान्न सुवावे | मग जे वाया धाडावे |

ते आर्ती का न करावे | उदारपण? || १४९३ ||

म्हणौनि योग्य भलतैसे | होतु परी चाड नसै |

तरी झणे वानिवसे | देसी हे तया || १६९४ ||

ज्याला श्रवणाची आवड नाही त्याला गीता सांगून काय उपयोग? असे सांगणे वेळ वाया घालवणे आहे. त्यासाठी श्री ज्ञानेश्वर महाराजांनी दोन दाखले दिले आहेत. समुद्र गंभीर-खोल आहे. याला कोणी नाही म्हणेल का? तर नाही. तो गंभीरच आहे. पण त्यावर पाऊस पडला तर त्याचा काय उपयोग? तो वायाच गेला असे वाटते.

पोट भरलेले आहे व त्याला सुग्रास उत्तम तयार केलेले जेवण पुन्हा पुन्हा वाढण्याचा काय उपयोग? ते अन्नच वाया जाईल. त्यापेक्षा जो भुकेला आहे त्याला ते वाढावे; म्हणजे अन्न सार्थकी लागेल. म्हणून गीता ही योग्य माणसाला सांगावी, हेच माऊलींना सुचवावयाचे आहे.

नवपल्लवी रोमांचितु | मंदानिळे कांपवित्तु |

आमोदजळे बोलवितु | फुलांचे डोळे || १५१८ ||

कोकिळा कलरवाचेनि मिषे |

सद्गद बोलावीत जैसे | वसंत का प्रवेशे |

मद्भक्त आरामी || १५१९ ||

गीतेवर भाष्य करून जो दुसऱ्याला गीता सांगतो अशा प्रवचनकारांचे उपमा देऊन माऊलींनी वर्णन केले आहे.

झाडांस नवीन पालवी फुटल्यावर कसे होते, त्याप्रमाणे सांगणाऱ्याच्या अंगावर रोमांच उभे करू शकतो. मंद वारा वाहत असेल तर झाडांची हालचाल कशी होते, त्याप्रमाणे गीता आख्यान सांगताना त्याचे शरीर सुद्धा आनंदाने डोलते. मकरंदाच्या सेवनाने फुले कशी टवटवीत बहरतात; त्याप्रमाणे तो इतका समरस होतो की, त्याचे डोळे सुद्धा आनंदाश्रुंनी भरतात. त्याचा कंठ कोकिळेप्रमाणे मधुर होतो व त्याच कंठातून तो माझ्या नामाचा गजर करतो, असा भक्त म्हणजे भक्तीरूप बागेत प्रवेश करणारा वसंतच शोभतो. आता श्रवणाने काय होते? त्याचे उदाहरण देतात.

अटवियेमाजी जैसा | वन्हि रिघता सहसा |
लांघिता का दिशा | वनौके तिये || १५३१ ||
का उदयाचळकुळी | झळकता अंशुमाळी |
तिमिरे अंतराळी | हारपती ||
तैसा कानाच्या महाद्वारी | गीता गजर जेथ करी |
तेथ सृष्टीचिये आदीवरी | जायचि पाय || १५३३ ||

अरण्यात वणवा पेटल्यावर जंगलातील प्राणी जसे दाही दिशांनी पळत सुटतात, पर्वतगिरीवर सूर्य येताच अंध:कार जसा आकाशातच नाहीसा होतो, अगदी त्याप्रमाणे त्याच्या कानात हेच जणू महाद्वार आहे, गीतेचा घोष चालू होतो त्याची पूर्वीची पापेसुद्धा नष्ट होतात.

गंगा सिंधू सेवूं गेली | पावतांचि समुद्र जाली |
तेवी भक्ता सेल दिधली | निजपदाची || १५७२ ||

अर्जुनाचा मोह नष्ट झाला की नाही, हे भगवान विचारतात, त्यातच माऊलींनी हे उदाहरण दिले आहे. गंगा सागरात मिळाल्यावर सागराशी एकरूप होते त्याप्रमाणे भक्तांना पण आपण या पदाची प्राप्ती करून देता.

अगा पूर्वापार सागर | यया नामासीचि सिनार |
येर आघवे ते नीर | एक जैसे || १५८८ ||
तैसा श्रीकृष्ण पार्थ ऐसे | हे आंगाचिपासी दिसे |
मग संवादी जी नसे | काहीचि भेदु || १५८९ ||

पूर्व समुद्र व पश्चिम समुद्र असा वेगळेपणा आपण म्हणतो. पण शेवटी पाणी ते एकच. भेद नाही. त्याप्रमाणे श्रीकृष्ण व पार्थ असा भेद त्यांच्या देहसंबंधानेच दिसतो. पण संवादात तो भेद अजिबात दिसत नाही.

यानंतर संजयची जी अवस्था झाली, त्याचे अतिशय सुंदर वर्णन माऊलींनी केले आहे. ते दृष्टांत स्वरूप नसले तरी अतिशय हृदयस्पर्शी आहे. त्याचा परामर्श घेतलाच पाहिजे, असे वाटते.

ऐसे म्हणे ना मोटके | तव हिरोनि सात्विके |
आठव नेला नेणो के | संजयपणाचा || १६०२ ||
रोमांच जव फरके | तंव तंव आंग सुरके |
स्तंभ स्वेदाते जिंके | एकला कंपु || १६०३ ||

अर्जुन व श्रीकृष्ण यांचा संवाद चालू आहे व संजय तो सगळे ऐकत आहे. संजयाची अवस्था तर अशी झाली की, अष्टसात्विक भाव प्रकट झाले. त्यांची संजयपणाची स्मृती आपोआप नाहिशी झाली.

अंगावर रोमांच उभे राहिले, शरीर जणू स्तब्ध झाले व घामाचे बिंदू इतके होते की, शरिर त्या कंपानेच व्यापून गेले. शेवटी अष्टसात्विक भाव प्रकट झाल्यावर संजय एकदम जणू कावराबावरा झाला. कृष्ण अर्जुनाच्या संवादाचा संजय जणू चव्हाटा झाला म्हणजे मोठया जागेची व्याप्ती.

ऐसा श्रीकृष्णार्जुन | सवांदसंगमी स्नान |
करूनि देतसे तिळदान | अहंतेचे || १६१९ ||

पहा, किती भावमधुर वर्णन आहे हे! श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या संवादाचा संगम झाला असे भासते व त्या संवादरूपी संगमात संजय स्नान करू लागल्यावर काय होते? त्यात त्याचा अहंकार कुठल्या कुठे गळून पडला? नव्हे! संगमात विरघळून गेला.

यानंतर भगवतगीतेच्या शेवटच्या श्लोकांचे निरूपण माऊली करतात. त्यांच्या प्रतिभेला खूपच बहर आला आहे. उन्मेष आला आहे. उपमेने व अलंकारी भाषेने ते निरूपण नटलेले आहे, आपण त्यातील काही भाग मुद्दाम पाहू.

चंद्र तेथे चंद्रिका | शंभु तेथे अंबिका |
संत तेथे विवेका | असणे की जी || १६३२ ||
रावो तेथे कटक | सौजन्य तेथे सोयरिक |
वन्हि तेथे दाहक | सामर्थ्य की || १६३३ ||
दया तेथे धर्मु | धर्मु तेथे सुखागमु |
सुखी पुरुषोत्तमु | असे जैसा || १६३४ ||
वसंतु तेथे वने | वन तेथे सुमने |
सुमनी पालिंगने | सारंगाची | १६३५ ||

कृष्ण विजयस्वरूपी निजांगे | तो राहिला असे
जेणे भागे |
तै जाये लागवेगे | तेथेचि आहे || १६४० ||

धृतराष्ट्राने संजयला विचारले की, या युद्धात जय कोणाचा होणार? संजयाने अप्रत्यक्षपणे त्याचे उत्तर दिले की, जिथे श्रीकृष्ण भगवान तेथे व भगवान श्रीकृष्णाबरोबर पार्थ असेल तेथेच विजय. या दोन संबंधासाठी माऊलींनी किती उपमा दिल्यात पहा, त्या या दोघांचे एकरूपत्व दर्शवतात.

चंद्र तेथे चांदणे, शंकर तेथे पार्वती, संत आहेत म्हणजे विवेक आलाच, राजा आला की, त्याचे सैन्य वेगळे आणावे लागत नाही. दोघात प्रेम असले की संबंध येणारच! प्रखर अग्नि असेल तर त्या ज्वालाची दाहकता असणारच. दया असेल तिथे धर्माने वागणे आपोआप येते. मग सुखाचा मार्गही सापडतो. या प्राप्तीत पुरुषोत्तम मिळणारच!

वसंत ऋतू आला म्हणजे वनश्रीचे बहरणे आले. त्यात फुले आली, फुलांच्या सहवासासाठी भ्रमरे घिरटया मारणारच. या वरील सर्व संबंधाप्रमाणेच श्रीकृष्ण म्हणजे मूर्तिमंत विजय. मग तो ज्या पक्षाकडून

असेल तिथे विजय निश्चित आहे. यानंतर माऊलींनी अर्जुनाचा सुद्धा गौरव केला आहे. त्यातील २/३ ओव्या मुद्दाम आपण पाहू या,

आणि समुद्राचा मेघु | उपयोगे तयाहूनि चांगु |
तैसा पार्थी आजी लागु | आहे तये || १६४८ ||
कनकत्व दीक्षा गुरु | लोहा परिसु होय कीरु |
परी जगा पोसिता व्यवहारू | तेचि जाणे |
येथ गुरुत्वा येतसे उणे | ऐसे झणे कोण्ही म्हणे |
वन्हि प्रकाश दीपपणे | प्रकाशी आपुला |
तैसा देवाचिया शक्ति | पार्थु देवासीचि बहुती |
परी माने इये स्तुती | गौरव असे || १६५१ ||

माऊलींना पार्थ देवापेक्षा श्रेष्ठ वाटू लागतो व त्यात देवाचाही गौरव आहे असे प्रतिपादन त्यांनी केले आहे त्यासाठी त्यांनी काही उदाहरणे दिली आहेत.

ढग समुद्रापासूनच निर्माण होतात; पण जास्त उपयोगी कोण पडते? तर ढग. या न्यायाने भगवान श्रीकृष्णांनी पार्थाला ज्ञान देऊन संपन्न केल्याने पार्थच मला मोठा वाटू लागला आहे. लोखंडाला सुवर्णत्व देण्याचे सामर्थ्य परिसातच आहे, पण व्यवहारात उपयोगी पडते

ते सोने. परिस नव्हे! या उपमेप्रमाणे गुरुत्वाला कमीपणा येतो असे जर कोणी म्हणत असेल; पण तसे अजिबात नाही. अग्नी हा दिव्याच्या द्वारे प्रकाश देतो त्याला दीपप्रकाश म्हणतो, मग त्यात अग्नीला कमीपणा कसा येईल? या न्यायानेच देवाच्या शक्ती प्रसादाने पार्थ देवापेक्षा मोठा वाटतो. पण पार्थाचे हे मोठेपण म्हणजे देवांचीच स्तुति नाही का? यात देवांचाच गौरव नाही का? यानंतर गीतेच्या श्लोकांचे बहारदार वर्णन माऊलींनी केले आहे. त्यातील काही श्लोकांचा परामर्श येथे घेणे संयुक्तिक ठरेल.

की श्लोकाक्षरद्राक्षलता | मांडव जाली आहे गीता |
संसारपथश्रांता विसंवावया||१६६९ ||

आपण सगळी संसारी माणसे. या संसारात आपण दमलो-भागलो असताना, यातून वाटचाल करताना गीतेच्या श्लोकांनी जणू द्राक्षवेलीच्या मांडव घातला व त्यात आपण थोडा विसावा घेत आहोत. जीवाला शांत करण्याचे सामर्थ्य या श्लोकांत आहे, हेच माऊलींना सुचवावयाचे आहे.

कीं नोहे हे श्लोकश्रेणी | अचिंत्यचित्तचिंतामणी |
की निर्विकल्पा लावणी | कल्पतरुंची || १६७६ ||

तान्ही आणि पारठी | इया कामधेनूते दिठी |
सूनि जैसिया गोठी | कीजतीना || १६७८ ||
तैसे पहिले सरते | श्लोक न म्हणावे गीते |
जुनी नवी पारिजाते | आहाती काही?| ||१६८० ||

हे सगळे श्लोक म्हणजे नुसत्या शब्दांच्या ओळी नाहीत तर अचिंत्य वस्तूची चित्ताला प्राप्त करून देणारा हा चिंतामणीच आहे किंवा निर्विकल्प ब्रह्मप्राप्तीचा कल्पतरु आहे. यानंतर कामधेनूचे वर्णन श्लोकांमध्ये भेद करू नये, या करता केले आहे. कामधेनु ती व्याली की, पारठी (म्हणजे व्यालीली नाही.) असा भेद करुन काय उपयोग? ती तिचा फायदा करून देणारच, त्याप्रमाणे श्लोक सुरुवातीचा की, नंतरचा असा क्रम लावून काय उपयोग? स्वर्गातील पारिजातकाची फुले यांना आपण ती ताजी/जुनी असा भेद करून काय फायदा? थोडक्यात प्रत्येक श्लोक हा आपल्याला तितकाच आनंद देतो.

तैसे गीतेचे हे दुभते | वत्स करूनि पार्थाते |
दुभीनली जगापुरते | श्रीकृष्ण गाय || १६८९ ||

किती सुंदर व भावपूर्ण दाखला दिला आहे. गीता ही गाय आहे पार्थ तिचा वत्स आहे. या श्रीकृष्णरुपी गाईने पार्थाचे निमित्त केले. तिचा

पान्हा पार्थाकरता सोडला व पार्थाला या दुधाचा आस्वाद दिला खरा, पण यात जगाचेही कल्याण झाले, हे दुभते जगालाही पुरून उरले.

थोडक्यात पार्थापुरतेच हे गीता ज्ञान मर्यादित राहिले नाही. संपूर्ण जगाला त्याचा फायदा झाला, हे माऊलींना सुचवावयाचे आहे. यानंतरचे गीतेचे वर्णन व त्याची उदाहरणे ह्याची दखल घेऊनच पुढे जावे लागेल.

स्वातीचेनि पाणिये | न होती जरी मोतिये |
तरी अंगी सुंदरांचिये | का शोभती तिये?
नादु वाद्या न येता | तरी का गोचरु होता |
फुले न होता घेपता | आमोदु केवी |
गोडी न होती पक्वान्नें | तरी का फावती रसने |
दर्पणावीण नयने | नमनु कां दिसे || १७०२ ||
द्रष्टा श्रीगुरूमूर्ती | न रिगता दृश्यापंथी |
तो काह्या उपास्ती | आकळता तो || १७०३ ||
तैसे वस्तु जे असंख्यात | तया संख्या शते सात |
न होती तरी कोणा येथ | फावो शकतो?

स्वाती नक्षत्राचे पाणी मोत्याच्या आकाराला आले नसते तर त्याला स्त्रीच्या सुंदर अंगाला तो मोती कोठून शोभला असता?

नाद (ध्वनि) याला वेगवेगळया वाद्यांचा आश्रय मिळाला नसता तर आपल्याला संगीताचा आनंद कसा प्राप्त झाला असता? सुगंधाने फुलाचे रूप घेतले नसते तर आपण त्या सुगंधाचा आस्वाद कसा घेतला असता? गोडी म्हणजे काय याचा आस्वाद पक्वान्नांच्या रूपानेच आपण घेतो ना! आरसाच नसता तर आपल्याच डोळयाला डोळा कसा दिसला असता? ब्रह्म हे श्री गुरूंचे रूप घेऊन आकारले नसते तर त्या निर्गुण ब्रह्माची उपासना कशी केली असती? ही ब्रह्मस्वरूपाची ओळख करून देणारी गीता जर या सातशे श्लोकांत अवतरली नसती तर आपल्याला म्हणजे या जगाला या ब्रह्माची प्राप्ती कशी शक्य होती? यानंतर माऊलींनी व्यासांच्या गीतेच्या तुलनेत माझी ही ज्ञानेश्वरी कशी तोलामोलाची आहे, ते अतिशय नम्रपणे पण ठामपणे सांगितले आहे. त्यात ज्या उपमा दिल्यात त्यात माऊलींनी अतिशय नम्र भूमिका घेतली आहे. त्यातील नमुन्यादाखल काही ओव्या घेऊ या,

राजहंसाचे चालणे | भूतळी जालिया शाहाणे |
आणिके काय कोणे | चालावेचिना? || १७१३ ||

गीता ही थोर ग्रंथकार महर्षी व्यासांची निर्मिती आहे, पण मग काय त्याच्यासमोर इतर ग्रंथकारांनी रचना केल्या तर चालणार नाही का? राजहंसाचे चालणे श्रेष्ठ मान्य! मग काय इतरांनी या भूमीवर चालायचेच नाही का?

दिवटीच्या आंगी थोरी | तरी ते बहु तेज धरी |
वाती आपुलिया परी | आणीच की ना?
तेवी व्यासादिक महामती | वावरो येती इये ग्रंथी |
मा आम्ही ठाको हे युक्ति | न मिळे किर ||

दिवटी म्हणजे मशाल. तिचा प्रकाश सर्वदूर पडतो मान्य! पण मग वातीचा ती लहान असली तरी प्रकाश पडतोच ना? व्यासांसारख्या महान बुद्धिवंतांनी या ग्रंथाची निर्मिती केली. पण मग वरील दृष्टांत आम्हाला लागू पडत नाही का? आमची अल्पबुद्धी/आत्मशक्तीने आम्ही ग्रंथाचा विस्तार केलाच आहे, हे माऊलींना सांगावयाचे आहे.

म्हणौनि माझे नित्य नवे | श्वासोच्छवासही प्रबंध होआवे |
श्री गुरुकृपा काय नोहे | ज्ञानदेवो म्हणे |
या कारणे मिया | श्री गितार्थ मऱ्हाठिया | केला लोका यया |
दिठीचा विषो |

ऐसे श्री निवृत्तिनाथांचे | गौरव आहे जी साचे |
ग्रंथु नोहे हे कृपेचे | वैभव तिये || १७५० ||

माझ्यावर माझ्या सदगुरूंची निवृत्तीनाथांची एवढी कृपा आहे की, माझे नित्य श्वासोच्छवासही गीतेचे प्रबंध होतील. कारण ज्याच्यावर श्री गुरूंची कृपा आहे त्याला या जगात काय अशक्य आहे? म्हणून सगळ्या दृष्टांतांचा समारोप करताना माऊली म्हणतात, हा माझा ग्रंथ म्हणजे श्री गुरु निवृत्तिनाथांचा महिमा आहे. हा ग्रंथ माझा नाही तर त्यांच्या कृपेचे हे ऐश्वर्य आहे. यानंतर आपण आपल्या ऐपतीप्रमाणे पसायदानाचे निरूपण करण्याचा प्रयत्न करू या. यात माऊलींची कृपा अभिप्रेत आहेच व माझे सदगुरू श्री. मामा देशपांडे पण मला सहाय्यभूत होतील, अशी आशा आहे.

# पसायदान

आता विश्वात्मके देवे | येणे वागयज्ञे तोषावे |

तोषोनि मज द्यावे | पसायदान हे |

जे खळांची व्यंकटी सांडो | तया सत्कर्मी रती वाढो |

भूता परस्परे पडो | मैत्र जीवांचे |

दुरितांचे तिमिर जावो | विश्वस्वधर्म सूर्ये पाहो |

जो जे वांच्छील तो ते लाहो | प्राणिजात |

वर्षत सकळमंगळी | ईश्वरनिष्ठांची मांदियाळी |

अनवरत भूमंडळी | भेटतु या भूतां |

चला कल्पतरूंचे आरव | चेतना चिंतामणीचे गाव |

बोलते जे अर्णव | पीयूषांचे | चंद्रमे जे अलांच्छन |

मार्तंड जे तापहीन | ते सर्वाही सदा सज्जन | सोयरे होतु |

किंबहुना सर्व सुखी | पूर्ण होऊनि तिही लोकी |

भजिजो आदिपुरुखी | अखंडित |

आणि ग्रंथोपजीविये | विशेषी लोकी इये |

दृष्टादृष्ट विजये | होआवे जी ||

येथ म्हणे श्रीविश्वेश्वरावो | हा होईल दानपसावो |
येणे वरे ज्ञानदेवो | सुखिया झाला || १८०१ ||

ही प्रार्थना "मज" पुरती संकुचित नाही. यातील मी हा विश्वव्यापक आहे. त्यामुळे प्रार्थनासुद्धा विश्वव्यापक झाली आहे. सदगुरूंच्या कृपेने ग्रंथाची समाप्ती होत असतांना त्यांच्याकडेच मागणे मागावे, हेच उचित! म्हणून आता या शब्दाने या प्रसादरूपी दान द्यावी, हिची सुरुवात माऊलींनी केली आहे. आता ज्ञानदेव येथे आपल्या सदगुरूंना म्हणजे निवृत्तिनाथांनाच विश्वात्मक देव म्हणतात.

देव हा विश्वात्मक म्हणजे विश्वव्यापक व विश्वस्वरूप आहे. या देवाशी या संतांचा अभेदबोधाने परमात्म्याचा आत्मतत्त्वाने आणि अपरोक्ष साक्षात्कार प्राप्त झाल्याने अभेद असतो.

पहिल्या ओवीमध्ये श्री ज्ञानदेव त्यांनी लिहिलेल्या या दिव्यग्रंथराजास "वाग्यज्ञ" संबोधतात. अशा या वाग्यज्ञाने संतुष्ट होऊन मला मी जे पुढे मागणार आहे, ते प्रसादरूपी दान मला द्यावे, ही विनंती ते करतात.

आता खळांची म्हणजे दुर्जनांचे. अधम मार्गाने जाणारे त्याचे खलत्व हे मूळात स्वाभाविक नाही. ते कामक्रोधादि विकारांनी प्राप्त

होणारे आहे, असे आगंतुक असल्याने जाणे शक्य आहे. संतामध्ये तेवढे सामर्थ्य आहे.

खलांना सत्कर्मप्रवण बनवा म्हणजे त्या सक्रियेनेच ते आपोआप सज्जन बनतील. सत्कर्म हे खलस्वरूपी रोगावरील रामबाण औषध आहे. माऊलींनी रती वाढो म्हटले आहे. सत्कर्म घडणे वेगळे आणि सत्कर्मात रति निर्माण होऊन ती वाढणे वेगळे. म्हणून माऊलींनी सत्कर्मात रति वाढली पाहिजे म्हटले. रति म्हणजे आसक्तीयुक्त बुद्धी. सत्कर्माचा छंद लागला पाहिजे. सत्कर्माचे व्यसन जडले पाहिजे व ते वाढलेही पाहिजे.

खलाची निवृत्ती होऊन सर्वांची सत्कर्मात रति वाढल्यानंतर सर्व भूतांमध्ये मैत्री निर्माण होणे शक्य असले तरी तसे घडेलच असे नाही; म्हणून माऊलींनी हे तिसरे मागणे मागितले आहे. सर्व भूतमात्रांची मैत्री माऊलींनी खलत्वाच्या निवृत्तीनंतर मागितली आहे. कारण खलांची मैत्री हितावह नाही. सर्व प्राण्यात व भूतमात्रात जीवाचे मैत्र म्हणजेच जीवाभावाची मैत्री पाहिजे. येथे **पडो** शब्दाचा व्यापक अर्थ आहे म्हणजे जणुकाही अनंत काळापासून हे मैत्र निर्माण होऊन चालत आले आहे, इतकी मैत्री निर्माण होवो.

माऊलींनी चौथी मागणी केली आहे. अशुभ फलदायक जे पाप ते दुरीत. विश्वातून या दुरितांचा अंधार गेला पाहिजे. आता दुरितांचे तिमिर गेले. आता विश्वात कोणता प्रकाश हवा आहे, म्हणून माऊली पाचवी प्रार्थना करतात.

जो लोकांचे धारण करतो तो धर्म महाभारतकारांना अभिप्रेत आहे. धर्म प्रजेचे धारण करतो, विश्वस्वधर्म सूर्ये पाहो म्हणजे हे विश्व स्वधर्मरुपी सूर्याने प्रकाशित होवो. सूर्य जसा तिमिरनिवर्तक आहे तसाच स्वधर्म हा सुद्धा दुरीत तिमीरनिवर्तक आहे.

या जगातून दुरितांचे तिमिर गेल्यावर विश्व स्वधर्मसूर्याकडून प्रकाशित झाल्यावर खलांचे खलत्व निवृत्त झाल्यावर त्यांची सत्कर्मात रति वाढल्यावर माऊली सहावे मागणे मागतात.

जो जे वांछील तो ते लाहो प्राणीजात | म्हणजे ज्या प्राण्यास ज्याची इच्छा असेल त्यास ते प्राप्त होवो; कारण स्वधर्म सूर्याने हे विश्व प्रकाशित झाल्याने सर्वांच्या इच्छा पूर्ण होणे शक्य आहे. हे माऊलींनी तिसऱ्या अध्यायात म्हटले आहे.

तेथ तुम्ही जे करू म्हणाल | ते आपैसे सिद्धी जाईल |
वांच्छितहि पुरेल | मानसीचे |

(३ रा अध्याय ९८ || )

सर्व प्राणिमात्रांच्या इच्छा पूर्ण झाल्यावर त्याला जे पाहिजे ते लाभो ही त्यांची प्रार्थना आहे. सर्व प्रकारच्या मंगल गोष्टींचा संत वर्षाव करतात, म्हणून वर्षत हे विशेषण वापरून माऊलींनी संताच्या ठिकाणी मेघाचे रूप ध्वनित केले आहे. मेघाप्रमाणेच संत-महात्मे उपदेशामृत तत्त्वज्ञान, भक्ती, धर्म व भगवंताचे मंगल नाम यांचा वर्षाव करत असतात.

संत हे ईश्वरनिष्ठ म्हणजेच ईश्वरात स्थिर-स्थित आहेत, म्हणजे परमात्मस्वरूपात त्यांचे राहणे आहे. ईश्वरावर त्यांची पूर्ण श्रध्दा असते. खरी शरणागती संतांनी केलेली असते. म्हणून ईश्वरास शरण जाऊन ईश्वराशी अभिन्न झालेले संत ईश्वरनिष्ठ होत. माऊली म्हणतात, सकल मंगलाचा वर्षाव करणाऱ्या ईश्वरनिष्ठांची संतांची मांदियाळी या भूमंडळावर भूतमात्रांना अनवरत म्हणजे सतत भेटो.

संत हे **चल** अशा कल्पतरूंचे अरव म्हणजे उद्यान आहेत. एका वृक्षात रम्यता नसते, पण उद्यानात रम्यता असते. संत हे रमणीय असे चल अशा कल्पतरुंचे उद्यान आहेत.

असे अनेक मणी म्हणजे खडे आहेत. ते महत्त्वाचे आहेत परंतु त्यांना चिंतामणीचे महत्त्व प्राप्त होत नाही. ज्याच्याजवळ चिंतामणी आहे त्याला कुठलीच चिंता करण्याची गरज नाही. चिंतामणी चिंतिलेले

पदार्थच देतो; पण संतसंग मात्र चिंतिलेले न चिंतिलेले हितावह असे सर्वच देतो. संतांना "अचिंत्यचित्तचिंतामणी" म्हणतात.

संत केवळ एक चिंतामणी नसून, चेतना चिंतामणीपेक्षा संतांचे सामर्थ्य अधिक आहे. गाव म्हणजे कोटयावधी चिंतामणीपेक्षा जास्त सामर्थ्यवान कल्पिले आहे. यानंतर "बोलते जे अर्णव पीयूषांचे" अर्णव म्हणजे समुद्र. समुद्र हा रत्नाकर आहे. विपुल रत्ने आहेत, पण तो खारा आहे. संत सागर असले तरी ते पीयूषाचे म्हणजे अमृताचे अर्णव आहेत. समुद्र बोलत नाही, पण संतांना समुद्राची उपमा दिल्यावर माऊलींनी ते बोलते अर्णव असे म्हटले आहे. संत कृपेने अमृतत्व प्राप्त होते का पीयूषाच्या अर्णवापेक्षा संतांचा विशेष आहे. संत हे **बोलके** अमृताचे समुद्र आहेत. चंद्रमे जे अलांछन - संत हे **लांछनरहित** चंद्रमा आहेत. चंद्रमा मध्ये संतांच्या तुलनेत न्यूनता दाखविली आहे.

नंतर माऊलींनी संतांना सूर्य म्हणायचे ठरवले, पण त्यातही तापदायकता हा दोष त्यांना दिसला, म्हणून ते तापहीन सूर्य म्हणतात. या संतरूपी सूर्यामध्ये तापदायकत्व नाही.

अशा सर्व विशेषणांनी युक्त असलेले संत सर्वांना सदा सोयरे व्हावेत, त्यांची जवळीक व्हावी, अशी प्रार्थना माऊली करतात. किती अलंकृत उपमा दिल्यात, अगदी चपलख! मला नंतर विचार केल्यावर

आठवले- चेतना चिंतामणीचे गाव. चिंतामणी तर निर्जीव मग हे तर, चेतना चिंतामणी म्हणजे सदेह व सजीव स्वरूपातील चिंतामणीच. अशा चिंतामणीचे गाव असावे; म्हणजे त्या गावात सर्वच संत असावेत, ही माऊलींची किती व्यापक कल्पना आहे!

किंबहुना सर्व सुखी | पूर्ण होऊनि तिही लोकी |
भजिजो आदिपुरुखी | अखंडित || ७ ||

विश्वात्मक गुरुदेवास ज्ञानदेव म्हणतात, "हे देवा! आता तुमच्याजवळ मी जास्त काय मागू? मला आता असा वर द्या की, सर्व सुखाने पूर्ण होऊन या संपूर्ण त्रैलोक्याने आदिपुरुषाचे भजन करावे. माऊलींना जे सर्व सुख अपेक्षित आहे, त्यात सविषयसुख म्हणजे इंद्रियजन्य उपभोग हे तर आहेच, पण विषयसुख हे सर्व सुख ठरू शकत नाही. आता जे निर्विषय सुख आहे त्यातही सवृत्तिक व निवृत्तिक सुख असा भेद आहे. "अहं ब्रह्मास्मि" ही वृत्ती जोपर्यंत आहे तोपर्यंत ब्रह्मसुख प्राप्त होऊनही ते सवृत्तिकसुखच आहे आणि जेव्हा ही वृत्ती मावळते तेव्हा निवृत्तिक सुखाचा अविर्भाव होतो, अशा भगवत सुखातच सर्व सुखांचा अंतर्भाव होतो.

संतांची भेट झाली ते सोयरे झाले की, मग भगवतसुख-म्हणजे सर्व सुख प्राप्त होते, म्हणून ज्ञानदेव मागणी करतात की, गुरुदेवा! या सर्व

सुखाने एकटा-दुकटा जीव सुखी व्हावा, असे नाही तर त्रैलोक्याने सर्वसुखाने पूर्ण व्हावे आणि मग सर्वसुखाने परत पूर्ण होऊनही आदिपुरुषाचे भजन करावे. ब्रह्मच ईश्वररूप आहे व जगत कारण आहे. म्हणूनच त्याने या सृष्टीची निर्मिती केली किंवा त्याच्यापासूनच सृष्टी उत्पन्न झाली आहे. म्हणून तोच व तेच आदिपुरुष आहे.

भजन करावे म्हणजे भक्ती करावी, पण सर्वसुखांने पूर्ण झाल्यावर भजन कशासाठी? तर ज्ञानोत्तर काळात भगवंताशी अभेद्य होऊनही त्याविषयी कृतज्ञ असावे किंवा संतांनी लोकसंग्रहासाठीही भजन करावे असे आहे. तेही अखंडित, नाहीतर ज्ञानोत्तर काळात खंड पडला तर त्रिपुटीचा नाश होणे संभव नाही. पुन्हा पूर्वपदावर येण्याचा धोका आहे.

आता शेवटचे मागणे आहे की,

आणि ग्रंथोपजीविये | विशेषी लोकी इये |
दृष्टादृष्ट विजये | होआवे जी ||

या मृत्युलोकात विशेषतः जे ग्रंथ व ग्रंथोपजीवी आहेत त्यांनी दृष्ट व अदृष्टाबाबत विजयी व्हावे. सर्वच पुस्तके म्हणजे ग्रंथ नाहीत.

पुराणे, स्मृतिग्रंथ, वेद, संतवाडमय हे ग्रंथच आहेत. मग या ज्ञानेश्वरी व गीता ही आलीच! माऊलीच म्हणतात,

बाप बाप ग्रंथ गीता | जो वेदी प्रतिपाद्य देवता |

(११/१६) ज्ञानेश्वरी

मग ग्रंथोपजीवी कोण? या ग्रंथांना संत संतवाङमयाला आपल्या जीवनात प्रमाण मानणारे त्यास अनुसरून आचार-विचार ठेवणारे लोक म्हणजे ग्रंथोपजीवी.

जीवन्मुक्तीचा प्रवास म्हणजेच दृष्टा-दृष्ट विजय. जीवन्मुक्ती म्हणजे दृष्ट विजय व विदेह मुक्ती म्हणजे अदुष्टविजय. असा याचा निष्कर्ष माऊलींनी काढला आहे.

येथ म्हणे श्रीविश्वेश्वरावो | हा होईल दानपसावो |

येणे वरे ज्ञानदेवो | सुखिया झाला || १८०१ ||

ईश्वर तर देवाधिदेव आहेच, म्हणजेच विश्वात्मक श्री गुरुदेव विश्वेश्वरराव आहेत. मग श्री गुरु म्हणाले, ज्ञानदेवा हा प्रसाद तुला मिळेल म्हणून हे श्रेष्ठाने कनिष्ठास दिलेले म्हणजे गुरूने शिष्यास दिलेले दान आहे. या पसायदानाने ज्ञानदेव सुखी झाले. वर देणारे विश्वात्मक देव विश्वेश्वरराव असल्यावाचून ज्ञानदेव सुखी होणारच नाहीत. इतरांना तो अधिकारच नाही, ज्ञान ही ज्यांची पाईक करते ते ज्ञानदेव. त्यांना विश्वेश्वररावानेच पसायदान द्यावे लागते. माऊलींना वाग्यज्ञ या

विश्वात्मक देवास समर्पक करून विश्वाच्या कल्याणासाठी दहा मागण्यांचे पसायदान मागितले व ते निवृत्तिनाथांनी द्यायचे कबूल केले व दिले व त्यामुळे ज्ञानदेव सुखिया झाले.

|| येणे वरे ज्ञानदेवो | सुखिया झाला ||

साधक हो, माझी एक खूप दिवसांची इच्छा होती. ज्ञानेश्वरीतील काही व्यावहारिक दाखल्यांचे विवेचन करून ते पुस्तकरूपाने प्रकाशित करावे, आज ती इच्छा पूर्ण झाली ही माऊलींची व माझ्या सदगुरुंची गुरुवर्य देशपांडे यांची कृपाच मानतो.

- - - - - - - - - - - - - - - - - - -

# || ऋणानुबंध ||








या संपूर्ण साहित्य प्रवासात मला कुटुंबातील प्रत्येक सदस्याची मोलाची साथ लाभली आहे.माझी पत्नी सौ शोभना व मुले प्रसाद योगेश व माधवी . दोन्ही सुनांनी सौ शामला व रश्मी व जावई निखिल खराडे यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले आहे.माझा हा वैचारिक आध्यात्मिक पाया ज्यांनी घातला आहे ते माझे चुलते रघुनाथ पंदारे व सासरे दशरथ खेडकर व माझी आईअंबू जी खुप लवकर झाला होता आम्हाला पोरके करून गेली व वडील देवराम पंदारे ज्यांनी सामाजिक भान व माणसे जपण्याची कला शिकवली या सर्वांचेच उतराई कसे व्हावे? तुर्तास सगळे सगळयांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करून हा माझा साहित्यिक प्रवास असाच अविरत चालू राहू ही प्रार्थना त्या परमेशाकडे करतो.

माझ्याकडून पौराणिक कथा ऐकून मोठे होत असलेली माझी लाडकी नातवंडे मानव निरव आर्या व कृष्णा यां मला खूप आनंद देतात.असाच आनंदाचा क्षण शरयु पण देईलच

सुरेश पंदारे यांची ई साहित्यवरील या आधीची पुस्तके

फ़क्त एक क्लिक करा. उघडेल.






**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष.**

**श्री. सुरेश पंदारे यांचे हे तिसरे पुस्तक.**

सुरेश पंदारे एका मोठ्या बॅंकेत चीफ़ मॅनेजर होते. जीवनावर भरभरून प्रेम करने आणि संवेदनशीलता या दोन गोष्टींमुळे ते इतर लोकांहून वेगळे झाले. त्यांनी त्यांचे अनुभव केवळ एक अधिकारी म्हणून न घेता एक माणूस या नात्याने घेतले. जे आताच्या काळात दुर्लभ झाले आहे. लहान शेतकऱ्यांना कर्ज देताना उपकारभावना न ठेवता कर्तव्य पुर्ती म्हणून करणारे सुरेशजी लोकप्रिय आहेत. ृत्यांच्या या स्वभावाचे मूळ त्यांच्या आध्यात्मावर पोसलेल्या पिंडामधे आहे. म्हणून त्यांच्या विवेचनाला मोल आहे. त्यांछे ज्ञानेशअरीवरीलप ्रेमकेव ळ शाब्दिकन नाही.

सुरेश पंदारे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३०), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(३), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(२६), डॉ.

निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१३), अंकुश शिंगाडे(१३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(३), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(४) पंकज कोटलवार(४) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(३), सुरेश पंदारे (२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।